यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र



मा.यशवंतराव चव्हाण
१०६व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन !




# ECONOMIST




यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१८
सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री.रघुराम राजन





WILLIAM F. AUSTIN
YASHWANTRAO CHAVAN
SPECIAL RECOGNITION
AWARD 2019, INDIA

STARKEY HEARING FOUNDATION

(वर्ष २० वे)



## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित

# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०१९













साक्षी दिश चितलांगे
क्रिडा युवा पुरस्कार
(युवती) बुद्धिबळपटू

किसन नरशी तडवी
क्रिडा युवा पुरस्कार
(युवक) धावपटू

स्नेहल चौधरी कदम
सामाजिक युवा पुरस्कार
(युवती)

अभिजीत सदानंद दिघावकर
सामाजिक युवा पुरस्कार
(युवक)

वेदांगी विवेक कुलकर्णी
विशेष क्रिडा युवा पुरस्कार
सायकलपटू

सर्व पुरस्कारार्थींचे मन:पूर्वक अभिनंदन

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➣**

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी — उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
७. मा. श्री. राम प्रधान
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१०.मा. श्री. अजित निंबाळकर
११.मा. श्री. बी. के. अग्रवाल
१२.मा. श्री. अमित डहाणूकर
१३.मा. श्री. डॉ. समीर दलवाई
१४.मा. श्री. ना. धों. महानोर
१५.मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६.मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगरविकास विभाग
१७.मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

**➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➣**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०.मा. श्री. विनायकराव पाटील
११.मा. श्री. के. बी. आवाडे
१२.मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३.मा. श्री. जीवनराव गोरे
१४.मा. श्री. विजय शिर्के
१५.मा. श्री. जयराज साळगांवकर
१६.मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७.मा. श्री. राजेश टोपे
१८.मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील
१९.मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०.मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२१.मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२.मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगरविकास विभाग

**➢ कार्यकारी समिती ➣**

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी — उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. अजित निंबाळकर — विश्वस्त सदस्य
७. मा. श्री. जीवनराव गोरे — सदस्य
८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील — सदस्य

**विभागीय केंद्र**

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| | कार्याध्यक्ष | श्री. विश्वास ठाकूर |
| विभागीय केंद्र, कोकण | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | - | - |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| जिल्हा केंद्र, अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया (निधन:२३ नोव्हे.,२०१८) |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | श्री. सुनिल देवराव रणाईत |
| नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | सौ. संध्याताई दुधगांवकर |

**विविध विभाग**

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायकराव ना. कांबळे |

**मध्यवर्ती कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक, सभागृहे | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन | |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई | चार्टर्ड अकाउंटंट |

अंतर्गत हिशेब तपासनीस घोरपडे मराठे ॲण्ड असोसिएट्स, मुंबई, चार्टर्ड अकाउंटंट

# संपादकीय

लोकसभेच्या निवडणुका जाहीर होत असतानाच हा अंक वाचकांच्या हाती मिळतो आहे. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या आयुष्यातील ही एक महत्त्वाची घटना आहे. गेली ७०वर्षे भारतीय संविधानाच्या चौकटीत आणि त्याद्वारे घोषित आणि प्रस्थापित केलेल्या मुल्यांवर आधारित हा लोकशाहीचा कारभार चालू आहे. गेल्या सत्तर वर्षात त्यात काही वळणं आणि चढ-उतार आले असले तरी मूळ चौकट आणि पायाला धक्का लागलेला नाही. आजच्या घडीला मात्र त्यासमोरील आव्हानं अवघड वळणांवर येऊन उभी ठाकली आहेत. दिवंगत यशवंतराव चव्हाण साहेबांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मारक म्हणून कार्य करताना ही बाब नजरेआड करता येण्याजोगी नाही. सूज्ञ भारतीय जनता हे आव्हानही परतून लावेल, अशी आशा आणि अपेक्षा आहे.

आज आपण आदरणीय चव्हाण साहेबांची १०६वी जयंती साजरी करीत आहोत. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही काळातील अतिशय महत्त्वाच्या घडामोडींची वर्षे स्व. चव्हाण साहेबांच्या वाट्याला आली. त्याला अतिशय धैर्याने आणि प्रगतिशील विचाराने ते सामोरे गेले. इतिहासाने सोपवलेली जबाबदारी समर्थपणे पार पाडून त्यांनी आपले जीवन कृतार्थ केले. संकटप्रसंगी राज्य आणि देशाला दिशा देण्याचे मोलाचे काम चव्हाण साहेबांनी केले. याची कृतज्ञतापूर्वक जाणीव नव्या पिढीच्या मनात रुजली पाहिजे. त्यासाठी सुद्धा प्रतिष्ठानचे कार्य सुरू आहे.

समाजातील विविध घटकांसाठी अनेक प्रकारचे उपक्रम विभागीय केंद्राद्वारे राज्यभर राबविण्यात येतात. मुले, विद्यार्थी, शिक्षक, महिला, युवक-युवती, अपंग, ज्येष्ठ नागरिक, एकल महिला आणि ट्रान्सजेंडर्स, वैज्ञानिक, साहित्यिक, कलावंत, शेतकरी, पर्यावरण संवर्धक अशा सर्व घटकांसाठी सातत्याने मुंबईसह विविध शहरांत व गावांत कार्यक्रम सुरू असतात. त्यासाठी इतर सहयोगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, राज्यशासन तथा केंद्र शासन यांचेही सहकार्य घेण्यात येते. प्रतिष्ठानच्या कार्यात कोणत्याही प्रकारे राजकीय अथवा इतर मतभेद आड येत नाहीत. संस्थेच्या स्थापनेपासून आजवर या बाबींची जपणूक आम्ही सातत्याने केली आहे.

याबरोबरच राज्य व राष्ट्रीय स्तरांवर विविध क्षेत्रात मौलिक कामगिरी करणाऱ्या समाजधुरिणांचा गौरव करण्यात येतो. स्व. चव्हाण साहेबांच्या 'पुण्यतिथीला' म्हणजेच २५ नोव्हेंबरला राज्यस्तरावरील तर 'जयंती दिनी' म्हणजे १२ मार्चला राष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या व्यक्तीमत्वाचा चव्हाण साहेबांच्या नावे पुरस्कार देऊन गौरव करण्यात येते.

आज आपणां सर्वांना सुपरिचित भारतीय रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ मा. डॉ. रघुराम राजन यांचा सन्मान करण्यात येत आहे. त्यांच्या जीवन व कार्याविषयी माहिती देणारे सन्मानपत्र आपणांस या वार्तापत्रात वाचावयास उपलब्ध आहे. भारतीय म्हणून आपणां सर्वांना अभिमान वाटावा, असा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा चढता आलेख आहे. त्यांनी हा पुरस्कार स्वीकारल्याबद्दल मन:पूर्वक आभार आणि खूप खूप अभिनंदन!

युवा पिढीतील सामाजिक व क्रीडा क्षेत्रात लक्षवेधी कामगिरी बजावणाऱ्या ज्या पाच युवा शिलेदारांना (दोन युवक व तीन युवती) आपण सन्मानित करून भावी कार्यासाठी प्रोत्साहन आणि शुभेच्छा दिल्या आहेत; त्यांच्याविषयी यात माहिती दिली आहे. शिवाय विभागीय केंद्रांमार्फतही त्या-त्या ठिकाणी उत्तम कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा आपण आदरपूर्वक सन्मान केला आहे. त्या सर्वांचे अभिनंदन!

शिक्षण, पर्यावरण, विज्ञान या क्षेत्रांत त्यातील मान्यवरांसोबत कार्य करत असतानाच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांसाठी आपण देशाच्या स्तरावर लक्ष वेधून घेईल; एवढ्या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन मागील काही दिवसांत केले आहे. त्याचाही सविस्तर वृत्तांत या अंकात आपणांस वाचावयास मिळेलच; परंतु दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ रोजी पुणे येथे सहा तासांत ४८४० इतक्या कर्णबधिर मुले, मुली व ज्येष्ठ नागरिकांना श्रवणयंत्रे बसवून देण्याचा जागतिक विक्रम आपण नोंदवू शकलो, ही आमच्यासाठी व आपणां सर्वांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. या कामी अमेरिकेतील स्टार की फाऊंडेशन, टाटा ट्रस्ट, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, ठाकरसी ग्रुप आदींचे सहकार्य मिळाले; म्हणूनच हे शिवधनुष्य आपण पेलू शकलो.

त्यासोबतच हजारोंच्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांना त्यांचे वृद्धापकाळातील जीवन सुखकर करण्यासाठी विविध उपयोगी वस्तूंचे (कोट्यवधी रुपये किंमतीच्या) वाटप करण्यात आले. यासाठी केंद्र शासनाच्या वयोश्री योजनेचे सहकार्य लाभले. यासाठी माझे सहकारी श्री. विजय कान्हेकर व राज्यातील आमची सर्व टीम यांनी कित्येक महिने परिश्रम करून हे कार्य सिद्धीस नेले. त्या सर्वांचे अभिनंदन!

प्रतिष्ठानच्या सर्व कार्यात प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सभासद, अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य व आपणांसारख्या हितचिंतकांच्या सदिच्छा व पाठिंबा, हीच आमची ताकद आहे. ती सदोदित मिळत राहो, हीच इच्छा व अपेक्षा.



**(सुप्रिया सुळे)**

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०६व्या जयंतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन
वर्ष : २३ वे / अंक ४५ वा / प्रकाशन : १२ मार्च २०१९

सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक
**सुरेश पाटील**
**अनिल पाझारे**

विशेष साहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**

साहाय्य
**मीनल सावंत- पाडावे**
**रमेश मोरे**
**मनिषा खिल्लारे**
**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**
विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतीश लाड, भक्ती जांभवडेकर, सुषमा साळुंखे, स्वाती शेलार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रमणिका

- माननीय यशवंतराव चव्हाण यांचा लेख ........ ६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पारितोषिक-२०१८ मानपत्र.. ..... १०

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान........ १३
- अपंग हक्क विकास मंच ........ १९
- शिक्षण विकास मंच ........ २१
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ........ २३
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम........ २५
- सृजन........ २७
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ........ २८
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ........ २९
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ........ ३१

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कऱ्हाड ........ ३२
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे..... ४१
- विभागीय केंद्र, नागपूर ........ ४५
- विभागीय केंद्र, नाशिक........ ४७
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ........ ५४
- विभागीय केंद्र, लातूर ........ ५८
- विभागीय केंद्र, रत्नागिरी........ ५९
- विभागीय केंद्र, अहमदनगर ........ ६०
- विभागीय केंद्र, सोलापूर ........ ६३
- विभागीय केंद्र, अंबाजोगाई ........ ६४
- विभागीय केंद्र, ठाणे ........ ६७
- विभागीय केंद्र, परभणी........ ६९
- देवराष्ट्रे अहवाल ........ ७१
- प्रतिष्ठानची प्रकाशने ........ ७५

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# आमचा आर्थिक पवित्रा

– यशवंतराव चव्हाण

आर्थिक विकासामागे सामाजिक शक्ती काम करीत असतात, त्याचप्रमाणे राजकीय प्रश्नही त्यांमध्ये मिसळलेले असतात. त्यामुळे आर्थिक विकास, म्हणजे केवळ आर्थिक विकासाच्या तंत्राचा अभ्यास करणे नव्हे. सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा सर्वांगीण भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक होय. अनेक वेळा या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष झाल्याने आर्थिक विकासाच्या प्रश्नाचा आपल्याकडे समाधानकारक अभ्यास होताना आढळत नाही.

शेकडो सुशिक्षित बेकारांना पुढील वर्षात कामधंदा उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. तरुणांपुढे विधायक कार्यक्रम ठेवण्याची आणि त्यांनीही देशाच्या पुनर्रचनेच्या कार्यात सक्रिय भाग आवडीने घ्यावा, यासाठी स्फूर्तिदायी, पण प्रत्यक्ष लाभदायी, अशी उद्दिष्टे त्यांच्यापुढे ठेवण्याचीही आवश्यकता निर्माण झाली आहे. मूलभूत राजकारण, सामाजिक व आर्थिक विचारसरणींतील मौलिक आशय यांपासून तरुणांना किंवा तरुण विद्यार्थ्यांना वंचित करता येणार नाही. तरुणांविना देशाला उज्ज्वल भवितव्य नाही, याची दखल सत्ताधारी राजकीय पक्षालाही घ्यावी लागेल.

स्वातंत्र्योत्तर काळातील पिढी आता ऐन जवानीत आणि उमेदीत आहे. स्वातंत्र्यासाठी लढलेल्या पिढीबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना असेलही, पण हे स्वातंत्र्य दृढमूल करण्यासाठी आणि येणाऱ्या नव्या आव्हानांचा स्वीकार करून त्यांच्याविरुद्ध मुकाबला करण्यासाठी, तरुण पिढीला कर्तव्याची जाणीव घ्यावीच लागेल. हे करावयाचे, तर सुशिक्षित बेकारांप्रमाणेच अशिक्षित अशा लाखो लोकांना जीवनाचे साधन उपलब्ध करून देऊन, त्यांना निराशेच्या गर्तेतून बाहेर काढावे लागणार आहे. ज्यांना दिवसभर पुरेसे काम नाही, अशा अर्धवेळ काम करणाऱ्या लोकांच्या अतिशय गुंतागुंतीच्या प्रश्नाशीही मुकाबला करावयाचा आहे. या प्रश्नांचा विचार मी जेव्हा गंभीरपणे करतो, तेव्हा या लोकांना कामधंदा मिळवून देण्याचे सूत्र आपल्या आर्थिक विकासाच्या सूत्रांतील महत्त्वाचे सूत्र असले पाहिजे, या निर्णयाप्रत येऊन ठेपतो. अर्थात हा प्रश्न जितका गंभीर तितकाच अवघडही आहे, हेही मला मान्य आहे. तरीसुद्धा हा प्रश्न सोडवावयाचा, तर छोट्या छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीवर अधिक भर द्यावा लागणार आहे. त्याचप्रमाणे शेतीला पूरक अशा उद्योगधंद्यांची वाढ कशी होईल, याचीही काळजी घ्यावी लागेल. खेड्यापाड्यांतील अगदी लहान प्रमाणावरील उद्योगधंद्याच्या वाढीचा विचारही यामध्ये अनुस्यूत आहे. खेड्यात किंवा एकूण ग्रामीण भागातच जो कसबी (आर्टिझन) वर्ग आहे, त्यांना पुरेसे उद्योग उपलब्ध करून देणे, हा 'गरिबी हटाव' या प्रयत्नांतील फार मोठा जोखमीचा भाग ठरेल.

बेकारांची संख्या कमी करावयाची, तर या प्रश्नाच्या संदर्भात शिक्षणाच्या पुनर्रचनेचा प्रश्नही विचारात घ्यावा लागेल. सध्याच्या शिक्षणव्यवस्थेतून सुशिक्षित बेकारांची संख्याच केवळ वाढत असेल, तर आणि पुढेही वाढणार असेल, तर प्रचलित शिक्षणव्यवस्थेत बदल करणे अपरिहार्य ठरते. हा बदल कसा करावा, हा एक वेगळा अभ्यासाचा विषय आहे; पण अधिकाधिक लोकांना कामधंदा देऊ शकेल, असे शिक्षण कसे द्यावयाचे, याचा राष्ट्राला विचार करावाच लागेल. भारत सरकारला या प्रश्नाची तीव्रता आज प्रकर्षाने जाणवत आहे. १९७१च्या अखेरपर्यंत पाच लक्ष लोकांना कामधंदा देण्याचा निर्णय सरकारने केलेला आहे. पण एकूण बेकारांची प्रचंड संख्या ध्यानी घेता, यापुढील फार मोठ्या उपक्रमाचा हा एक लहानसा प्रारंभ आहे, एवढेच म्हणता येईल.

बेकारी कमी करण्याच्या उपक्रमातील एक लहानसा टप्पा म्हणून हा प्रारंभ झाला असला, तरी सामान्य माणसाच्या ज्या आशा–आकांक्षा–अपेक्षा आहेत, त्यांची यथायोग्य दखल घेण्याचे काम एवढ्याने पुरे होत नाही. सामाजिक विषमतेच्या दृष्टिकोनातूनही त्यांची दखल घ्यावीच लागणार आहे. गेल्या काही वर्षातील स्थितीचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून येते, की उत्पन्नांतील दरी ही वाढत चालली आहे. ज्यांच्याजवळ

संपत्ती होती, जमीन होती किंवा आहे, त्यांना सुरुवातीच्या काळात अधिक फायदा मिळणे व त्यांची संपत्ती वाढत जाणे काही प्रमाणात अटळ होते, हे नाकारण्यात हशील नाही. पण त्यातून जी परिस्थिती निर्माण झाली आहे व होत आहे, त्याबाबतीत आत्मसंतुष्टतेची भूमिका मात्र घेता येणारी नाही. समाजातील वेगवेगळ्या घटकांतील उत्पन्न व संपत्ती यांच्यातील तफावत कमी करणे, हा ही परिस्थिती पालटण्याचा मार्ग आहे. देशासमोर पुढची काही वर्षे तरी हे एक मोठे प्रश्नचिन्ह सतावत राहणार आहे. ही तफावत कमी करताना या बाबतीत अर्थातच, कोणतीही ठोकळेबाज किंवा सैद्धांतिक भूमिका न घेता, अधिक वास्तववादी भूमिका तर घ्यावी लागेलच; पण त्याचबरोबर सामान्य माणसांच्या जीवनातील वाढत्या आशाआकांक्षा व अपेक्षांची प्रामुख्याने दखल घ्यावी लागणार आहे. आज दिसते ते असे, की समाजात एका बाजूला समृद्धीची, ऐश्वर्याची, वैभवाची क्षेत्रे आणि शिखरे निर्माण झाली आहेत, तर दुसऱ्या बाजूला दैन्याचे आणि गरिबीचे विदारक दृश्य दिसते आहे. त्यामुळे निर्धन बहुजन समाज, लहान लहान शेतकरी, औद्योगिक क्षेत्रातील कामगार वर्ग आणि देशातील मध्यमवर्गीय तरुण यांच्या महत्त्वाकांक्षेशी आपण तादात्म्य साधणार आहोत का? आणि त्या दृष्टिकोनातून कार्यक्रमाची आखणी करणार आहोत का? किंवा त्याचा विचार तरी करणार आहोत, की नाही? हे खरे आपल्यापुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. जनतेशी तादात्म्य साधण्याच्या मूलभूत नियमांचा आश्रय घेऊन आणि बहुजन समाजाच्या उपजीविकेचा आधार पुनरुज्जीवित करूनच देशाला समृद्धीचे दिवस आणता येणार आहेत, याबद्दल आता शंका बाळगण्याचे दिवस संपले आहेत. कारण, याच जाणिवेच्या आधाराने स्वातंत्र्य-संपादनाचे यश आपण प्राप्त केले आहे, हे दुर्लक्षिता येणार नाही. देशाच्या पुनर्रचनेसाठी जे जे काही करावयाचे, त्यामध्ये आता सर्व वर्गाला, सर्व थरांना, भाग घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. एका बाजूला श्रीमंती आणि दुसऱ्या बाजूला कमालीचे दैन्य अशी स्थिती समाजात निर्माण होणे केव्हाही इष्ट नाही. उत्पन्न आणि संपत्ती यांच्यातील ही विषमता केवळ शहरांतच आहे, असे नाही. अलीकडे खेड्यांतही त्याचा प्रत्यय येऊ लागला आहे. हरितक्रांतीमुळे ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे आणि त्यातून काही गुंतागुंतीचे सामाजिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण होऊ लागले आहेत. ही स्थिती केवळ भारतातच आहे, असे नाही. मोठ्या प्रमाणात उद्योगीकरण झालेल्या युरोपातील काही राष्ट्रांमधील स्थिती पाहिली, तर तेथेही याचा प्रत्यय येतो. यावरून आर्थिक विकास हा केवळ आर्थिक प्रश्न म्हणून न अभ्यासता त्याचे सामाजिक आणि राजकीय परिणामही विचारात घेण्याची नितांत गरज निर्माण होते. समाजात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत एक घटक समृद्धीकडे जात आहे आणि दुसरा दारिद्र्याच्या दिशेने वाटचाल करतो आहे, ही स्थिती घातक ठरेल. मला वाटते, या संदर्भातच आपल्या देशातील हरित-क्रांती, औद्योगिक क्रांती आणि नागरीकरण या प्रश्नांचा खोलवर अभ्यास केला पाहिजे आणि निर्माण झालेल्या व भावी काळात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

हरित-क्रांतीचा विचार करताना खेड्यातील श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी यांच्यातील वाढत्या विषमतेचा विचार आवश्यकच ठरतो. आणि असा एकदा विचार करू लागलो, म्हणजे मग जमीनसुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा यांचाही विचार ओघानेच पुढे येतो. आज खेड्यांत लक्षावधी भूमिहीन आहेत, शेतमजूर आहेत, कारागीर आहेत. ते रोजगारासाठी, उद्योगांसाठी आणि जमिनीसाठी भुकेलेले आहेत. त्यांच्याकडे लक्ष द्यावेच लागेल. अर्थात यासंबंधी निर्णय करताना जमिनीमधून अधिकाधिक उत्पादन कसे निघेल, शेतीसाठी आधुनिक तंत्राचा वापर कसा करता येईल, याचाही विचार करावाच लागेल. गेल्या काही वर्षांत खेड्यांतून विकासाच्या ज्या योजना राबवल्या गेल्या, त्यांचा खरा फायदा सधन शेतकऱ्यांच्याच पदरात पडला. छोटे शेतकरी आणि शेतमजूर हा वर्ग जवळजवळ उपेक्षितच राहिला. अवतीभवती हरित-क्रांती होत आहे, काही शेतकऱ्यांना विकास योजनांचा फायदा मिळून त्यांचे उत्पन्न वाढत आहे, ते संपत्तीमान बनत आहेत. पण या वाढत्या समृद्धीचा फायदा आपल्याला काहीही मिळत नाही, ही भावना छोटा शेतकरी आणि शेतमजूर यांच्यांत निर्माण झाली आणि ती वाढतच राहिली, तर त्यांच्यात वैफल्य वाढेल. दुर्दैवाने छोट्या शेतकऱ्यांच्या वाट्यास आत्तापर्यंत उपेक्षा आणि वैफल्यच आले. खेड्यातील अर्थव्यवस्थेतील हे दोष वेळीच दूर करावे लागतील. एरवी पुढच्या काही वर्षात विषमता ही अशीच वाढत राहील, प्रसंगी ती धारदार बनेल आणि त्यातून स्फोटक परिस्थिती निर्माण होईल. अलीकडे काही राज्यांतून अशा स्फोटक परिस्थितीच्या घटना घडल्या आहेत. म्हणूनच जमीनसुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा

यांचा विचार क्रमप्राप्त ठरतो.

अर्थात हा विचार करताना, आपल्या देशात जमीनधारणेबाबत कमाल मर्यादा अमुकच असावी, असे ठाशीव मत सैद्धांतिक दृष्टिकोनातून मांडता येणार नाही. भारतातील निरनिराळ्या राज्यांत जमिनीची स्थिती वेगवेगळी आहे. जमिनीचा कसही वेगवेगळ्या प्रकारचा आहे. पण म्हणून जमिनीवरील कमाल धारणेचा मूलगामी विचार बाजूला टाकून चालणार नाही. उलटपक्षी, हा विचार अधिक गंभीरपणानेच केला पाहिजे. मला वाटते, कुटुंब हाच घटक धरून याचा विचार करणे श्रेयस्कर ठरेल. ग्रामीण भागांतून फिरताना तेथील लोकांमध्ये जो एक प्रकारचा असंतोष आढळतो, तो का? या प्रश्नाचा शोध घेताना असे आढळते, की खेडेगावांतील जीवनात निरनिराळ्या वर्गांच्या परस्पर आर्थिक संबंधात पुरेसे रचनात्मक बदल घडविले गेलेले नाहीत. आपण समाजवादाची भाषा केली, म्हणजे कर्तव्य संपले, असे नव्हे. राष्ट्रीयीकरण अथवा समाजीकरण एवढेच केवळ समाजवादाचे मूलभूत उद्दिष्ट आहे, असे म्हणता यावयाचे नाही. भूमिहीन, श्रमिक, मागासलेले यांच्या प्रश्नांची उकलही त्यामध्ये अभिप्रेत आहे. त्यासाठी समाजाच्या या मूलभूत आर्थिक उणीवांची कोंडी फोडावी लागेल

हे झाले ग्रामीण भागाचे. पण ग्रामीण भागाप्रमाणेच शहरांतही हा श्रीमंती व गरिबीतला फरक उग्र रूप धारण करीत आहे. त्याकडेही तितक्याच गंभीरपणे लक्ष द्यावे लागणार आहे. समाजातील मूठभर श्रीमंत आज आपल्या श्रीमंतीचे असंस्कृत प्रदर्शन करीत असल्याचे दिसून येते. हे असंस्कृत प्रदर्शन अनिष्टच म्हटले पाहिजे. शहरांतील मालमत्तेवर मर्यादा घालावी लागणार आहे, ती यासाठीच. मालमत्तेवरील कमाल मर्यादेच्या तपशिलासंबंधी काही मतभेद असू शकतील, त्याचप्रमाणे कोणत्या पद्धतीने उद्दिष्ट साध्य करावयाचे, याबद्दलही मतभिन्नता असेल, पण या तत्त्वांची अंमलबजावणी त्वरित झाली पाहिजे, यात मतभेदाला जागा नाही. यापुढच्या काळात या प्रश्नाची सोडवणूक करावीच लागणार आहे.

समाजातील मूलगामी अशा आणखी एका प्रश्नाचा विचार समोर येतो, तो महागाईचा-भाववाढीचा. किंमती स्थिर करण्याच्या समस्येचा विचार आज जगातील अनेक राष्ट्रांतून सुरू झालेला आहे. महागाईचा प्रश्न हा केवळ भारतासमोरच आहे, असे नव्हे. पुढारलेल्या औद्योगिक राष्ट्रांतही हा प्रश्न डोके वर काढीत आहे. आणि त्यामुळे त्यांनाही भडकलेल्या किंमती स्थिर कशा ठेवावयाच्या, याचा विचार करण्यावाचून गत्यंतर उरलेले नाही. तथापि त्यांच्याकडील महागाईचे स्वरूप आणि आपल्याकडील यांत काही निश्चित फरक आहे. तिकडील महागाई ही जीवनावश्यक वस्तूंच्या कमतरतेतून निर्माण झालेली नाही, तर ती समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये जीवनमान उंचावण्यासाठी जो संघर्ष चालू आहे, त्यातून निर्माण झाली आहे, असे आढळते. कामगार वर्गाचा पगार वाढत आहे; पण प्रमाणात उत्पादनवाढ होत नाही, म्हणूनच त्यांचा महागाईचा प्रश्न निर्माण होत आहे. परंतु त्याचबरोबर समाजातील संपत्तीची योग्य प्रमाणात जाणीवपूर्वक विभागणी हीही पुढारलेल्या राष्ट्रांतील एक महत्त्वाची समस्या बनली आहे. महागाईचा प्रश्न त्यातूनही उद्भवत आहे.

अर्थात या प्रश्नाचा विचार भारताच्या संदर्भात करताना आपल्याला केवळ वस्तूंच्या किंमती, पगार व उत्पन्न एवढ्याचाच विचार करून भागणार नाही. त्यापलीकडे जाऊन समाजातील मूलभूत अशा सामाजिक व आर्थिक प्रश्नांचाच विचार करावा लागणार असून जातिव्यवस्था, मालमत्तेवरील कमाल मर्यादा, संपत्तीच्या वारसाहक्काच्या कायद्यात बदल, व्यापार-उदीमामध्ये राज्यसरकारने उचलावयाचा वाटा इत्यादी अनेक प्रश्नांचा साकल्याने विचार व्हावा लागणार आहे. त्यामुळे महागाई किंवा भाववाढ रोखण्याच्या तात्कालिक उपायांपेक्षा दूरगामी प्रश्न डोळ्यांसमोर ठेवून या समस्येचा आपल्याला विचार करावा लागेल.

देशातील गरीब माणसांचे जीवनमान उंचाविण्यासाठी उत्पादनवाढ व राष्ट्रीय संपत्तीचा विकास यांवरच सतत भर द्यावा लागणार असल्याने, पुढच्या काही वर्षातील औद्योगिक धोरण ठरविताना इतर मूलभूत प्रश्नही हाताळावे लागणार आहेत. 'गरिबी हटाव'ची घोषणा झाली. पण या कार्यक्रमात यशस्वी व्हावयाचे असेल, तर त्यासाठी राष्ट्रीय संपत्तीची वाढ करावी लगणार आहे, त्याचे काय? राष्ट्रीय संपत्ती न वाढविता केवळ संपत्तीच्या विभाजनाची चर्चा करीत राहणे व्यर्थ आहे. अर्थातच राष्ट्रीय संपत्ती वाढवत असताना काम, बचत किंवा भांडवलसंचय आणि भांडवल-गुंतवणूक याला चालना मिळेल, अशी प्रेरक शक्ती निर्माण करण्याची गरज आहे. श्रीमंत व

सुखवस्तू लोकांना अशा शक्ती देण्याचे फारसे कारण नाही. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये नियोजनाची प्रक्रिया अनेक वर्षे चालू राहणार आहे. त्यामुळे लक्षावधी गरीब लोकांना अधिक काम करण्यास भांडवलसंचय करण्यास व अधिक गुंतवणूक करण्यास कोणत्या प्रेरणा उपयोगी पडतील, याचीच अधिक पोटतिडकीने आखणी करावी लागेल. किंबहुना भांडवलउभारणी हा पुढील काही वर्षे आपल्या आर्थिक धोरणाचा एक महत्त्वाचा भाग राहणार आहे. विषमता वाढत गेली, तर प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होत राहणार असल्याने समाजातील वेगवेगळ्या घटकांना योग्य स्वरूपाच्या प्रेरणा कशा द्याव्यात, हा विचार प्रमुख ठरतो. यामध्ये मध्यम वर्गाला डावलून मुळीच चालणार नाही. केवळ वरिष्ठ वर्ग आणि कनिष्ठ वर्ग यांनी कितीही त्याग केले, तरी कमी उत्पन्न, कमी बचत, कमी भांडवल-गुंतवणूक व कमी उत्पादनक्षमता या वर्तुळातून आपल्याला बाहेर पडता येणार नाही. आवश्यक त्या प्रेरणा म्हणूनच सर्वांसाठी खुल्या असल्या पाहिजेत.

आर्थिक विकासाचा काही तात्कालिक व दूरगामी स्वरूपाचा विचार करीत असताना, या आर्थिक विकासातून समाजातील लोकशाही शक्ती बलशाली कशा होतील, याचेही भान राखावे लागणार आहे. भारतीय राज्यघटनेत लोकशाही सारखी मूलगामी स्वरूपाची मूल्ये आपण स्वीकारली आहेत. आर्थिक विकासातून ही मूल्ये अधिक सामर्थ्यसंपन्न होतील, याचा प्रयत्न झाला, तरच आर्थिक विकासाला काही अर्थवत्ता प्राप्त होईल. तो प्रश्न अर्थपूर्ण होईल. भारतातील लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही. ही लोकशाही देशातील गरिबी हटवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे येथील प्रश्न हा केवळ आर्थिक विकासाचा प्रश्न नव्हे. लोकशाही मूल्ये टिकविण्याचाही हा प्रश्न आहे.

पुढल्या काळातील आव्हाने स्वीकारताना हे सर्व संदर्भ ध्यानी घ्यावे लागतीलच. पण त्याचबरोबर आर्थिक विकासाच्या या कार्यात करोडो लोकांचा सहभाग निर्माण करावा लागणार आहे. कारण या करोडो हातांच्या परिश्रमातून, त्यागातून आणि सहकार्यातून देशाची गरिबी हटवता येणार आहे. दारिद्र्याविरुद्धची लढाई जिंकायची आहे. करोडो लोकांनी एकजुटीने आणि जिद्दीने दिलेल्या लढ्यामुळेच स्वातंत्र्य मिळविणे शक्य झाले आहे. दारिद्र्याविरुद्धचा लढाही असाच राष्ट्रीय दृष्टिकोनातून व प्रदीर्घ परिश्रम करून आणि वर्षानुवर्ष संघटित प्रयत्न करूनच सोडवायचा आहे. किंबहुना आपला आर्थिक पवित्रा आणि आवाज असाच राहिला, तरच त्याला अपेक्षित यश मिळणार आहे. आर्थिक विकासाची सुनिश्चित अभिवचने देऊन सर्वांनी जनसेवेला वाहून घेतले आणि तदनुषंगाने राजकारणाचा विचार आणि आचार करू लागलो, तर हा देश व लोकशाही समाजवाद स्वतःचे संरक्षण स्वतःच करील आणि कालांतराने सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीच्या दिशेने आपल्या या कृतींचा अनुकूल परिणाम घडल्याचे अनुभवास येईल.

आर्थिक समस्यांना एक राजकीय अंग असते. सुराज्याची घोषणा आपण करतो, पण त्या सुराज्याची प्रचिती सर्वसामान्य जनतेला येणे महत्त्वाचे असते. परिस्थितीत योग्य ते फेरबदल घडून आपल्या समस्या सुटत असल्याची जाणीव लोकांना होणे ही आजची प्रमुख गरज मानली पाहिजे. राज्य करावयाचे, ते निर्जीव वस्तूंवर नव्हे. शासनकर्ते बनून गतिमान आर्थिक परिस्थितीशी झुंज द्यावयाची, ती सजीवांसाठी ! संख्याशास्त्रीय आकडेमोड करीत राहणे, भांडवल-गुंतवणुकीत अधिक महत्त्वाच्या बाबींना अग्रहक्क देणे, विकासाची गती निश्चित करणे हा झाला त्यातला एक तांत्रिक भाग. दुसरा महत्त्वाचा भाग असा, की आर्थिक समस्यांचे सामाजिक दृष्टिकोनातून सर्वांगीण परीक्षण करणे आणि त्यातल्या आधी कोणत्या सोडवायच्या, हे निश्चित करणे. पहिला भाग यथाक्रम घडत राहतो. पण महत्त्वाच्या दुसऱ्या भागावर लक्ष ठेवणे अगत्याचे आहे. आमचा आर्थिक पवित्रा वा आवाज या रोखाने आणि त्याच्या पूर्ततेसाठी असायला हवा.

**– 'केसरी' (१९७१)**
**दिवाळी अंकातील**
**मुलाखतीच्या आधारे**

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2018 FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES FOR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

## CITATION

Dr. Raghuram Rajan was born on 3rd February, 1963, in Bhopal in a Tamil family. His father, R. Govindrajan was an Indian Police Service officer who had topped his 1953 batch. Because of his father's transferable job, Dr. Raghuram Rajan has had his early education in different places. In 1970, when his father was posted to Sri Lanka, Dr. Raghuram Rajan missed the school year. After Sri Lanka, his father was posted to Belgium, where Dr. Rajan attended a French school. The family returned to India in 1974. From 1974 to 1981, he attended Delhi Public School. In 1981, he enrolled at the Indian Institute of Technology, Delhi for a bachelor's degree in electrical engineering. When he graduated in 1985, he was awarded the Director's medal as the 'Best all-round Student'. In 1987, he received the post graduate diploma in Business Management from the Indian Institute of Management, Ahmedabad, again earning a gold medal for academic performance. He joined the Tata Administrative Services as a management trainee, but left after a few months to join the doctoral program at the Sloan School of Management at Massachusetts Institute of Technology, USA. In 1991, he received a PhD for his thesis titled 'Essays on Banking'.

After his brilliant academic career, he joined as an Assistant Professor of Finance at the Booth School of Business at the University of Chicago, where he became a full Professor in 1995.

He has been a prolific writer on major economic and financial issues. He co-authored 'Saving Capitalism from the Capitalists' with Luigi Zingales, in 2003. In 2005, at the Federal Reserve annual Jackson Hole conference, he delivered a controversial paper titled 'Has Financial Development Made the World Riskier?'. Rajan argued that disaster might loom. He was criticized for misguided warnings. Following the 2008 economic crisis, Rajan's views came to be seen as prescient. His book 'Fault Lines : How Hidden Fractures Still Threaten the World Economy' won the Financial Times-Goldman Sachs prize for best business book in 2010.

In a similarly prescient way, Rajan who was the Governor of the Reserve Bank of India, had warned against the move for demonetization. In 2003, he was the youngest individual and the first, born in an emerging-market nation, to be appointed the Chief Economist at the International Monetary Fund. He held the position till December, 2006. In 2007, he was invited by the then Deputy Chairman of the Planning Commission to write a report on the next generation of financial sector reforms in India. In its report

titled ‘A Hundred Small Steps’, the Committee headed by Rajan, recommended that instead of focusing on a few large and politically controversial steps, India must ‘take a hundred small steps in the same direction’. In November, 2008, Rajan was appointed as Honorary Economic Advisor and in 2012, the Chief Economic Advisor to the Ministry of Finance. On 5th September, 2013, he took charge as Governor of the Reserve Bank of India. Rajan made curbing inflation, his primary focus. The retail inflation declined from 9.8% in September, 2013, to 3.78% in July, 2015. Under Rajan, RBI licensed two universal banks and approved eleven payment banks to extend banking services to the population still deprived of access to banking facilities. He was also responsible for the eventual formation of the Monetary Policy Committee which was given a specific mandate for controlling retail inflation. In September, 2016, he demitted the office of Governor, RBI and returned to the University of Chicago.

In 2017, he published the book titled ‘I do what I do’, which is a collection of speeches delivered during his stint as the Governor of the Reserve Bank of India. He has published numerous articles in financial and economic Journals. He is currently working on his next book, ‘The Third Pillar : How the State and Markets are Leaving Communities Behind’. The Research Papers in Economics project ranks Rajan among the world’s most influential economists.

He has won a large number of awards and honours for his insightful writings and his performance at the Central Bank. In November, 2011, he received the Infosys prize for Social Sciences. In 2013, he was awarded the Deutsche Bank prize in Financial Economics for his ground-breaking research work. In 2014, he was conferred the Best Central Bank Governor 2014 award by Euromoney Magazine and in the same year the Governor of the Year award was bestowed on him by the London-based financial journal, Central Banking.

He was President of the American Finance Association in 2011. He is a member of the American Academy of Arts and Sciences and the Group of Thirty. In 2016, he was named by Time Magazine in its list of 100 most influential people in the world.

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai is proud to confer the Yashwantrao Chavan National Award for the year 2018 on Dr. Raghuram Rajan for his outstanding contribution to national integration, democratic values and social and economic development of India.

Dr. Anil Kakodkar
President
Panel of Jury

Sharad Pawar
Chairman
Yashwantrao Chavan Pratishthan,
Mumbai

Mumbai
12th March, 2019



Yashwantrao Chavan Pratishthan
Mumbai, India

# YASHWANTRAO CHAVAN SPECIAL RECOGNITION AWARD 2019, INDIA



**WILLIAM F. AUSTIN**
STARKEY HEARING FOUNDATION

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai Indiaconfers Yashwantrao Chavan Special Recognition Award for year 2019 on Mr. William F. Austin. Mr. William F. Austin, as most know him — is the founder, principal owner, Chairman and Chief Executive Officer of Starkey Hearing Technologies. Mr. William F. Austin touches lives and makes the world a better place.

In 1961, to help pay for college and with the goal of attending medical school to become a missionary doctor, Mr. William F. started in the hearing aid industry making ear pieces in his uncle's shop. His role quickly expanded, and he began designing hearing aids as well. One day, Mr. William F. worked tirelessly to fashion a hearing aid for a patient with profound difficulties who others had given up on. The joy in the man's eyes when he could finally hear better set Mr. William F. on his life's mission — to help the world hear. Mr. William F. then realized that through this industry, he could impact and help more lives than by working alone as a missionary doctor, and that his life would have a greater value. So, Mr. William F. started his own company in the 1960s. In 1970, Mr. William F. Austin purchased a three-employee company for $13,000 called Starkey Laboratories, which was making ear moulds for Mr. William F.'s business. Mr. William F. then folded his larger operation under the Starkey name, and the rest is history.

More than 50 years later, Starkey Hearing Technologies continues to set itself apart in the industry through its quality, service and innovative hearing aids. Starkey has always stayed ahead of the times with its cutting-edge technology. Now in his sixth decade in the industry, Mr. William F. is at his happiest when personally providing and assisting people with hearing aids.

Mr. William F. Austin's generosity and steadfast belief that the gift of hearing can change the world led him to found Starkey Hearing Foundation, a charity that gives free hearing aids to those in need around the world. Mr. William F. and his wife, Tani Austin, are the biggest volunteers, traveling with the Foundation on dozens of hearing missions every year. Alongside audiologists, hearing professionals and other volunteers, Mr. William F. has helped the poor on missions in more than 100 countries and on every continent except Antarctica, often devoting the majority of his year to the Foundation's efforts and mission trips.

This passion has also touched India in fifty cities and about one hundred thousand Indian beneficiaries are now experiencing the joy of hearing. In 2018, Starkey India, created a Himalayan record, as recognized by Guinness World Records, for fitting 4,840 patients with hearing aids in the clocked time of eight hours in Balewadi, Pune, many being children from deaf schools.

Starkey Hearing Foundation employs people full-time in more than 60 countries to provide support and other services to those the Foundation serves. This empowers people in underprivileged countries to know that they too can make a difference. Starkey Institute trains local people in Africa to become audiologists.

In addition to the young children in third-world countries he has witnessed hear for the first time, Mr. William F. has personally assisted five U.S. Presidents, two Popes, Mother Teresa, and Nelson Mandela with Starkey hearing aids, to name a few. However, no matter a person's status or financial means, Mr. William F. treats every person with the same respect and kindness.

Mr. Mr. William F.'s idol is Albert Schweitzer. Hisphilosophy, 'so the world may hear', transcends the concept of the hearing aid. His focus on reaching the unreached is not limited to hearing impaired individuals. He has lived his motto, "Alone we can't do much. Together we can change the world."

For his philanthropic efforts and volunteering, he has been awarded the Albert Schweitzer Leadership Award, Mexico's Aztec Eagle Award, the Jefferson Award, the National Caring Award, and the AG Bell Lifetime Achievement Award, to name a few. The United Nations even named him the first Goodwill Global Ambassador for Ear and Hearing Health.

This citation is awarded by YashwantraoChavan Pratishthan, Mumbai in recognition of the outstanding endeavour of Mr. Mr. William F. Austin and his team to give the gift of hearing to those who are deprived of it.

12 March 2019

SHARAD PAWAR
President, Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai, India

S.G. KALE
Secretory, Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai, India

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ सहसंयोजक विश्वास ठाकूर, समन्वयक विजय कान्हेकर, संघटक निलेश राऊत हे पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

**'फिल्मिंगो लघुपट महोत्सव व कार्यशाळा'**

नाटक, एकांकिका, प्रायोगिक रंगभूमी यांसारख्या कलाक्षेत्रांचा विस्तृत अनुभव असलेली मुंबईस्थित सुप्रसिद्ध संस्था प्रयोग, मालाड ने चित्रपट समीक्षक व अभ्यासक श्री. अशोक राणे यांच्या सहकार्याने 'फिल्मिंगो लघुपट महोत्सव व कार्यशाळा' या अभिनव संकल्पनेची मुहूर्तमेढ रोवली आहे. नव्या प्रतिभेला प्रोत्साहन देणे, त्यांना आपली कला सादर करण्यासाठी आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जागतिक स्तरावरील श्रोत्यांपर्यंत पोहोचण्यास मदत करणे हे फिल्मिंगोचे ध्येय आहे.

१५ डिसेंबर व १६ डिसेंबर २०१८ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र, चर्चगेट, मुंबई येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. श्रीमती ज्योती ठाकरे, अध्यक्ष आणि श्रीमती श्रद्धा जोशी, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ या सोहळ्यास उपस्थित होत्या.

फिल्मिंगोच्या पहिल्या दोन आवृत्त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे आणि लघुपट केंद्र, कान्स येथे चित्रपट उद्योगाकडून फिल्मिंगोचे कौतुक करण्यात येत आहे. फिल्मिंगो २०१८ ला भारत आणि इतर देशांमधील २७५ लघुपटांकडून प्रचंड प्रतिसाद लाभला, ज्यापैकी ५३ लघुपटांची अधिकृत स्क्रीनिंगसाठी निवड करण्यात आली. पहिले ५ पारितोषिकप्राप्त लघुपट फिल्मिंगोद्वारे प्रतिष्ठेच्या कान्स लघुपट केंद्राकडे पाठविले जातील. या महोत्सवासाठी एकूण ३ लाखाची बक्षिसे होती. त्यात रोख पारितोषिक, चषक आणि कान्स लघुपट महोत्सवाचे प्रायोजकत्व यांचा समावेश होता. बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१८, जर्मनी यांच्या यंग टॅलेन्ट कॅम्पसमध्ये सहभागी होण्यासाठी चित्रपट निर्मात्यांना तयार करणे हेही फिल्मिंगोचे ध्येय होतं.

फिल्मिंगो २०१८ महोत्सवाच्या नियोजनाचा भाग म्हणून आम्ही प्रेक्षकांसाठी २ खास सत्रांचे आयोजन केले होते. शनिवार दिनांक १५ डिसेंबर रोजी महिलांनी तयार केलेल्या किंवा स्त्रीजीवनाशी संबंधित पुरस्कारप्राप्त लघुपटांचे खास स्क्रीनिंग आयोजित केले होते. या चित्रपटांची निवड खास टीमने केली असून माविम म्हणजे महिला आर्थिक विकास महामंडळाने त्यास साहाय्य केले होते.

तसेच १६ डिसेंबर रोजी आम्ही बाल प्रेक्षकांसाठी बनवलेल्या आणि आमच्या खास समितीने निवडलेल्या पुरस्कारप्राप्त लघुपटांचे स्क्रीनिंग करण्यात आले. मुलांसाठीचे हे लघुपट आबालवृद्धांना आवडतील अशा विविध विषयांवर बनवलेले होते.

फिल्मिंगोचा असा विश्वास आहे, की लघुपट हे चित्रपट निर्मात्यांसाठी विविध भावना व्यक्त करण्यासाठी आणि सांगायला कठीण अशा गोष्टी सांगण्यासाठी उत्कृष्ट माध्यम आहे, आणि ही दोन सत्रे म्हणजे हे विलक्षण लघुपट अनुरूप प्रेक्षकवर्गासमोर आणण्याचा प्रयत्न होता.

पुरस्कारामध्ये उत्कृष्ट लघुपटासाठी पहिले व दुसरे पारितोषिक तसेच सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, लेखक, सिनेमॅटोग्राफर, संकलक, अभिनेता व अभिनेत्री यांच्यासाठी ६ वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून अवधूत परळकर, अमरजीत आमले, मनोज, समीर मोदी व योगेश गोगटे यांसारख्या प्रथितयश व्यक्ती होत्या. समीर मोदी यांचा दि. १५ डिसेंबर रोजी झालेला मास्टरक्लास हा या कार्यक्रमाचा खास आकर्षणबिंदू होता.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विख्यात अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी या प्रमुख अतिथी म्हणून आणि व्ही. शांताराम फाऊंडेशन मोशन पिक्चर सायंटीफिक फाऊंडेशन, एशियन फिल्म फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. किरण शांताराम हे खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

### यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे राज्यस्तरीय युवा पुरस्कार

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई – नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने मागील एकवीस वर्षांपासून सामाजिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक युवतींना राज्यस्तरीय युवा पुरस्कार दिले जातात. यंदाच्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार–२०१९ ची घोषणा करण्यात आलेली असून यामध्ये राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार व राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कारांचा समावेश आहे.

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय विशेष युवा क्रीडा पुरस्काराकरिता डोंबिवलीतील वेदांगी विवेक कुलकर्णी या एकोणवीस वर्षीय सायकलपटूची निवड करण्यात आलेली आहे. वेदांगीने आपल्या सायकलस्वारीने संपूर्ण जगभरात भारताचे नाव उंचावले असून १५९ दिवसात सायकलवरून २९ हजार किलोमिटरचे अंतर पूर्ण करीत तिने जगाला प्रदक्षिणा घातली आहे. गिनीजच्या नियमानुसार सायकलवरून जगप्रदक्षिणा करताना २९ हजार किलोमीटर (विषुववृत्तावरील भूभागाएवढे) अंतर पूर्ण करावे लागते. वेदांगीने ऑस्ट्रेलियातून सायकलिंग सुरू केल्यानंतर न्यूझिलंड, कॅनडा, ग्रीनलॅण्ड, स्पेन, फिनलॅण्ड, रशिया आणि भारत अशा चौदा देशांमध्ये तिने सायकल चालविली. स्पेनमध्ये तिच्यावर चाकू हल्ला झाला. पैसे लुटले गेले. आईसलॅण्डमध्ये ती हिमवादळातही सापडली, पण तिने जिद्द सोडली नाही. विशेष म्हणजे तिची ही जगप्रदक्षिणा शिक्षण सुरू असतानाच झाली आहे. करीअरच्या मानसिकतेतून बाहेर जाऊन केलेली वेदांगीची ही धडपड उल्लेखनीय व प्रेरणादायी आहे. या कारणास्तव प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने वेदांगीची यंदाच्या विशेष युवा क्रीडा पुरस्कारासाठी निवड केलेली आहे. ५१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार (युवक) या पुरस्काराकरिता अक्कलकुवा, जि. नंदुरबार येथील धावपटू किसन नरशी तडवी याची निवड करण्यात आलेली आहे. बावीस वर्षीय किसनने अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून येऊन जगभरात भारताचे नाव उंचावले आहे. किसनने ५२ व्या नॅशनल क्रॉसकंट्री स्पर्धेत विजेतेपद मिळविले असून तैपई, चीन येथे झालेल्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम मध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. त्याचबरोबर ३३व्या नॅशनल ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पीयनशिपमध्ये पाच हजार मिटर व दहा हजार मिटर स्पर्धेत किसनने विजेतेपद पटकावलेले आहे. किसन सध्या २०२० सालच्या ऑलिम्पिक गेमची तयारी करीत असून भारताला किसनकडून त्याच्या खेळ प्रकारात मोठ्या अपेक्षा आहेत. २१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे किसनला मिळालेल्या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार (युवती) २०१९ची मानकरी औरंगाबाद येथील युवा बुद्धिबळपटू साक्षी दिनेश चितलांगे ही ठरली असून अवघ्या १५ व्या वर्षी शिवछत्रपती पुरस्कार मिळविणारी सर्वांत युवा खेळाडू साक्षी ठरलेली आहे. आठ आंतरराष्ट्रीय, अकरा राष्ट्रीय व अनेक राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पदके जिंकून साक्षीने महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. २०१५ साली जागतिक बुद्धिबळ संघटनेकडून (एफआयडीई) वूमन इंटरनॅशनल मास्टर हा किताब तसेच याच संघटनेकडून २०१४ साली वूमन फिडे मास्टर हा किताब साक्षीने पटकाविलेला आहे. २०१७ साली एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडियाकडून त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार देखील साक्षीने पटकाविलेला आहे. २१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे साक्षीला मिळालेल्या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार (युवक) २०१९ करिता नाशिक येथील युवा कार्यकर्ता अभिजीत सदानंद दिघावकर याची निवड करण्यात आलेली आहे. अभिजीतने पर्यावरण विषयक व वृक्षतोडीच्या विरोधात उल्लेखनीय कार्य केलेले आहे. तळागाळातील गरजूंना आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून आरोग्य क्षेत्रातील विविध संस्थांना सोबत घेऊन महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करून अभिजीतने गरजूंना आरोग्य विषयक लाभ मिळवून दिलेले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय युवक समितीने आयोजित केलेल्या

परिषदेमध्ये अभिजीतने भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. २१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे अभिजितला मिळालेल्या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार (युवती) २०१९ करिता मंगरूळपीर, जि. वाशिम येथील स्नेहल चौधरी कदम या युवतीची निवड करण्यात आलेली आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण झालेल्या स्नेहलने आपल्या नोकरीचा त्याग करून ग्रामीण भागातील आपल्या भगिनींकरिता क्षितीज संस्थेच्या माध्यमातून युवती व महिलांच्या मासिक पाळी संदर्भात मागील पाच वर्षांपासून 'ब्लिड द सायलेन्स' या अभियानाअंतर्गत स्वच्छता नियोजनाचे अनेक उपक्रम राबविले आहेत. आजवर विविध शाळा, कॉलेज, ग्रामीण भागात, आदिवासी भागात, शहरी भागातील वस्त्या यामध्ये दहा हजार युवती व महिलांसमवेत संवाद साधून त्यांना मासिक पाळीत घ्यावयाची काळजी याबाबत महत्त्व पटवून दिले आहे. २१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे स्नेहलला मिळालेल्या पुरस्काराचे स्वरूप आहे.

निवड झालेल्या सर्व पुरस्कारार्थींचे प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने अभिनंदन केले. पुणे येथे प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते या पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१७–१८' च्या विजयी महाविद्यालयांची नावे घोषित करण्यात आली आहेत. राज्यातील विद्यार्थ्यांच्या विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब असंख्य महाविद्यालयीन नियतकालिकांमध्ये पडलेले पहावयास मिळते या नियतकालिकांमध्ये आपले लेख, कविता लिहणाऱ्या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे साहित्यिक घडत असतात. युवांना आपले मत मांडायची संधी देतानाच त्यांच्यातील कलागुणांना वाव देणाऱ्या नियतकालिकांचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट नियतकालिकांचा सन्मान करणारा हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे.

यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणा, जि. कोल्हापूर च्या 'वारणा' या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला असून रु. १०,०००/– चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. द्वितीय क्रमांक के. जे. सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग आणि इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी या महाविद्यालयाच्या 'ऑरा २०१७' या नियतकालिकास मिळाला आहे. रु. ७,०००/– चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तृतीय क्रमांक कमला नेहरू आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय नागपूर च्या 'स्त्रियांची आत्मचरित्रे २०१७' या नियतकालिकास मिळाला असून रु. ५,०००/– चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ यांच्या 'तरंग' व कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय, परभणी यांच्या 'मानवता' या दोन नियतकालिकास उत्तेजनार्थ पारितोषिके जाहीर झाली आहेत. रु. ३,०००/– चा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रत्येकी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

निवड झालेल्या सर्व पुरस्कारार्थी महाविद्यालयांचे प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने अभिनंदन केले. सदर पुरस्कार त्या–त्या महाविद्यालयात जाऊन समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले.

## विज्ञानगंगा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानगंगा ही व्याख्यानमाला मार्च, २०१६ पासून दरमहा चालू असून याला पन्नासपासून दोनशेपर्यन्त श्रोत्यांची उपस्थिती असते. या उपस्थितांत जसे सामान्य श्रोते असतात, तसे अनेक वेळा शास्त्रज्ञ आणि उच्च सनदी अधिकारी यांनी उपस्थिती लावली आहे. त्यात जसे श्री.द.म.सुकथनकर काही वेळा उपस्थित राहिले, तसे डॉ. जयराज फाटक हेही अनेक वेळा उपस्थित राहिले. व्याख्यानाला मिश्र समुदाय असतो. त्यात तरुणांची उपस्थितीही उल्लेखनीय अशी असते.

गेल्या सहा महिन्यांचा आढावा घेता असे दिसते की, जून, २०१८ मध्ये मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल

टेक्नोलॉजीचे प्राध्यापक रा.ना.जगताप यांचे 'प्लास्टीक पर्यावरणाला घातक आहे का?' यावर व्याख्यान झाले. महाराष्ट्र शासनाने आणलेल्या प्लास्टीक बंदीच्या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाला श्रोत्यांनी मोठी गर्दी केली होती. प्रा. जगताप यांनी गेल्या पन्नास वर्षात भारतात प्रामुख्याने वापरात आलेले प्लास्टीकचे वेगवेगळे प्रकार सांगितले. व्यवहाराच्या विविध क्षेत्रात प्लास्टीक कसे उपयोगी पडते आणि त्याच्याशिवाय आपल्याला कसा पर्याय नाही हेही त्यांनी सांगितले. ते सांगत असताना भारतीय माणसाने रस्त्यावर कचरा टाकण्याची सवय बदलण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. यात काच, धातू, कापड, रबर अशा गोष्टींबरोबर प्लास्टिक हा पदार्थही आपण मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर टाकत असल्याने आणि तो लवकर नष्ट होत नसल्याने त्याचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालल्याने सरकारने सध्या स्वीकारलेले धोरण ही टोकाची पण उपयोगी पडणारी पायरी असल्याचे त्यांनी सांगितले.

जुलै, २०१८ मध्ये पुण्याच्या 'आयसर' संस्थेतील श्री.अशोक रुपनेर यांनी घरगुती टाकाऊ वस्तूंचा वापर करून विज्ञान खेळणी बनवण्याची प्रात्यक्षिके दिली व त्यातून विज्ञान शिक्षण कसे होते हे दाखवले. त्यासाठी चव्हाण केंद्रात चेम्बूरच्या 'आमची शाळा' येथील ५० विद्यार्थी आले होते. याच कार्यक्रमाचा एक भाग मराठी विज्ञान परिषदेच्या चुनाभट्टी येथील कार्यालयात चुनाभट्टीच्या एका शाळेतील ५० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाला. मण्यांच्या सहाय्याने बनवलेल्या वर्तुळाचा परीघ आणि व्यास हे २२/७ या प्रमाणात कसे असतात हे त्यांनी सप्रयोग दाखवल्याने विद्यार्थी ते आता कधीच विसरणार नाहीत.

ऑगस्ट, २०१८ च्या कार्यक्रमात टी.आय.एफ.आर.च्या महिला शास्त्रज्ञ डॉ.विदिता वैद्य यांनी 'भावनिक मेंदू' या विषयावर व्याख्यान दिले.त्यांनी मेंदू शरीराच्या विविध हालचालींवर कसे नियंत्रण ठेवतो आणि त्यात मनाच्या भावनिक भागावर असलेले मेंदूचे नियंत्रण व त्यावर चालू असलेले संशोधन याचा त्यांनी विस्तृत उहापोह केला.

सप्टेंबर, २०१८ च्या कार्यक्रमात पुण्याच्या एम.के. सी.एल. संस्थेचे श्री.सचिन सातपुते यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर व्याख्यान दिले. संगणक, भ्रमणध्वनी आणि त्यावरील विविध सोफ्टवेअर कार्यक्रमांद्वारे आपली अनेक कामे कशी सुकरपणे होत आहेत, यावर त्यांनी मार्गदर्शन केले.

ऑक्टोबर, २०१८ च्या कार्यक्रमात शेतीशास्त्रज्ञ डॉ. आनंद कर्वे यांनी शेतात निर्माण होणारा घनकचरा व त्याचे निर्मूलन कसे करायचे, शेताची जमीन जाळू नये, कारण जमिनीत असलेले सूक्ष्मजन्तू त्यामुळे नष्ट होऊन पिकाचे कसे नुकसान होते यावर माहिती दिली.

नोव्हेंबर, २०१८ च्या कार्यक्रमात नासाचे शास्त्रज्ञ डॉ.मुकुंद मोहरीर यांनी 'कायमचे आणि टिकाऊ समाधान म्हणजे काय?' याचे विवेचन भगवद्गीतेतील अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. काही वर्षापूर्वी भूतानच्या राजाला त्यांचे सकल राष्ट्रीय उत्पन्न किती? असे विचारले असता, ते म्हणाले होते, आमचे सकल राष्ट्रीय उत्पन्न विचारू नका, सकल राष्ट्रीय समाधान किती ते विचारा. आमच्या राष्ट्रातील सर्व लोक सुखी आहेत. इतर देशही आता हा निकष वापरू लागले आहेत.

'विज्ञानगंगा' कार्यक्रमांतर्गत तेहतीसावे व्याख्यान पर्यावरण तज्ञ डॉ. शिवानी ढगे यांचे 'जागतिक वाढते तापमान' या विषयावर ७ डिसेंबर २०१८ रोजी चव्हाण सेंटरच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित केले होते. आपल्या व्याख्यानात डॉ. ढगे यांनी खालील गोष्टींचा परामर्ष घेतला:

- पर्यावरण, हवा व हवामान या तीन संकल्पना समजावून सांगताना त्यांनी हवा आणि हवामान यातील फरक अधोरेखित केला.
- पृथ्वीभोवतालच्या वातावरणात अस्तित्वात असलेल्या हरितगृह वायुंबद्दल त्यांनी विस्ताराने माहिती दिली व त्यांचा जागतिक तापमानावर होणारा परिणामही विषद केला.
- हरितगृह वायुंचे स्त्रोत,त्यांची वाढती पातळी, जागतिक पातळीवरील वाढत्या तापमानासंदर्भातील त्यांचे महत्व, त्यांचे योग्य नियंत्रण न केल्यास होणारे संभाव्य परिणाम याबद्दल माहिती दिली.
- जागतिक पातळीवरील वाढत्या तापमानाचे येऊ घातलेले उग्र संकट व हे संकट येण्यामधील निसर्गाचा वाटा, मानवाचा वाटा व त्यांचा संयुक्त वाटा याचेही विवेचन केले.
- जागतिक पातळीवरील वाढत्या तापमानाची समस्या

नियंत्रणात ठेवण्यासाठी आय. पी सी सी. या आंतरराष्ट्रीय संस्थेची झालेली स्थापना व तिचे कार्य यावरही त्या विस्ताराने बोलल्या.

एकूणच व्याख्यान अत्यंत माहितीपूर्ण व आशयसंपन्न झाले. 'जगभरातील वाढते तापमान' या समस्येबाबत लोकजागृती निर्माण करण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न होता.

विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत चौतिसावे व्याख्यान औषधशास्त्रज्ञ डॉ. उर्मिला जोशी यांचे 'जेनेरिक औषधे'या विषयावर दिनांक. १६ जानेवारी २०१९ रोजी चव्हाण सेंटरच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित केले होते. आपल्या व्याख्यानात डॉ. जोशी यांनी खालील मुद्यांवर विवेचन केले.

- सर्वप्रथम औषधांबद्दलची प्राथमिक माहिती त्यांनी दिली, त्यात प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश होता:

  औषधाचा मूळ घटक हा पावडर अथवा पूड या स्वरूपात असतो व तो सर्वसामान्यपणे चवीस कडू असून विघटनशील असतो. यासाठी त्याबरोबर इतर काही घटकांचे मिश्रण करून ते गोळ्या (Tablets), सिरप अशा प्रकारच्या स्वरूपात आणून बाजारात उपलब्ध केले जाते.

- बाजारात उपलब्ध असणाऱ्या काही औषधांना दोन प्रकारची नावे असतात. जेनेरिक नांव व ब्रँडेड नांव. जेनेरिक नावाने विकली जाणारी औषधे ही जेनेरिक औषधे व ब्रँडेड नावाने विकली जाणारी औषधे ही ब्रँडेड औषधे.

- औषध संशोधनाची प्रक्रिया अत्यंत खर्चिक असते. त्यामुळे औषध कंपनी या खर्चाचा परतावा मिळविण्यासाठी त्यांनी बनविलेल्या औषधाचे पेटंट घेते. पेटंट घेतल्यावर ते औषध विकायचे हक्क वीस वर्षे त्याच कंपनीला असतात. वीस वर्षानंतर इतर कंपन्या ते औषध तयार करून विकू शकतात व अशा तऱ्हेने पेटंटची मुदत संपल्यावर इतर कंपन्या तेच औषध बाजारात आणतात, त्यास जेनेरिक औषध असे संबोधले जाते. या कंपन्यांचा त्या औषधावरील संशोधनाचा खर्च अल्प असल्यामुळे ते स्वस्त किंमतीत उपलब्ध होऊ शकते. म्हणून जेनेरिक औषधे ब्रँडेड औषधांपेक्षा बरीच स्वस्त असतात.

- साधारणपणे औषध संशोधनाची प्रक्रिया समजावून सांगताना त्यातील विविध टप्पे, त्यावर येणारा खर्च इत्यादी गोष्टींचे विवेचनही त्यांनी केले.

- औषधनिर्मिती संदर्भात स्वातंत्र्योत्तर काळातील साधारणपणे १९५० ते १९९० या काळाचा आढावा घेताना भारतातील औषध उद्योगाची दमदार वाटचाल झाल्याचे त्यांनी नमूद केले. यांसदर्भात नवीन औषधे बाजारात आणण्यात भारताचा वाटा नगण्य पण कमी खर्चिक प्रक्रियांद्वारे औषध उत्पादन करण्यात भारत अग्रेसर असल्याचेही त्यांनी सांगितले. परिणामी भारतातील औषधांच्या किंमती इतर देशांच्या तुलनेत कमी असल्याचे उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केले.

- भारतातल्या कंपन्या जी औषधे विकतात ती सगळी जेनेरिक औषधे असतात; पण त्यातली काही ब्रँड नावाने विकली जातात व त्यांना ब्रँडेड जेनेरिक औषधे असे संबोधले जाते. या दोहोंतील फरक त्यांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केला.

- ब्रँडेड औषधांसाठी आग्रह का धरला जातो या मुद्याचे विवेचन करताना जेनेरिक औषधांबाबत उपस्थित करण्यात येणाऱ्या शंका, या शंका कोणाकडून उपस्थित केल्या जातात व यातील तथ्य याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी केले.

- जेनेरिक औषधे लिहून देण्याबाबत भारत सरकारचा आग्रह, अमेरिकेतील जेनेरिक औषधांची परिस्थिती व जेनेरिक औषधांची पुढील वाटचाल या मुद्यांवरही त्यांनी विवेचन केले.

  जेनेरिक औषधांबाबत लोंकाना माहिती करून देणे व यासंबंधातील गैरसमज दूर करण्यासाठी हा एक स्तुत्य प्रयत्न होता.

# ९वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१९

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने दिनांक २० जानेवारी ते २५ जानेवारी २०१९ दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे नववा 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१९' आयोजित करण्यात आला होता.

महोत्सवात एकूण ६० विविध भाषेतील व विविध देशातील निवडक चित्रपट दाखविण्यात आले. महोत्सवाचे उद्घाटन दि. २० जानेवारी २०१९ रोजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. श्याम बेनेगल यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. महोत्सवात ६ शॉर्ट फिल्म व १६ ॲनिमेशन फिल्म दाखविण्यात आल्या. महोत्सवाची सुरुवात यु.एस.ए. मधील 'ए ट्रान्सलेटर' या चित्रपटाने झाली. महोत्सवाची सांगता 'व्हायरस ट्रॉपिकल' या चित्रपटाने झाली.

२४ जानेवारी, २०१९ रोजी महोत्सवात प्रसिद्ध अभिनेत्री व दिग्दर्शक, श्रीमती नंदिता दास यांच्या 'मंटो' या चित्रपट प्रदर्शनानंतर त्यांचे 'स्मिता पाटील मेमोरिअल लेक्चर' आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला युवकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

वरील सहाही दिवस चित्रपट महोत्सवात तरुण वर्गाचा व ज्येष्ठांचा अतिशय चांगला प्रतिसाद लाभला. यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची वर्तमानपत्रात अतिशय चांगल्या प्रकारे प्रसिद्धी झाली. चित्रपट महोत्सव मुख्य सभागृह, रंगस्वर सभागृह व सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता.



१४ एप्रिल १९४६ पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडवण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाच्या संघटक म्हणून सौ. सुकेशनी मर्चंडे–शेवडे या काम पाहतात.

मंचामार्फत महाराष्ट्रातील अपंगांसाठी विविध जिल्ह्यांत मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन केले जाते. दिव्यांगांची पूर्वतपासणी करून त्यांना आवश्यक त्या कृत्रिम साधनांसाठी किंवा अवयवासाठी त्यांचे मोजमाप घेऊन मोफत साहित्य उपलब्ध करवून दिले जाते. उदा. जयपूर फुट, कॅलिपर, कुबडी, एल्बो क्रचेस, वॉकिंग स्टीक, वॉकर, सर्जिकल शूज, ट्रायसिकल, व्हीलचेअर, स्प्लिंट्स, कमोड चेअर, सी.पी. चेअर, एम.आर. कीट, ब्रेल कीट, अंध काठी, अंध गॉगल, श्रवणयंत्र, बेल्ट्स, आदी साहित्य. सन २००९ पासून ते आजपर्यंत शासकीय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एकूण ६७,६३८ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचा थेट लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मंचाच्या वतीने अपंगांच्या विविध विषयांवर /समस्यांवर नियमित चर्चा व कार्यशाळेचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येते. मार्गदर्शन व सल्लाही दिला जातो.

**बालेवाडी, जिल्हा पुणे : दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९: श्रवणबाधित ज्येष्ठ नागरिक व कर्णबधिर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर :** अपंग हक्क विकास मंच, स्टार की फाउंडेशन–अमेरीका, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, आरव्हीएस एज्युकेशनल ॲण्ड चॅरिटेबल फाउंडेशन मुंबई, ठाकरसी ग्रुप मुंबई, बी.जी. शिर्के ग्रुप, मुंबई आणि महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ ऑक्टोबर,२०१८ रोजी पुणे येथे बालेवाडी क्रीडा संकुलात महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यांतील एकूण ६ हजार कर्णबधिर विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत अत्याधुनिक डिजिटल श्रवणयंत्र बसविण्यात आली. यावेळी दुपारी १२ ते सायं. ६ या कालावधीमध्ये ४ हजार ८४० कर्णबधिरांना कर्णयंत्र लाऊन 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' ची नोंद झाली.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अमेरिकेहून स्टार की संस्थेचे अध्यक्ष बिल ऑस्टीन आणि त्यांच्या पत्नी टॅनी ऑस्टीन आणि इतर ३५ कार्यकर्त्यांची टीम स्वत: सहभागी झाली होती. माजी क्रिकेटपटू मा. रवि शास्त्री, मा. शरदचंद्रजी पवार, (अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान) माजी उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार, मा. खा. श्रीमती सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम घेण्यात आला तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अपंग हक्क विकास मंच मुंबईचे संयोजक मा. श्री. विजय कान्हेकर, मा.श्री. दत्ता बाळसराफ, मा. विश्वास ठाकूर, मा. श्री. निलेश राऊत, अपंग हक्क विकास मंच मुंबईचे समन्वयक मा. श्री. सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, डॉ. कल्याणी मांडके आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्या प्रतिष्ठान, बारामती येथील नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींचे सहकार्य लाभले. पुण्यातील विशेष शाळांचे शिक्षक व मदतनीस, महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील एकूण १५०० स्वयंसेवक, कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले. विभागीय केंद्रातील स्वयंसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच स्थानिक पातळीवर पोलीस सुरक्षा दल, अग्निशमन दल, रुग्णालय, यांनीही खूप मोठे सहकार्य दिले. ताईंनी आपल्या भाषणात या सर्वांचे आणि सर्व टीमचे आभार मानले. आपल्या सहकार्याशिवाय ही सफलता अशक्य आहे, असे त्या म्हणाल्या.

**बारामती, पुणे : दिनांक ८, ९ व १० जानेवारी, २०१९: ज्येष्ठ नागरिकांना वयोश्री योजनेअंतर्गत मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व**

**मोजमाप शिबिर :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, सामाजिक न्याय एवं अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार भारतीय कृत्रिम अंग निर्माण (अलिमको) कानपूर, जिल्हा परिषद, पुणे जिल्हा परिषद, आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील ३ तालुक्यांमध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी 'वयोश्री योजने'अंतर्गत ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप करण्यासाठी नोंदणी, तपासणी व मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**सविस्तर माहिती पुढील तक्त्याप्रमाणे :-**

| अ.क्र. | वार | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | मंगळवार | ०८ जानेवारी,२०१९ | खडकवासला |
| २. | बुधवार | ०९ जानेवारी,२०१९ | बारामती |
| ३. | गुरुवार | १० जानेवारी,२०१९ | दौंड |

अनुक्रमे या ठिकाणी सकाळी १० ते सायं ६ या वेळेत करण्यात आले. शिबिरात एकूण १२ हजार ज्येष्ठ नागरिकांचा मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधने वाटप करण्यासाठी नोंदणी, तपासणी आणि मोजमाप करण्यात आले.

**'दिव्यांग कट्टा' :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचातर्फे नोव्हेंबर,२०१७ रोजी दिव्यांगांसाठी 'दिव्यांग कट्टा' सुरू करण्यात आला आहे. हा कट्टा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी आयोजित केला जातो. सध्या दिव्यांग कट्ट्याच्या माध्यमातून दिव्यांग स्टॉल धारकांच्या समस्या व त्यांना येणाऱ्या अडचणी या विषयाचा मागोवा घेऊन पाठपुरावा केला जात आहे. या दिव्यांग कट्ट्याच्या आयोजनाचे काम शमीम खान (संघटक-अपंग हक्क विकास मंच) हे पाहतात.

**अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षापासून नियमितपणे दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी चर्चासत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून अंधांना त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनपर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसे सोप्या पध्दतीने जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते. **दिव्यांगांसाठी वर्ष २०१८-१९ मध्ये केलेल्या कामाची थोडक्यात माहिती पुढील तक्त्यात दिली आहे :-**

| अ. क्र. | योजनेचे नाव | शिबिराचे नाव | एकूण लाभार्थी | योजनेसाठी एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| १. | एडिप योजना | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर | ३,२०० | २.५ कोटी |
| २. | वयोश्री योजना | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर | ३,५०० | ३.५ कोटी |
| ३. | वयोश्री योजना | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर | १२,००० | १२ कोटी |
| ४. | खासदार निधीतून खर्च | मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर | १५० | १० लक्ष |
| | | | १८,८५० एकूण लाभार्थी | १८.१० कोटी एकूण खर्च |
| १. | सी.एस.आर. | मोफत आधुनिक श्रवणयंत्र वाटप शिबिर (अमेरिकन टीम) | ६००० | १५ कोटी |
| २. | स्टार की फाउंडशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | मोफत आधुनिक श्रवणयंत्र वाटप शिबिर (इंडिया टीम) | १२०० | ४ कोटी |

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देण्याचे काम २००८ पासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचाने केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे शिक्षण विषयक कार्यक्रम शिक्षण विकास मंचामार्फत आयोजित केले जातात. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. खा. सुप्रिया सुळे या आहेत. डॉ. वसंत काळपांडे मुख्य संयोजक आणि बसंती रॉय या विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. दत्ता बाळसराफ हे संयोजक आहेत. नजमा काझी, शुभदा चौकर, सुरेश पाटील हे सदस्य आहेत. समन्वयक म्हणून माधव सूर्यवंशी, मीनल सावंत काम पाहतात. शिवाय विविध कार्यक्रमानुरूप महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे वेळोवेळी सहकार्य मिळत असते.

**''शिक्षण परिषद : नवी दिशा नवी आशा....''**

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून 'शालेय शिक्षण–आज, उद्या' या परिषदेचे आयोजन शिक्षण विकास मंचाने केले होते.

परिषदेचे प्रास्ताविक करताना डॉ. वसंत काळपांडे यांनी शिक्षण विकास मंचाची स्थापना आणि गेल्या दहा वर्षातील मंचाच्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. राज्याच्या शिक्षणामध्ये शिक्षण विकास मंचाने केलेली कामगिरी व भविष्यातील योजना याबाबत संवाद साधला.

शिक्षण विकास मंच आणि ज्ञानभाषा मराठी प्रतिष्ठान यांनी संयुक्तपणे संपादित केलेल्या ''सेमी इंग्रजी : का आणि कसे?'' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. मराठी शाळांना जगाच्या स्पर्धेत मुकाबला करायचा असेल तर सेमी इंग्रजी हा एक चांगला पर्याय आहे ही या पुस्तकामागची प्रेरणा असल्याचे बसंती रॉय यांनी स्पष्ट केले. सेमी इंग्रजी राबवणाऱ्या शाळांना पहिल्यांदाच मार्गदर्शन ठरावे इतके सुंदर पुस्तक यानिमित्ताने शिक्षण विकास मंच व ज्ञानभाषा मराठी प्रतिष्ठानने उपलब्ध करून दिले. सेमी इंग्रजीचा वापर करणाऱ्या शाळा आजपर्यंत स्वतः जमेल त्या पद्धतीने त्याचे नियोजन करताना दिसायच्या. अशावेळी या शाळांना मार्गदर्शक ठरेल असा हा ग्रंथ आहे. ही पोकळी भरण्याचे काम या मंचाने केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी परिषदेस उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. शालेय शिक्षण व पालक यांच्या संबंधावर त्यांनी प्रकाश टाकला.

अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन म्हणतात की, देशाच्या प्रगतीची मुख्य दोन चाके म्हणजे Health (आरोग्य), आणि Eduction (शिक्षण). आपल्या देशात खरंच या दोन बाबींवर जास्त जोर दिला जातो का? असा सवाल रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात उपस्थित केला. ते म्हणाले, सर्वसामान्यांच्या घरात ज्ञानगंगा पोहोचवायचे काम 'रयत'ने केले आहे. हे काम करत असताना स्वर्गीय यशवंतराव चव्हाण व माननीय शरद पवार यांच्या सहकार्याचा त्यांनी आदरपूर्वक उल्लेख केला. पालकांचा, शिक्षकांचा; मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाबाबत दृष्टिकोन काय असावा याबाबत त्यांनी आपले मत व्यक्त केले.

प्रत्येक मूल शाळेत येताना ज्ञान घेऊन येते. त्यामुळे, 'मुले म्हणजे मातीचा गोळा असतो' हा विचार आता बदलला पाहिजे, असे मत शिक्षणतज्ज्ञ सुबीर शुक्ला यांनी आपल्या मनोगतात मांडले. 'लर्निंग स्टेटस ऑफ द फ्युचर' या विषया–संदर्भाने आपले मत मांडताना श्री. शुक्ला यांनी शिक्षणातील रूढ कल्पनांना छेद दिला. शालेय शिक्षणात वेळापत्रकास अनन्यसाधारण महत्त्व असते. मुख्याध्यापक किंवा व्यवस्थापक याबाबत खूपच दक्ष असतात; पण टाईम टेबल हे मॅनेजमेंट फ्रेंडली आहे, ते एज्युकेशन फ्रेंडली नाही, हे त्यांनी पटवून दिले. कुठेही असे सांगितलेले नाही, की ३० मिनिटांचे गणित शिकावे, ३० मिनिटांचे इंग्रजी, ३० मिनिटांचे मराठी शिकावे. वेळापत्रकाचा फोलपणा विशद करताना त्यांनी मानसशास्त्रातील सिद्धांतानुसार प्रत्येक मूल हे वेगळे असताना सर्वांना एक मान्य पद्धत कशी लागू होईल? हा महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केला.

शालेय शिक्षणात शिक्षक हा महत्त्वपूर्ण घटक असून त्यांनी सातत्याने नवनवीन गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे व स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवले पाहिजे. मुलांच्या स्मरणशक्ती आधारे अधिक प्रश्न विचारण्यापेक्षा त्यांच्या विचाराला चालना मिळेल, असे प्रश्न मुलांना विचारावेत! उदाहरणार्थ तुझे मत काय? किंवा तुला काय वाटते? असे प्रश्न विचारले पाहिजेत असा आग्रह धरला.

‘निर्णय घेणे सोपे असते, पण तो राबवणे खरंच अवघड असते, कारण मी जेव्हा धोरण ठरवत असते तेव्हा राज्यकर्त्याच्या भूमिकेत असते पण जेव्हा माझ्यावर वेळ येते तेव्हा मात्र माझ्यातील आई जागी होते,’ हे द्वंद्व सातत्याने सुरू असते प्रांजळ कबुली मा. खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यावेळी दिली. ताईंच्या हस्ते डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार सूर्यकांत कुलकर्णी यांच्या ‘सल शिक्षणाचा’ या ग्रंथास देण्यात आला. हाच धागा पकडून त्यांनी वाचनसंस्कृतीकडे लक्ष वेधले. ‘जेव्हा आम्ही घरातून बाहेर जात असू तेव्हा पुस्तकांच्या दुकानात जात असू पण, आज आपण कुठे जातो? मुलांना वाचायला काय देतो? महागडे गॅझेट देण्यापेक्षा जीवनाला अर्थ देणारी पुस्तके मुलांना द्या,’ असे आवाहन त्यांनी केले. त्यांचे भाषण सहज व उत्स्फूर्त होते.

‘जडणघडण’चे संपादक डॉ. सागर देशपांडे यांनी अत्यंत खुमासदारपणे व जागोजागी विनोदाची पेरणी करत सभागृहाला ‘शिक्षक व पालक यांची भूमिका’ या विषयावर खिळवून ठेवले. त्यांचे हे कसब खरंच दाद देण्यासारखे होते. आजपर्यंतचा सारा अनुभव पणाला लावून, मिळालेल्या वेळेचा सदुपयोग कसा करायचा किंवा तो सत्कारणी कसा लावावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. देशपांडे यांचे भाषण म्हणावे लागेल.

‘शब्द पुस्तकात असतात; पण त्याचा अर्थ आयुष्यात असतो’ या विनोबांच्या वाक्याच्याभोवती त्यांचे व्याख्यान होते. खरेतर विनोबांचे हे विचार शिक्षणाचे बीज असायला हवे. ‘सोशल मीडियावर व्यक्त होणारी माणसे समोरासमोर आल्यावर अव्यक्त राहतात. मग मुलांशी काय बोलणार?’ असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पुढे त्यांनी सभागृहाला विचारले की, ‘तुम्ही सांगा, तुमच्या मुलाला शेवटची गोष्ट केव्हा सांगितली? खरं तर किती साधा प्रश्न! पण, उत्तर मात्र किती अवघड आहे. मुलांना आपण शब्द शिकवतो; पण त्याचे अर्थ शिकवत नाही. ज्ञान व माहिती यात फरक आहे हे समजून आपण शिकवायला हवे, असे आवाहन त्यांनी शिक्षकांना केले. शिक्षणातील सर्व घटक महत्त्वाचे असून त्याकडे लक्ष द्यायला हवे’ याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

यानंतर ‘शिक्षण काल–आज–उद्या’ या विषयावर निमंत्रितांनी प्रकाश टाकला. सुचिकांत वनारसे, हेमांगी जोशी, रेश्मा शिवडेकर, नजमा काझी त्यांनी त्यात सहभाग घेतला. त्यांना सुदाम कुंभार यांनी बोलते केले. यानंतर राज्यभरातून आलेल्या प्रतिनिधींनी खुल्या चर्चेत सहभाग घेतला व आपले मनोगत व्यक्त केले.

शेवटी शिक्षण विकास मंचाचे समन्वयक श्री माधव सूर्यवंशी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व परिषदेची सांगता झाली. ही परिषद कमालीची यशस्वी झाली ती नेटके संयोजन, त्यावर डॉ. बसंती रॉय व माधव सूर्यवंशी यांची काटेकोर देखरेख वैशाली सरवणकर यांच्या आकर्षक सूत्रसंचालनामुळे.

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान

## कार्यवृत्त

### क्लायमेट अँबॅसॅडर्स स्टुडंटस् कॉन्फरन्स

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने Climate Ambassadors Mumbai - Stockholm (A Climate Education and Action Project with Young People) असे शिर्षक असलेला शैक्षणिक प्रकल्प जानेवारी ते डिसेंबर २०१८ या कालावधीमध्ये मुंबई आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शाळांमध्ये राबवला गेला. या प्रकल्पामध्ये मुंबई आणि देवरुख येथील महाविद्यालये आणि शाळांमध्ये हवामान बदलविषयक विविध कृतीशील उपक्रम राबविण्यात आले. या प्रकल्पाकरता स्वीडनमधील 'क्लायमेट ॲक्शन' आणि 'फ्युचर अर्थ' या संस्थांचेही सहकार्य लाभले होते. हवामान बदल या समस्येला सामोरे जाण्यासाठी स्थानिक पातळीवरील पर्यावरणीय उपाययोजना करण्याकरिता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करून घेतली गेली. या प्रकल्पात मुख्यत : हवामान मापन केंद्र, अर्थ अवर, जलसंवर्धन, सौर ऊर्जेचा प्रसार, रानभाजी महोत्सव, भरडधान्ये महोत्सव यासारखे विविध कृतीशील उपक्रम वर्षभर राबविण्यात आले.

प्रकल्पाचा समारोप मंगळवार दिनांक २९ जानेवारी २०१९ रोजी क्लायमेट अँबॅसॅडर्स स्टुडन्टस् कॉन्फरन्सने झाला. या वर्षीच्या परीषदेला डॉ. मोहसिना मुकादम आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यखा खासदार सुप्रियाताई सुळे या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. त्याचबरोबर या परिषदेचे अध्यक्षपद चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी स्वीकारले होते. प्रकल्पात सहभागी शाळा आणि महाविद्यालयाचे १५० विद्यार्थी आणि शिक्षक आले होते. त्याचबरोबर भरडधान्यांचे विविध पदार्थ बनविणारे अनुयोग विद्यालयाचे पालक आले होते. परिषदेच्या ठिकाणी सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी मांडलेल्या हवामान बदल विषयक प्रकल्पांचे प्रदर्शन मांडले गेले. त्यांची पाहणी प्रमुख पाहुण्या डॉ. मोहसिना मुकादम यांनी केली. सौरऊर्जा, कापडी पिशव्या, भरडधान्ये– रानभाज्या, आदिम बियाणी संवर्धन, जलसंवर्धन, प्लास्टीक बॉटल्सचा बांधकामातील वापर, बर्ड फीडर, जलप्रदूषण, स्थानिक जैवविविधता दर्शवणारे फोटो प्रदर्शन अशा हवामान बदल रोखण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या विविध प्रकल्पांची मांडणी करण्यात आली. त्यांची पाहणी करून झाल्यावर रंगस्वर हॉलमध्ये विद्यार्थ्यांनी विविध माध्यमातून हवामान बदल विषयक त्यांचे आकलन मांडले. प्रथम झुनझुनवाला महाविद्यालयाच्या गौरी नाडकर्णी हिने निसर्गातील वनस्पती, फुले, फळे, प्राणी, पक्षी अशा विविध घटकांचा मानवी चित्तवृत्तींवर होणारा परिणाम नृत्याद्वारे दाखवला. तर 'आमची शाळा'ची विद्यार्थिनी समीक्षा हेगिष्टे हिने पृथ्वीची पर्यावरण ऱ्हासाबाबत कैफियत सादर केली. त्यानंतर प्रज्ञाबोधिनी हायस्कूलने रानभाज्यांचे महत्त्व पटवून देणारी नाटीका सादर केली. विविध रानभाज्या आणि भरडधान्याच्या वेशभूषेमध्ये फॅशन शो सादर केला. त्यांच्या प्रमाणेच अनुयोग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रानभाज्यांची माहिती देणारा फॅशन शो सादर केला. एसआयइएस एपीजे अब्दुल कलाम मेमोरियल हायस्कूल आणि आर जे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हवामानपूरक पारंपरिक कपडे घालून फॅशन शो केला. यानंतर सर्व शिक्षक आणि पालकही रँपवर उतरले होते. अशा जोशपूर्ण वातावरणात सगळेजण असतानाच भरडधान्यांवरील कवितांचे सम्मेलन भरले आणि विद्यार्थ्यांनी ज्वारी, बाजरी, वरी, नाचणी यासारख्या विविध भरडधान्यांचे गुणधर्म वर्णन करणाऱ्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील कविता सादर करून वाहवा मिळवली.

प्रास्ताविकात 'सृष्टीज्ञान'च्या संगीता खरात यांनी हवामान बदल विषयक राबविल्या जाणाऱ्या अशा प्रकल्पांची किती गरज आहे याबद्दल विवेचन केले. दहा वर्षांपूर्वी हवामान बदल हा विषय फारसा कोणाला माहिती नसताना खासदार सुप्रिया सुळे यांनी यांबाबत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून या विषयावर काम करावयास सुरुवात केली. त्याचाच परिणाम म्हणून हवामान बदल या विषयावर शिक्षक, विद्यार्थी आणि पालक, सर्वसामान्य लोक यांच्यामध्ये या समस्येबाबत जाणीव

तयार होऊ लागली आहे. मात्र, याचा सामना कसा करायचा हे त्यांना कळत नाही. तेव्हा स्थानिक पातळीवर कृतीशील प्रकल्प राबवणाऱ्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि सृष्टीज्ञान संस्था यांचे कार्य अधोरेखित होते अशी मांडणी संगीता खरात यांनी प्रास्ताविकामध्ये केली.

यानंतर एसआयइएस एपीजे अब्दुल कलाम मेमोरियल हायस्कूलच्या श्रीमती प्रतीक्षा टिकम यांनी २०१८ मध्ये प्रकल्पांतर्गत राबविलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. या प्रकल्पामध्ये सहभागी विद्यार्थी आणि शिक्षक प्रतिनिधींनी त्यांना उपक्रम राबवून झालेले आकलन सर्वांना सांगितले. फ्युचर अर्थ, स्वीडनच्या प्रतिनिधी इसाबेल आणि सोफिया यांनीही त्यांचे या प्रकल्पाअंतर्गत शाळांमध्ये केलेल्या कामाबद्दल अनुभव कथन केले. यानंतर प्रकल्पात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांचा प्रमाणपत्र आणि सोलार पॅनल देऊन प्रमुख पाहुण्या डॉ. मोहसिना मुकादम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्यानंतर झालेल्या अध्यक्षीय भाषणात श्री. शरद काळे यांनी सर्व मुलांचे कौतुक केले आणि अशाच प्रकारे हवामान बदलविषयक उपक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. मोहसिना मुकादम यांनी शालेय पातळीवर इतक्या उत्तम प्रतीचे उपक्रम विद्यार्थ्यांबरोबर राबविल्याबद्दल सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्वांत शेवटी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते शाळांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. उपस्थित सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक करून हवामान शिक्षणाचे हे काम मुंबईपुरतेच मर्यादित न राहता ते संपूर्ण महाराष्ट्रात पसरावे अशी इच्छा सुप्रियाताई सुळे यांनी व्यक्त केली. ही परिषद यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सृष्टीज्ञान संस्था आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



महाराष्ट्रराज्य स्थापनेच्या मंगलकलशाचे स्वागत.. (१ मे १९६०)

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

## कार्यवृत्त

दिनांक १४ डिसेंबर २०१८ रोजी व्याख्यानमाला 'आपला कायदा जाणून घ्या' : कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने सर्वसामान्य लोकांपर्यंत दैनंदिन जीवनात उपयोगी कायद्याची माहिती या व्याख्यानमालेद्वारे पोहचवण्याचा प्रयत्न आहे. दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी सायं. ६:०० ते ७:३० बोर्डरूम, पाचवा मजला, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'ज्येष्ठ नागरिकांचा कायदा आणि विविध योजना' या विषयाचे विषयतज्ज्ञ ॲड. भुपेश सामंत यांनी लोकांना माहिती दिली. व्याख्यानासाठी ४० लोकांची उपस्थिती होती.

दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजी व्याख्यानमाला 'आपला कायदा जाणून घ्या' : 'कायदेविषयक सहाय्य व सल्ला' फोरमच्या वतीने सर्व सामान्य लोकांपर्यंत दैनंदिन जीवनात उपयोगी कायद्याची माहिती या व्याख्यानमालेव्दारे पोहचवण्याचा प्रयत्न आहे. ३० जानेवारी, २०१९ रोजी सायं. ६:०० ते ७:३० बेसमेंट हॉल, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'गुन्हा पुरावा आणि हस्ताक्षर तज्ज्ञ' या विषयाचे विषयतज्ज्ञ डॉ. ॲड. शैलेश चांदजकर यांनी लोकांना माहिती दिली. व्याख्यानासाठी ३५ लोकांची उपस्थिती होती.

दिनांक २ फेब्रुवारी २०१९ रोजी आदरांजली सभा : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या वतीने दिवंगत मा. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी साहेब यांच्या आदरांजली सभेचे आयोजन दि. २ फेब्रुवारी,२०१९ रोजी रंगस्वर हॉल, चौथा मजला, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे सायं. ६:०० ते ७:०० या वेळेत करण्यात आले होते. याप्रसंगी मा. सुजाता मनोहर (न्यायाधीश–सुप्रीम कोर्ट), मा. हेमंत गोखले (न्यायाधीश–सुप्रीम कोर्ट), मा. बी.व्ही.चव्हाण (न्यायाधीश – मुंबई हायकोर्ट), मा. अभय ठिपसे (न्यायाधीश – मुंबई हायकोर्ट), मा. एस.एस. परकार (न्यायाधीश – मुंबई हायकोर्ट), मा. डी. आर. धनुका (माजी न्यायाधीश – मुंबई हायकोर्ट), मा. आर. डी. धनुका (न्यायाधीश – मुंबई हायकोर्ट), मा. शरद काळे (सरचिटणीस, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई), मा. ॲड. विनायकराव कांबळे (सदस्य व सचिव, कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम) आदी मान्यवर या आदरांजली सभेसाठी उपस्थित होते. तसेच फोरमचे आजी माजी सदस्य, प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, साहेबांचे हितचिंतक इत्यादींची उपस्थिती होती.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे :**

विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करून देण्यात येते. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो : भारतीय संविधान, विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, हुंडाबंदी अधिनियम १९६१, भारतीय दंड संहिता १८६०, ग्राहक संरक्षण कायदा १९८६, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, गुंतवणूकीसंबंधीचे नियम, कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, माहितीचा अधिकार कायदा २००५, हिंदू विवाह कायदा १९५५, मुस्लिम कायदा, पोटगी संबंधीचे कायदे, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, विशेष विवाह अधिनियम १९५४, बाल विवाह बंदी अधिनियम २००५, महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, न्यायालांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, बिकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities Equal opportunities, Protection of Rights and Full Participation)Act,

1995 स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National trust for welfare of Persona with Sutism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act. 1999), अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Precention) Act. 1956), राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७९, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९९९, महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), मुस्लिम स्त्रिया घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१, मुंबई मुद्रांक कायदा १९५८, गृहनिर्माण संस्थांचे विनियम, अनुसूचित जाती आणि जमाती ( अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शारियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, भारतीय मुद्रांक कायदा १८९९, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, मोटर वाहन अधिनियम १९८८, जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६१, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, माता पिता व जेष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, मुंबई पोलीस अधिनियम, १९५० व कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१४

**आर्थिक बदलांच्या आगेमागे सामाजिक घुसळण होणं स्वाभाविकच आहे. मात्र, त्याचा फार बाऊ करावा, असं मला वाटत नाही. अशी स्थित्यंतरं पचविण्याची क्षमता इथल्या सामाजिक तसेच संस्थात्मक जीवनात आहे, असा माझा विश्वास आहे. महाराष्ट्राला आर्थिक आणि सामाजिक बदलांचं सुसूत्रीकरण राखावं लागेल. या प्रक्रियेत कदाचित सामाजिक तणाव निर्माण होतील, पण त्यांचा बिमोड घडवून आणणाऱ्या शक्तीही त्याचवेळी कार्यरत होतील. हे ताणतणाव निवळून कालांतराने नाहीसे करणाऱ्या व्यवस्था-यंत्रणा तयार होतीलच. नव्हे, त्या तशा तयार कराव्याच लागतील.**

**- मा. शरद पवार**

# सृजन
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करून त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे या करिता 'सृजन' हा उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

| अनु क्र | दिनांक | विषय | संसाधन व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | ७ ऑक्टोबर २०१८ | व्यंगचित्र | श्री विवेक प्रभूकेळुस्कर |
| २ | १८ नोव्हेंबर २०१८ | स्केच | श्री राजेश कांबळे |
| ३ | ९ डिसेंबर २०१८ | पार्टी आणि सांगता समारंभ | जादुगार लालन गुप्ता. |
| ४ | ६ जानेवारी २०१९ | प्रिंट मेकिंग | पुजा शिंदे आणि ग्रुप, जे जे आर्ट कॉलेज महाविद्यालय विद्यार्थी |
| ५ | १० फेब्रुवारी २०१९ | परीक्षेचा ताण तणाव | श्रीमती श्रध्दा पोळ, अदित्य एज्युकेशन ट्रस्ट एमपॉवर फाउंडेशन, २ |

राजकारण करणं म्हणजे एकमेकांवर कुरघोडी करणं, पाय ओढणं, शहप्रतिशह देणं, त्यातून पुढे येऊन आपण जिंकणं हे आणि केवळ इतकंच, असं समीकरण दुर्दैवानं हल्ली देशात तयार व्हायला लागलं आहे. लोकांचे प्रश्न सोडवायला हे उपयोगी आहे, असं मला वाटत नाही. अशा राजकारणाने लोकांना नैराश्य आलं तर त्याची किंमत लोकशाहीला मोजावी लागेल. ही किंमत मोजावी लागू नये, असं वाटत असेल तर आपण लोकांसमोर सतत 'विकासाभिमुख दृष्टिकोन' मांडायला हवा. हे आपण सातत्यानं केलं, तर लोकांना हळूहळू पटेल. राजकारणाच्या क्षेत्रातील नवीन पिढीला तरी या वास्तवाचं भान राखावंच लागेल, असं मला वाटतं.

**- मा. शरद पवार**

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार यांचे सहकार्य असते.

मुंबई मध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थांचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहीत असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई मध्ये 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. देवयानी गोरे, ॲड. प्रमोद कुमार व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते.

ही कार्यशाळा यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्याला सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ/अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करू शकतात, आपल्या स्वत:च्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. तसेच सामाजिक ज्ञान/भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षाच्या व ५००च्या वर प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते. या प्रशिक्षणाचा २२ वा वर्ग ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०१८ या कालावधीत पूर्ण झाला. २२ प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण पूर्ण केले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

दिनांक ७ डिसेंबर २०१८ रोजी 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' वर्ग क्र. २२ च्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. मा. प्रभाकर चुरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना या क्षेत्रात कसे यशस्वी व्हावे या बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ रोजी प्राप्तीकर व जीएसटी संबंधित 'सहकारी गृहनिर्माण संस्था विषयक महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन चे अध्यक्ष मा. रमेश प्रभू यांचे विनामूल्य व्याख्यान आयोजित केले गेले. ५५ ते ६० लोकांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. मा. रमेश प्रभू यांनी लोकांच्या बऱ्याचशा प्रश्नांची उत्तरे साध्या सोप्या भाषेत समजावून दिली.

दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी विनामूल्य आरती थाळी सजावटीचे प्रात्यक्षिक आयोजित केले गेले. मा. वीणा म्हात्रे यांनी स्वयंपाक घरातील पदार्थ व फुले वापरून ४ ते ५ प्रकारची आरती थाळीची सजावट दाखविली. महिलांनी खूप लक्षपूर्वक प्रात्यक्षिकाचा आनंद घेतला.

वर नमूद केलेली सर्व प्रशिक्षणे व कार्यक्रम माफक फी मध्ये 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर सुरू आहेत. ज्यासाठी बाहेर खूप पैसे मोजावे लागतात. या सर्व प्रशिक्षणात आम्ही प्रशिक्षणार्थींची संख्या मर्यादित ठेवली आहे. जेणेकरून मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता येईल. उगाच माफक फीच्या नावाखाली भरपूर प्रशिक्षणार्थी घेऊन आम्ही आमची कार्यशाळा यशस्वी करीत नाही, तर सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीस शिकविलेली कला आली पाहिजे, सराव करून ती व्यक्ती त्या त्या कला आत्मसात करू शकेल, यासाठी आमचा आग्रह असतो.

आमची उद्दिष्टे सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टिकोनातूनच आहेत. आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही, पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही; पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यातही स्त्रियांसाठी व समाजासाठी खूप काही करत राहणार आहोत.

# यशवंतराव चव्हाण ग्रंथालय, मुंबई

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय आहे. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाकडून माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेऊन वाचकांना उत्कृष्ट सेवा दिली जाते. ग्रंथालयांमध्ये संदर्भ साधने जास्त प्रमाणात आहे आणि त्यांचा वापरसुद्धा मोठ्या प्रमाणात होतो. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, चरित्र, आत्मचरित्र, धर्मकोश, मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृतीकोश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, मराठी विश्वचरित्र कोश, ॲटलास, MPSC/ UPSC स्पर्धा परीक्षाकरिता लागणारी पुस्तके, संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहे. तसेच मासिके आणि वृत्तपत्रांची कात्रणे उपलब्ध आहे.

**ग्रंथालय व्यवस्थापन :**

ग्रंथालयातील पुस्तकांचे विषयानुरूप वर्गीकरण, कॅटलॉगिंग करणे, विद्यार्थी /सभासद यांची वेगवेगळ्या विषयासंबंधित माहितीची गरज लक्षात घेणे, नवीन पुस्तके खरेदी करणे इ. सेवा देणे. ग्रंथसंग्रहाचे संगणकीकरण (कॉम्प्युटरायझेशन) करून नेटवर्कद्वारे विद्यार्थी /सभासद यांना तात्काळ माहिती मिळण्याची सोय करणे हे ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे.

**ग्रंथालयद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा :**

**इलेक्ट्रॉनिक सेवा:** माहिती शोधाची व्याप्ती आणि इलेक्ट्रॉनिक साधनांची उपलब्धता यामुळे ग्रंथालयाच्या संकल्पनेबरोबर ग्रंथालयाच्या सेवांबाबतच्या संकल्पनाही बदलू लागल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थी सभासद / संशोधक यांना इंटरनेटद्वारे न्यूजपेपर क्लिपींग, दुर्मिळ ग्रंथ, ई-पब्लिशिंग, इलेक्ट्रॉनिक प्रबंध, ई-जर्नल अशा सेवा दिल्या जातात. माहिती शोधण्याकरिता खाली काही वेबसाईट आहेत :

1) Free Online Journals
   - http://www.jodi.ecs.soton.ac.uk./
   - http://www.information.net

2) Free Online E-Books
   - http://www.etext.linvirgina.edu/books
   - http://www.freešebooks.net

3) Free Encyclopedia
   - http://www.britannica.com

4) Free Conference Proceeding
   - http://www.2003.insite.nu
   - http://www.sla.org/content/events/conference/2002.annual/conpap2002/papers2003conf.cfm

5) Free Newspapers
   - http://www.dinamalar.com
   - http://www.hinduonnet.com

6) Free Online Dictionaries
   - http://www.pdictionary.com
   - http://www.wesu.edu/library/odlis.htm

7) Free Online Samples Copies
   - http://www.sagepub.co.uk

8) Free Tables of Contents Services
   - http://www.elsevier.com/locate/contentdirect

9) Free -bstract Services
   - http://www.wkapnl/kaphtml.htm/toCSE-RCH

10) Free Online Catalogue Services
   - http://www.catalog.loc.gov/
   - http://www.phindia.com

**ओपॅक :** ओपॅक वर ग्रंथालयातील पुस्तके, संदर्भ ग्रंथ, न्यूजपेपर क्लिपींग यांची यंत्ररूप तालिका इंटरनेटच्या सहाय्याने सभासद, संशोधक यांच्यासाठी उपलब्ध आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वेबसाईटवर ग्रंथालयाचे OPAC उपलब्ध

आहे, जेणेकरू सभासद, संशोधकाना कोणते पुस्तक ग्रंथालयात उपलब्ध आहे याची माहिती मिळते.

**उपयुक्त नियतकालिके :** ग्रंथालयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परिक्षा देण्याच्या तयारी करिता येतात. स्पर्धा परीक्षेच्या सभासदांना तसेच संशोधन करणाऱ्या सभासदांना हवी असलेली माहिती योग्य प्रकारे देण्यात येत असते. ग्रंथालयाने त्यासाठी काही महत्त्वाच्या नियतकालिकांची व्यवस्थितरित्या बांधणी करून ती ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवली आहेत.

1. Bulletin Unique Academy
2. Pratiyogita Darpan
3. Kurukshetra
4. Yojana
5. Seminar
6. Competition Success Review
7. The Economist
8. Economic  Political Weekly
9. Foreign -ffair
10. Business India
11. Front Line
12. Science Reporter
13. Sanctuary -sia

१४. पंचधारा

१५. साधना

१६. सत्याग्रही विचारधारा

१७. समाजप्रबोधन पत्रिका

१८. नवभारत

१९. साहित्य सूची

२०. स्वतंत्र नागरिक

२१. चाणक्य मंडळ

२२. यशाची परिक्रमा

२३. चित्रलेखा

वृत्तपत्र कात्रण सेवा /न्यूजपेपर क्लिपींग सेवा : संशोधक किंवा विद्यार्थांना योग्यवेळी योग्य माहिती कमी वेळात देता यावी याकरिता ग्रंथालयात विशेष प्रकारे माहिती एकत्रित करून ठेवली आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे करून त्यांच्या फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. तसेच झेरॉक्स काढून त्यांना व्यवस्थितरित्या बाईंडिंग करण्यात आल्या आहेत त्यांची यादी खाली दिल्याप्रमाणे:–

१. १८५७ चा इतिहास

२. हिरक महोत्सव महाराष्ट्र, २००७

३. हिंदुस्तान टाइम्स इन मुंबई,२००७ : मुंबई मेट्रो, मुंबई एअरपोर्ट, मुंबई सिटी ट्रान्सफॉरमेशन प्रोजेक्ट

४. मुंबईत रेल्वेवरील अतिरेकी हल्ला, ११ जुलै २००६

५. मुंबई राज्यात पावसाचा धुमाकूळ ,२६ जुलै २००५

६. २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला

७. अयोध्येत राममंदिर उभारणी बाबतीत निकाल, २०१०

८. साहित्य संमेलन २००३–२०१०

९. पुरस्कार (२००२–२००६) : साहित्य अकादमी पुरस्कार, भारतरत्न, नोबेल, ज्ञानपीठ. महाराष्ट्रभूषण

10. Stephen Hawking

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीकडून ऑक्टोबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ दरम्यान पुढील विविध प्रशिक्षण वर्ग आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

### सी - डॅक कोर्सेस

ऑगस्ट २०१८ ला बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी दि.२३ ऑक्टोबर २०१८ ला सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. या बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी दिवाळी संध्याकाळ २ नोव्हेंबर २०१८ ला आयोजित केली होती. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमासोबत सुंदर रांगोळी काढून कार्यक्रमाची शोभा वाढवली. C-DAC मुंबई अयोजित arohan - The ascent, हा विद्यार्थी दिवस दि.१९ नोव्हेंबर ला आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमात AIT(YCP) च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. AIT च्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच तांत्रिक स्पर्धांमध्ये भाग घेतला. विद्यार्थी दिवसाचे औचित्य साधून विविध कंपनीच्या HR आणि TECHNICAL TEAM ने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना प्लेसमेंटसाठी चांगला उपयोग होईल. या बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी समारोप समारंभ दि. २५ जानेवारी, २०१९ ला आयोजित केला होता. PG DAC ऑगस्ट २०१८ च्या विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट प्रोग्राम १ फेब्रुवारी २०१९ ला सुरू झाला.

PG DAC फेब्रुवारी २०१९ बॅचची C-CAT (C-DAC Common Admission Test) दि. १६ डिसेंबर २०१८ ला घेण्यात आली. प्रबोधिनीमध्ये १४० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

PG-DAC कोर्समध्ये ॲडमिशन मिळविण्याकरिता C-CAT परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. ही परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण होता यावी म्हणून PreDAC कोर्स चालविण्यात येतो, या कोर्समधील काही विद्यार्थ्यांचा क्रमांक उल्लेखनीय आहे. श्री. सियान दास - क्रमांक १०५, अनिकेत केशवाणी - २६०, निलेश आचार्य - ३६८ व मोहक जोशी - ५६४. ह्या मुलांचे संपूर्ण प्रशिक्षण आपल्याकडे झाले असून त्यांना सर्वांना PGDAC मध्ये प्रवेश मिळू शकला आहे.

मल्टिमिडियाच्या कोर्सला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतोय.

### MKCL कोर्स

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित MS-CIT आणि KLiC अभ्यासक्रम चालविण्याची परवानगी प्रबोधिनीला वर्ष २०१९ साठी मिळाली. MKCLच्या MS-CIT कोर्सला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ह्या कोर्सचा भविष्यात विद्यार्थ्यांना उपयोगही होतो.

S.S.C.च्या विद्यार्थ्यांना MKCL ने ALL THE BEST चे घखढ देऊन परीक्षेत यश मिळविण्याकरिता शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठानने वेगवेगळ्या शाळा व क्लासेसच्या S.S.C. च्या विद्यार्थ्यांसाठी समारोप समारंभ आयोजित केला होता.

### आगामी कार्यक्रम

PG DAC कोर्सची बॅच १८ फेब्रुवारी २०१९ ला सुरू होणार आहे. S.S.C. व HSC च्या विद्यार्थ्यांसाठी FREE CAREER SEMINAR २ एप्रिल २०१९ आयोजित करण्यात येणार आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी सुट्टीसाठी खास वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी AIT देते. अनेक कोर्सेस मध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणी नंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलिसखात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फी मध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते.

वेगवेगळ्या कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणवर्ग चालविणे, हेच AIT चे उद्दिष्ट आहे.

# विभागीय केंद्र, कऱ्हाड

## कार्यवृत्त

### स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी :

स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मा. श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टमधील; देशनेते स्व. यशवंतरार चव्हाण व वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास सकाळी १० वाजता आदरणीय शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराडचे कार्याध्यक्ष मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील, मा. श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे, मा. श्री. सुनिल पवार, मा. श्री. राजेश पाटील (वाठारकर), मा. श्री. नंदकुमार बटाणे व इतर मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टची वार्षिक सभा सन्माननीय श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

२५ नोव्हेंबर २०१८ रोजी दुपारी ४ वाजता सजविलेल्या बग्गीमध्ये स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांची प्रतिमा ठेवून मा. नंदकुमार बटाणे व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पदयात्रेस प्रारंभ झाला. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट येथून ही पदयात्रा सुरू होऊन विजय दिवस चौकातून, टिळक हायस्कूलमधील स्व. लोकमान्य टिळक व स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर स्व.पी. डी.पाटील यांच्या निवासस्थानातील त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर रामविलास लाहोटी कन्या शाळा, चावडी चौकमार्गे पदयात्रा प्रितीसंगम बागेतील स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या समाधी स्थळी पोहोचली. या पदयात्रेला शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज व सौ. वेणूताई चव्हाण कला व वाणिज्य कॉलेजचे प्राचार्य, त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापक बंधू भगिनी तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्हीं संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते. समाधीस्थळी सर्व मान्यवरांनी पुष्पांजली वाहिली.

### ६९ वा प्रजासत्ताक दिन :

स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त, २६ जानेवारी २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही ठिकाणी कराड केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थांचे सर्व कर्मचारी तसेच सौ. वेणूताई स्मारक अभ्यासिकेतील विद्यार्थी व विद्यार्थिंनी उपस्थितीत होते.

### स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांची ९३ वी जयंती :

सौ. वेणूताई चव्हाण या भारतीय स्त्री जीवनाचा आदर्श होत्या. यशवंतरावजींच्या राजकीय जडण–घडणीमध्ये मातोश्री ती. विठामाता यांच्याप्रमाणेच सौ. वेणूताईंचा अग्रक्रमाने वाटा होता. स्व. वेणूताईंच्या जयंती दिनानिमित्त, २ फेब्रुवारी २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराड येथे सौ. वेणूताई व स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेस सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आले. तसेच सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येथील स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आले. यावेळी सर्व कर्मचारी वर्ग व अभ्यासिकेतील विद्यार्थी वर्गही उपस्थित होता.







डॉ. शिवाजीराव देशमुख यांना विभागीय केंद्र सोलापूरच्यावतीने यशवंतराव गौरव पुरस्कार प्रदान करताना अशोक चौसाळकर, गो. मा. पवार, युन्नुस भाई शेख, दत्ता गायकवाड, दिपक साळुंके, प्रकाश येलगुलवार, राहुल शहा, राजशेखर शिवदारे





कायदेविषयक सहाय्य सल्ला फोरमच्यावतीने 'आपला कायदा जाणून घ्या' या व्याख्यानाला उपस्थित मान्यवर





मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना प्रीतीसंगम येथे अभिवादन करताना विभागीय केंद्र कऱ्हाडचे प्रमुख पदाधिकारी





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि प्रयोग, मालाड यांच्यावतीने आयोजित 'फिल्मिंगो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवा'वेळी उपस्थित माननीय किरण शांताराम, मृणाल कुलकर्णी, मा. अशोक राणे व इतर




विभागीय केंद्र लातूरच्यावतीने आयोजित
व्याख्यान देताना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरु डॉ. अशोक ढवण




विभागीय क्रेंद, पुणेच्यावतीने
२८वे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन २०१९



मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ३४व्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र औरंगाबादच्यावतीने मराठवाडा साहित्य परिषदेतील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी मा. सुहास तेंडुलकर, मा. दामोदर जाधव, सुबोध जाधव, दीपक जाधव, विजय मगरे, राजेंद्र वाळके आदी.



विभागीय केंद्र लातूरच्यावतीने ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीदिनानिमित्त अभिवादन करताना प्रतिष्ठानचे सचिव डॉ. नागोराव कुंभार व इतर मान्यवर





स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची ३४वी पुण्यतिथी देवराष्ट्रे इथे साजरी करण्यात आली. त्यावेळी मा. मोहनराव कदम, मा. विश्वजीत कदम, मा. संग्रामसिंह देशमुख, मा. अरुण लाड व इतर.




'सूर विश्वास' मैफिलीत गायन करताना प्रीतम नाकील, सोबत ईश्वरी दसककर (हार्मोनियम), दिगंबर सोनवणे (तबला), मृत्युंजय वाघ (तानपुरा), हिमांशू कुलकर्णी (तानपुरा)



यशवंतराव चव्हाण ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय व विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट तर्फे आयोजित 'वाचन प्रेरणा दिन' निमित्त ग्रंथभेट देताना विश्वास ठाकूर



सुप्रसिद्ध लेखक वसंत वसंत लिमये यांची जाहीर मुलाखत घेताना आ. हेमंत टकले



विंदा करंदीकर यांच्या समग्र साहित्य निर्मितीचे दर्शन घडविणारा 'स्वच्छंद' कार्यक्रम सादर करताना कलावंत





पुणे – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने 'आपले आरोग्य आपल्या हाती' या उपक्रमांतर्गत बोलताना डॉ. जगन्नाथ दीक्षित



महिला व्यासपीठ आयोजित जीएसटी आणि
टॅक्सेशेनवर विनामूल्य व्याख्यान



महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित
'आरती थाळी डेकोरेशन' प्रात्यक्षिक



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे यांच्यातर्फे अडरे हायस्कूल, चिपळूण येथे रक्तगट तपासणी करताना डॉ. गावडे, प्रा. माया देसाई व प्राध्यापक वाघचौरे सर यांच्या उपस्थितीत हे शिबीर संपन्न झाले



'क्लायमेट अँबेसिडर स्टुडन्ट कॉन्फरंस'साठी उपस्थित
मा. सुप्रिया सुळे, सहभागी विद्यार्थी आणि शिक्षक





पुणे : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या ‘विनासायास वेटलॉस आणि मधुमेह प्रतिबंध’ या कार्यक्रमात उपस्थित डॉ. जगन्नाथ दीक्षित, मा. सुप्रिया सुळे व इतर




विभागीय केंद्र, परभणी आयोजित महिला आरोग्य तपासणी शिबिर



विभागीय केंद्र परभणी आयोजित ‘जागर मायलेकींचा’ कार्यक्रमात अध्यक्ष मा. संध्याताई बुधगावकर व इतर मान्यवर



यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार समारंभाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा. श्री. रामदासजी फुटाणे



शेवटाचा आरंभ : पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी




विभागीय केंद्र, अंबाजोगाई आणि यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्यावतीने 'यशवंतराव चव्हाण विभागीय वक्तृत्व स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित मा. पृथ्वीराज साठे, डॉ. वनमाला गुंडेरे, डॉ. राजकुमार यल्हावाड, डॉ. नरेंद्र काळे, डॉ. मुकुंद राज पंखे व इतर





'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. आनंद कर्वे व उपस्थित श्रोते



विभागीय केंद्र अहमदनगर : शेतीकट्टा कृषी शिक्षण-व्यवसाय व संधी मार्गदर्शक, मा. अनुराधाताई नागवडे, सभापती महिला व बाल कल्याण समिती जि. प. अहमदनगर



विभागीय केंद्र अहमदनगर : शेतीकट्टा कृषी शिक्षण-व्यवसाय, मा. सुनितताई गडाख, माजी सभापती पंचायत समिती नेवासा







शिक्षण विकास मंचाच्या वतीने आयोजित 'शालेय शिक्षण : आज आणि उद्या' या परिषदेसाठी उपस्थित मान्यवर तसेच डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार प्राप्त सुर्यकांत कुलकर्णी आणि ग्रंथाली प्रकाशनचे सुदेश हिंगलासपूरकर





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई रंगस्वरच्या वतीने प्रिंट मेकिंग या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी मा. जॉन डगलस, मा. शुभानंद जोग व इतर



विभागीय केंद्र, ठाणेच्यावतीने आयोजित 'सत्याविरुद्धचे प्रचार युग' याविषयावर बोलताना श्री. राजू परुळेकर, श्री. मुरलीधर नाले व इतर



'विचारकुंकू' या कार्यक्रमात उपस्थित महापौर मिनाक्षीताई शिंदे, ज्येष्ठ सिनेतारका सौ. अलका कुबल-आठल्ये, सौ. सुलभा कोरे, अनुपमा गुंडे व इतर

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
विभागीय केंद्र औरंगाबाद
आयोजित

# AIFF

## 6TH AURANGABAD INTERNATIONAL FILM FESTIVAL 2019

9TH - 13TH JANUARY 2019

### पोस्टर प्रदर्शन



### उद्घाटन सोहळा



### पद्मपाणी जीवन गौरव पुरस्कार



VENUE : INOX, PROZON MALL, AURANGABAD

# विभागीय केंद्र, पुणे

## कार्यवृत्त

### कृषी व सहकार व्यासपीठ

### सहकार कायद्यात सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण

महाराष्ट्र शासनाने वरील विषयावरील ड्राफ्ट दुरुस्ती अध्यादेश काही सहकारी गृहनिर्माण संस्था, पदाधिकाऱ्यांना उपलब्ध करवून दिला होता. तो व्यासपीठाच्या संयोजकांनाही प्राप्त झाला. व्यासपीठाच्या दिनांक २० ऑक्टोबर २०१८च्या सभेत चर्चा होऊन दिनांक २२ ऑक्टोबर २०१८ रोजी सहकार व्यासपीठातर्फे त्या २४ पानी कायदा दुरुस्तीवर परिच्छेदानुसार व्यासपीठाच्या शिफारशी दिनांक २२ ऑक्टोबर २०१८ रोजी मा. ना. सुभाषजी देशमुख मंत्री महोदय (सहकार) यांना सादर करून त्याच्या प्रती मा. मुख्यमंत्री, मा. अध्यक्ष सहकारी परिषद, सचिव (सहकार) आयुक्त सहकार इत्यादींना कुरिअर मार्फत पाठविण्यात आल्या.

दरम्यान, आठेक दिवसांनी व्यासपीठाच्या असे निर्दर्शनास आले की, शासनाकडे आलेल्या शिफारशीकडे/ दुरुस्त्यांकडे संपूर्ण दुर्लक्ष करून महाराष्ट्र शासनाने ड्राफ्ट अध्यादेश जसाच्या तसा काना-मात्रेचाही बदल न करता दिनांक ३० ऑक्टोबर २०१८ रोजी अंतिम करून तातडीने अंमलातही आणला. त्यावर विधानसभेचे हिवाळी अधिवेशन तोंडावर असताना आणि अध्यादेशावर महत्त्वाचे आक्षेप असताना, अशाप्रकारे शासनाने केलेली घाई लक्षात घेता मा. सचिव, पुणे केंद्राच्या स्वाक्षरीने मा. ना. देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना एक खरमरीत पत्र लिहून सदर आदेशाद्वारे सहकारी चळवळीच्या लोकशाही व्यवस्थापन या तत्त्वाला व संविधानांतील स्वतंत्र यंत्रणेमार्फत सहकारी संस्था निवडणुकीच्या तरतुदीला कसा हरताळ फसला जात आहे हे सप्रमाण दाखवून दिले. त्याचप्रमाणे मागील दाराने सहकारी तत्त्वाचे खुल्या सभासदत्वालाही कशाप्रकारे बगल देण्यात येत आहे त्याचाही स्पष्ट खुलासा केला.

सहकारी चळवळीच्या सुदैवाने मा. मुख्यमंत्र्यांनी आमच्या प्रतिक्रियेवर व अशाच अन्य प्रतिक्रियांवर तातडीने कारवाई करून तीन आठवड्यांच्या आत म्हणजे दिनांक २९ नोव्हेंबर २०१८ रोजी सदर अयोग्य अध्यादेश मागे घेत असल्याचे विधानसभेत स्वत: विशद केले.

व्यासपीठाने जे सविस्तर टिपण मा. मुख्यमंत्री महोदयांना सदर ८/११/२०१८चे पत्रासोबत सादर केले आहे, त्यावर शासन विचारपूर्वक सुयोग्य तो निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे.

सदर अध्यादेश मागे घेतल्यानंतर लगेचच मा. ना. सहकार मंत्री महोदयांनी निवडक जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई व अन्य सहकारी प्रतिनिधी यांची एक सभा दिनांक १२/१२/२०१८ रोजी मुंबई येथे घेतली. त्यासाठीही सहकारी व्यासपीठाच्या निवडक सदस्यांची एक दिवसाची सभा दिनांक ७/१२/१८ रोजी घेण्यात येऊन त्यानुसार एक निवेदन मा. अंकुशराव काकडे यांच्या स्वाक्षरीने मा. ना. मुख्यमंत्री यांना सादर केले. त्या निवेदनाच्या प्रती मा. अध्यक्ष, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ श्री. पटवर्धन जे सदर सभेस हजर राहणार होते, त्यांचेमार्फत मा. नामदार सुभाषजी देशमुख यांना सादर करण्यासाठी पाठविली. सदर समितीसमोर प्रामुख्याने सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा विषय प्राधान्याने होता. त्यासाठी भारतीय संविधानांतील तरतुदी, त्याचप्रमाणे सहकार कायदा कानून निवडणूक नियमांतील तरतुदी लक्षांत घेऊन निवडणूक नियमानुसार क व ड वर्गात मोडणाऱ्या संस्थांसाठी सहकार व्यासपीठाने खास निवडणूक नियमांचा मसुदा सुचविला होता. त्यावर सहानुभूतीपूर्वक विचार होईल असे समजते; पण सहकारी तत्त्वांचा अंतर्भाव केंद्राचे सहकार कायद्यातील तरतुदीनुसार करणेस शासन का राजी नाही, ते समजू शकले नाही. शासन त्या तत्त्वांची पायमल्ली करणार नाही, असे सदर सभेत सांगण्यात आले. आमच्या पत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकासाचा मुद्दा मात्र शासनाने तूर्तास बाजूला ठेवलेला दिसतो.

### महिला सक्षमीकरण व वातावरणांतील बदल

महिला व बाल विकास मंत्रालयातर्फे वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे यांच्यातर्फे जेंडर बजेट व क्लायमेट चेंज यावर तीन दिवसांच्या एका शिबिराचे आयोजन दिनांक १० ते १२ डिसेंबर २०१८ दरम्यान करण्यात आले होते. त्यासाठी व्यासपीठाशी संलग्न कार्यकर्त्यांना पुरस्कृत करण्याचे आवाहन वैकुंठ मेहता संस्थानामार्फत करण्यात आले होते. त्यासाठी व्यासपीठाच्या तीन महिला प्रतिनिधींना सदर शिबिरात भाग घेण्यासाठी पुरस्कृत करण्यात आले. आता त्यांच्यामार्फत त्या विषयाचा प्रचार व प्रसार करण्याबाबत पाठपुरावा केला जात आहे.

### बँक ग्राहक मृत्यूपश्चात दावे

वरील विषयावर सहकारी बँका व अन्य बँका यांच्याकडून ग्राहकांना नाहक त्रास भोगावा लागत असल्याचे भारतीय रिझर्व बँकेच्या निदर्शनास आणून दिले होते. त्याबाबत रिझर्व बँकेचे प्रबंधक, सहकारी बँक विनियमन विभाग यांनी २० नोव्हेंबर २०१८च्या पत्राने याबाबतच्या रिझर्व बँकेच्या सूचना आमच्या निदर्शनास आणून देत असल्याचे स्पष्ट केले आहे.

गृहनिर्माण संस्था अध्यादेश दि. ३० ऑक्टोबर २०१८ला काढणे व २९ नोव्हेंबर २०१८ला मागे घेणे या मुळे उद्‌भवलेल्या अडचणी :

ॲड. विलास वर्तक यांचेकडून वरील विषयामुळे सहकारी संस्थात कामकाजाबाबत येणाऱ्या अडचणीबाबत सहकार व्यासपीठामध्ये चर्चा व्हावी व जरूरीनुसार मार्गदर्शन करण्यात यावे अगर शासनाकडे अडचणीतून मार्ग काढण्यासाठी निवेदन करण्यात यावे अशी सूचना प्राप्त झाल्यामुळे, सहकार व्यासपीठाची सभा दि. १६ जानेवारी २०१९ रोजी घेण्यात येऊन त्यातील चर्चेच्या अनुषंगाने मा. ना. देवेंद्रजी फडणवीस यांना दि. १८ जानेवारी २०१९ रोजी पत्राने, सहकारी संस्था कायदा दुरुस्तीचे वेळी धोरणात्मक दृष्टीने केंद्राचे सहकार कायद्याप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये सहकारी तत्त्वांचा समावेश करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच गृहनिर्माण सहकारी संस्थांचे पुनर्विकासाचे दृष्टीने, शासनाने प्रो ॲक्टिव्ह भूमिका बजावण्यासाठी व यामध्ये येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी कायद्यामध्ये योग्य ती तरतूद करण्याचे सुचविले आहे.

त्याचप्रमाणे ज्या अडचणींवर प्रशासनाचे स्तरावर मार्गदर्शन अपेक्षित आहे, त्या अडचणींबाबत मा. सचिव, सहकार, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२ यांना मा. अंकुश काकडे यांच्या सहीने पत्र पाठविले असून तातडीने मार्गदर्शन व्हावे, अशी विनंती केली आहे.

त्याचप्रमाणे प्रतिष्ठानचे नाशिक केंद्राचे अध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांच्या कार्यालयातील श्री. राजू देसले यांचेशी झालेल्या चर्चेस अनुसरून प्रतिष्ठानच्या सर्व केंद्रांच्या नियोजित कार्यकारी समिती सदस्यांचे व्हॉटसॲप ग्रुपसाठी म्हणून व सर्वांकडून पाठपुरावा व्हावा म्हणून संबंधित शासनास सादर केलेल्या अडचणींबाबतच्या प्रस्तावाच्या प्रती श्री. ठाकूर यांना योग्य त्या कार्यवाही साठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### विभागीय केंद्र, पुणे: अन्य उपक्रम :
### ७ वा वेतन आयोग

शासनाने दि. ३० जानेवारी २०१९ रोजी शासन निर्णय वित्त विभाग वेपूर /२०१९ प्र.क्र.सेवा–९ या अन्वये आदेश केले आहेत. त्यानुसार सेवा वेतन निश्चिती करण्यात येत असल्याबाबत राज्य कर्मचाऱ्यांच्या नवीन वेतन निश्चितीकरणाचे कामकाज सुरू आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य पेंशनर्स असोसिएशनशी पत्र व्यवहार चालू आहे. त्यानुसार त्यांच्यासोबत एका शिबिराचे आयोजन निवृत्त शासकीय व शासन सेवक अनुदानित संस्था सेवक वर्ग या सर्वांसाठी घेण्याबाबत पाठपुरावा महाराष्ट्र पेंशनर्स असोसिएशनचे कार्याध्यक्षांकडे करण्यात येत आहे.

### महिला सक्षमीकरण शिबिर

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई अध्यासन केंद्रामार्फत दि. ७ व ८ फेब्रुवारी २०१९ रोजी दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर प्रा. भारती पाटील, पोलिटिकल सायन्स विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे मार्गदर्शनाखाली आयोजिले आहे. सदर शिबिरासाठी कृषी व सहकार व्यासपीठाच्या सदस्य डॉ. सुजाता रविंद्र बरगले यांनी जाण्या येण्याचे व राहण्याचे स्वखर्चाने हजर राहून अहवाल देण्याचे व त्यातील रीसोर्स मटेरिअल सादर करण्याचे मान्य केल्यामुळे, सदर शिबिराची फी वरील बाबींची पूर्तता केल्यावर रु. ७००/– त्यांना अदा करण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्या धर्तीवर, महिला सक्षमीकरणाचे हेतूने, भारतीय संविधानातील कलम ७३ व ७४

मधील तरतुदीनुसार पुणे येथे शिबिराचे आयोजन करण्याचे योजिले आहे.

### नवभारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनचरित्रावर प्रश्नमंजुषा स्पर्धा

दरवर्षीप्रमाणेच २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धेसाठी 'नवभारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू' हा विषय निवडला होता. त्या विषयावर माजी प्राचार्य सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, डॉ. दिलीप मानसिंग गरूड यांच्याकडून ८० पानी पुस्तकाचा मसुदा तयार करून घेऊन तो पाहून त्यांत काही काही सुधारणा सुचविल्या होत्या. त्यानुसार डॉ. गरूड यांनी आपल्या प्रकाशनामार्फत सदर पुस्तक (किंमत रुपये ८०/-) प्रकाशित केले. भिडे परिवार (मंगेशी) यांच्यातर्फे माध्यमिक शाळांना व शिक्षकांना वरील स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रोत्साहन म्हणून एकूण दोनशे पुस्तकांचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानतर्फे एकूण नव्वद शाळांतील विद्यार्थ्यांना गटागटाने सदर स्पर्धेची तयारी करण्यासाठी चारशे पुस्तकांची खरेदी करून ती शाळावार वाटण्यात आली.

### निबंध स्पर्धा

८९ शाळांतील प्रश्नमंजूषा स्पर्धेतील एकूण ३००२ विद्यार्थ्यांमधून गुणानुक्रमे निवडलेल्या ३०९ विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा दिनांक ६ ऑक्टोबर २०१८ रोजी डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन, शुक्रवार पेठ, पुणे येथे मुख्याध्यापक श्री. भरेकर यांच्या सहकार्याने आयोजित केली होती. या स्पर्धेत एकूण २०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांच्यासाठी मन:शक्ती, ब्रह्मविद्या व मराठी विज्ञान परिषद डॉ. बरगल या संस्थांतर्फे अनुक्रमे बुद्धिवर्धन, अभ्यासासाठी मनाची एकाग्रता आणि स्मरण शक्तीसाठी टीप्स या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्या दरम्यान निवृत्त प्राचार्य डॉ. गरूड, श्रीमती शाळीग्राम, श्रीमती मनिषा शिवदे, श्रीमती मुंडले यांच्या सहकार्याने निबंध तपासून निकाल तयार करून बक्षिसे वाटण्यांत आली.

अशा प्रकारे निबंध तपासल्यानंतर इयत्ता ८वीचे विद्यार्थी आणि इयत्ता ९वीचे विद्यार्थी यांना प्रत्येकी प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक म्हणून अनुक्रमे रु. ५००/-, रु. ४००/-, रु. ३००/-, ग्रामीण व शहरी विभागासाठी स्वतंत्रपणे वाटण्यांत आले. त्याशिवाय प्रत्येक इयत्तेतील ७ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ रुपये २००/- म्हणून गुणानुसार व शाळांचा भरीव सहभाग लक्षात घेऊन पारितोषिके प्रदान केली. या निबंध स्पर्धेमध्ये एकूण २०६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

ग्रामीण व शहरी विभागातील ८वी व ९वी तील प्रथम क्रमांक खालीलप्रमाणे

| ग्रामीण पुणे जिल्हा शिक्षण मंडळ | | | शहरी | |
|---|---|---|---|---|
| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नांव | शाळा | विद्यार्थ्याचे नाव | शाळा |
| ८वी | स्नेहा विश्वास रेणूसे | तोरणा विद्यालय, वेल्हे | जान्हवी धनेश साळवी, | रामचंद्र राठी विद्यालय. |
| ९वी | लक्ष्मी बाळासाहेब मतकर, | नवखंड विद्यालय खेड, पारगांव | अवधूत गोरक्ष भोंग, | नूतन माध्यमिक विद्यालय, केशवनगर |

### वक्तृत्व स्पर्धा

इयत्ता ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी माझे आवडते व्यक्तिमत्त्व हा विषय वक्तृत्व स्पर्धेसाठी देण्यात आला. स्पर्धेमध्ये एकूण १०३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अनेक विद्यार्थी पंडित नेहरू यांच्या व्यक्तिमत्त्वावरच बोलले. तर काहींनी अन्य विषयही निवडले. या स्पर्धेसाठी डॉ. गरूड यांचे अध्यक्षतेखाली परीक्षक मंडळ नेमले होते. वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांनाही वरील प्रमाणेच एकूण ४० पारितोषिके वाटण्यात आली. त्यातील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांचे प्रथम क्रमांक व शाळा खालीलप्रमाणे :

### ८वी व ९वी वक्तृत्व स्पर्धा

| ग्रामीण विभाग पुणे जिल्हा शिक्षण मंडळ शाळा | | | शहरी विभाग | |
|---|---|---|---|---|
| इयत्ता | विद्यार्थी | शाळा | विद्यार्थी | शाळा |
| ८वी | वैष्णवी श्री. जवळकर | म. गांधी विद्यालय | पूर्वा लक्ष्मीकांत हडवले | चंद्रभागा तुपे साधना विद्यालय |
| ९वी | आदिती सं. जाधव | शिवाजी विद्यामंदिर, चाकण | क्षितिजा ता. बनसोडे | नू.म.वि.मुलीची शाळा |

### शिक्षक निबंध स्पर्धा

नवभारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू या विषयावर प्राथमिक व माध्यमिक शाळा शिक्षक वा अन्य सेवक वर्ग यांचकडून दोन हजार शब्द संख्येपर्यंत निबंध स्पर्धेसाठी मागविण्यात आले होते. ते शैक्षणिक विचारवंत साहित्यिक डॉ. न.म.जोशी यांचेकडून तपासून घेतले. प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिके अनुक्रमे रु.१०००/-,रु. ७५०/-, रु. ५००/- वाटली. पारितोषिक विजेत्यांची नांवे : १. सौ. आदिती विकास उमराणीकर, २. श्री. रामचंद्र आनंदा चव्हाण पाटील, ३. श्रीमती राजश्री महारूद्र धारूरकर, ही बक्षिसे दिनांक २६/११/२०१८ रोजी प्रदान करण्यात आली.

### विद्यार्थी चित्रकला स्पर्धा

इयत्ता ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण प्रदूषण(हवा, पाणी, जमीन) हा विषय ठेवण्यात आला होता. सदर स्पर्धा डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन येथे मुख्याध्यापक श्री. भरेकर व श्री. गरुड यांच्या सहकार्याने दि. ११ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत घेण्यात आली. मन:शक्ती संस्थेतर्फे पालक /शिक्षकांसाठी 'तारुण्यात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या' यावर मार्गदर्शन करण्यात आले. पुणे शिक्षण मंडळाचे ड्रॉईंग टीचर श्री. जगताप व श्री. गायकवाड यांच्यातर्फे विद्यार्थ्यांसाठी 'ध्यानातून एकाग्रता व आत्मविश्वास' या विषयांवर सहजयोग ध्यान केंद्रामार्फत उपयुक्त अशी प्रात्यक्षिके विद्यार्थी /शिक्षक व पालक यांच्याकडून करून घेण्यात आली. या स्पर्धेत ४१ शाळातील २४८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला त्यापैकी गुणानुक्रमे ४० विद्यार्थ्यांना बक्षीसे वाटप ग्रामीण व शहरी गटानुसार करण्यात आले.

### अ.भा. बालकुमार साहित्य संमेलन भिलार

दिनांक १८ ते २० जानेवारी २०१९ दरम्यान पुस्तकांचे गाव भिलार, महाबळेश्वर, सातारा या ठिकाणी बालकुमार साहित्य संमेलन पार पडले. त्यामध्ये शेकडो विद्यार्थ्यांमधून कथाकथन व कविता वाचन स्पर्धेसाठी एकूण ४४ मुले निवडण्यात आली होती. अशा मुलांना, कथा कशी लिहावी व कवितेबाबत मार्गदर्शनार्थ स्वतंत्र सत्रे आयोजण्यात येऊन त्यांना कथाकथन व कविता वाचनाची संधी देण्यात आली. भिडे परिवार (मंगेशी) तर्फे या सर्व ४४ विद्यार्थ्यांना डॉ. अब्दुल कलाम यांच्या चरित्राच्या प्रती वाटण्यात आल्या. त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांसाठी खाऊ देण्यात आला.

### पुणे केंद्र

नेहमीप्रमाणे प्रतिष्ठानतर्फे 'रंगारंग दिवाळी पहाट' हा कार्यक्रम दि. ७ नोव्हेंबर २०१८ रोजी पहाटे ५.१५ ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत करण्यात आला. त्याला हजारो पुणेकर रसिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

कार्यक्रमात कु. आर्य काकडे व सहकारी प्रिया डान्स अकॅडमी यांचे ताशा वादन व सोलो डान्स, वंदन नगरकर यांचा रामनगरी हा कार्यक्रम आणि जितेंद्र भुरुक व सहकारी यांचा डोलायला लावणाऱ्या लावण्यांचा, गाण्याचा दिवाळी श्रवणीय फराळ, यांची मेजवानी रसिक प्रेक्षक श्रोते यांनी लुटली.

त्या कार्यक्रमात दिवाळी पहाट पुरस्कारही मा. श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते व मा. मेघराज भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत वाटण्यात आले :

१. श्री. नागराज मंजुळे, सिने दिग्दर्शक

२. प्राजक्ता गायकवाड, 'संभाजी' मालिकेतील प्रसिद्ध व्यक्तिरेखा महाराणी येसूबाई

### कृषी व्यासपीठ

खालील वक्त्यांची भाषणे झाली

| दिनांक | वार | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| २५/१०/२०१८ | गुरुवार | वनशेती | अभय भंडारी |
| २९/११/२०१८ | गुरुवार | शाश्वत शेती | कोरडे गुरुजी |
| ४/०१/२०१९ | शुक्रवार | कृषी कर्जमाफी महाराष्ट्राची | श्री. एस.बी. पाटील, सहसचिव, सहकार |
| २४/०१/२०१९ | गुरुवार | दुष्काळावर मात | सतिश खाडे |

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

**गदिमा, सुधीर फडके आणि पु.ल. देशपांडे जन्मशताब्दी:**

संगीतकार सुधीर फडके, गीतकार ग. दि. माडगूळकर आणि लेखक पु. ल. देशपांडे या तीन दिग्गजांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व आधार, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लेणे प्रतिभेचे' या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. २७ व रविवार दि. २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी करण्यात आले.

दि. २७ ऑक्टोबर, २०१८ रोजी सायं. ६.०० वाजता टाऊन हॉल, अमरावती येथे रविवार दि. २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १० वाजता दत्ता मेघे सभागृह, सावंगी, वर्धा येथे व दि. २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी सायं. ५ वाजता वसंतराव देशपांडे सभागृह सिव्हील लाईन्स, नागपूर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

गीत, संगीत नृत्य, दृक्श्राव्य अविष्कार असलेल्या या कार्यक्रमाची निर्मिती सुनील महाजन यांची होती. नृत्य आणि दिग्दर्शन अक्षदा देशमुख यांचे, गायन – श्री. राहूल घोरपडे, प्रतिभा थोरात आणि रमा कुळकर्णी यांचे होते. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. गिरीश गांधी, डॉ. अविनाश रोडे, श्री. हेमंत काळीकर, श्री. समीर सराफ, श्री. सोमेश्वर पुसतकर, श्री. संजय इंगळे– तिगावकर होते. कार्यक्रमाचे निवेदन सौ. शुभदा फडणवीस यांनी केले.

**स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी :**

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त मागील तीन वर्षापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला रोख रुपये पंधरा हजार, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेला 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात येत असते.

२०१८ चा 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेचे संयोजक मा. डॉ सतीश गोगुलवार व मा. सौ. शुभदा देशमुख–गोगुलवार यांना देण्यात आला. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' ही संस्था महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यांतील आदिवासी व दुर्गम भागातील गरीब नागरिकांना स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यरत आहे. हा पुरस्कार सोहळा दि. २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे प्रसिद्ध समीक्षक व लेखक मा.डॉ. कुमार शास्त्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी, सिने दिग्दर्शक व जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. रामदास फुटाणे होते.

**'शेवटाचा आरंभ' – कादंबरी प्रकाशन समारंभ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र. नागपूरच्यावतीने विद्या बुक्स, औरंगाबाद प्रकाशित 'बलात्कार : एक सामाजिक विकृती' या विषयावर आधारित सौ. ज्योती पुजारी लिखित 'शेवटाचा आरंभ' या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

हा कादंबरी प्रकाशन सोहळा शनिवार १७ डिसेंबर, २०१८ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व दैनिक सकाळचे संपादक मा.श्री. शैलेश पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

दैनिक महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक मा.श्री. श्रीपाद अपराजित आणि कवयित्री व लेखिका मा. सौ. मनिषा अतुल यांनी कादंबरीवर भाष्य केले.

**व्याख्यान व सत्कार समारंभ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र. नागपूर व महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, नागपूर विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'समय, समाज और साहित्य' या विषयावर विशेष व्याख्यानमालेचे आयोजन रविवार दि. २३ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी मा.प्रा.डॉ. प्रमोद शर्मा यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या प्रबंधन परिषदेच्या सदस्यपदी नियुक्तीबद्दल व मा. डॉ. बसंत त्रिपाठी यांची इलाहाबाद केंद्रीय विश्वविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे कुलपती मा.प्रा गिरीश्वर मिश्र होते. हा कार्यक्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**'वणव्यातील उष:काल' :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने 'वणव्यातील उष:काल' कवी श्री. सुधाकर वी. पुंजे लिखित गजल संग्रह प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा प्रकाशन सोहळा रविवार दि.३ फेब्रुवारी,२०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत मा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी मा. डॉ. देविदासजी इंदापवार, श्री. राजेश कुबडे, श्री. श्रीराम केदार, श्री नागेश दंडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



शरद पवार यांचे समवेत ( वर्ष १९७८)

# विभागीय केंद्र, नाशिक

## कार्यवृत्त

**चित्रपट चावडी : 'अंडर द स्मोकी रूफ'**

**शनिवार, ६ ऑक्टोबर २०१८**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध इराणी दिग्दर्शक पुरन दाराक्शंदे यांचा 'अंडर द स्मोकी रूफ' हा चित्रपट दाखविण्यात आल. शिरीन नावच्या महिलेचे नवऱ्याशी व मुलासोबतचे संबंध बिघडले आहेत. ते सुधारण्याचा व त्यांच्याशी संवाद साधण्याचा ती आटोकाट प्रयत्न करत आहे. पण परिस्थिती आटोक्याच्या बाहेर जाते आणि त्यातून नवीन प्रश्न उभे राहतात. स्त्री-पुरुष नातेसंबंधातील गुंतागुंतीचा वेध घेण्याचा प्रयत्न दिग्दर्शकाने त्यातून केला आहे. सन २०१५ मध्ये इराण येथे प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १०७ मिनिटांचा होता.

**आर्थिक साक्षरता : विश्वास समिती**

**शनिवार, ६ ऑक्टोबर २०१८**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक व विश्वास ज्ञानप्रबोधनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडियो विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडियो यांच्या संयुक्त विद्यमाने मार्च २०१८ पासून नाशिक मध्ये एकूण ५५ वसाहतींमध्ये वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवीत आहोत. या उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक साक्षर बनविण्यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. याकरिता वसाहतींमध्ये सर्व्हे करण्यात आला. या सर्व्हेच्या माध्यमातून पॅन कार्ड कॅम्प घेण्यात आला. मात्र त्यातून असे लक्षात आले की, वसाहतीमध्ये महिलांची एक समिती असणे गरजेचे आहे, ज्यामुळे महिलांना पॅन कार्ड काढणे, आधार कार्डमध्ये दुरुस्ती करणे, नवीन आधार कार्ड काढणे, बचत गट चालू करणे, राज्य शासन व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती या सारख्या अनेक कामांसाठी इतरत्र फिरण्याची गरज भासणार नाही, व त्या स्वत: स्वत:च्या कामासाठी सक्षम होतील. तसेच त्यांना बँकींगसंदर्भात माहिती देण्याच्या हेतूने या समितीचा उपयोग होऊ शकतो. या हेतूने संस्थेने प्रत्येक वसाहतीमध्ये 'विश्वास समिती' स्थापन करण्याचे ठरविले.

१. विश्वास समितीच्या माध्यमातून वसाहतीमधील महिला एकत्र याव्यात व स्वविकास साधून स्वावलंबी व्हाव्यात या उद्देशाने विश्वास समितीची स्थापना करण्यात आली.

२. विश्वास समितीच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक साक्षर व्हावे, तसेच कोणत्याही प्रकारच्या सामाजिक कामांसाठी समितीमधील महिलांनी इतर महिलांसोबत संवाद साधावा.

३. विश्वास समितीच्या माध्यमातून वसाहत पातळीवर विविध शिबिरांचे उदा. पॅन कार्ड शिबिर, आधार कार्ड शिबिर, लघु उद्योग प्रशिक्षण, बचत गट स्थापना आदी कार्यक्रम आयोजित करणे.

४. राज्य शासन केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ महिलांना समितीच्या माध्यमातून घेता यावा या उद्देशाने समितीची स्थापना करण्यात आली.

**वाचन प्रेरणा दिन**

**शनिवार ६ ऑक्टोबर २०१८**

पुस्तके जीवनाला दिशा देणारी असतात. त्यामुळेच जगण्याच्या विचारांच्या, जाणिवांच्या कक्षा रुंदावण्याचे काम करतात. जितकी पुस्तके वाचू, तितका जगण्याचा आशय कळत जातो. त्यासाठी पुस्तकांशी मैत्रीची शिदोरी जीवनभर पुरणारी असते, असे प्रतिपादन विश्वास जयदेव ठाकूर यांनी केले. विश्वास को-ऑप. बॅक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नाशिक व विश्वास ज्ञानप्रबोधनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडियो विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडीयो यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून आयोजित करण्यात येतो. त्यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. श्री. ठाकूर म्हणाले, समाज घडविण्याची ताकद पुस्तकांमध्ये असते. थोर संत

महात्मे यांच्या विचारांचे, कार्याचे अवलोकन करावे असेही ते म्हणाले. राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या कार्यक्रमाचा वेधही त्यांनी घेतला. पु.ल. देशपांडे, ग.दि. माडगूळकर यांचे जन्मशताब्दी वर्ष तर नाटककार राम गणेश गडकरी यांचे स्मृती शताब्दी वर्ष असल्याने त्यांचे साहित्य प्रदर्शन मांडण्यात आले होते. विविध स्पर्धापरीक्षांना उपयुक्त पुस्तके, सहकार, बॅंकिंग विषयी संदर्भग्रंथही प्रदर्शनात मांडण्यात आले होते.

### आधार कार्ड शिबिर

आधुनिकीकरणाच्या काळात आपल्या देशात आर्थिक विकासाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. आज आपल्या देशात होत असलेले डिजिटलायझेशन Digitization, मेक इन इंडिया Make in India, स्मार्ट सिटी Smart City, स्टार्ट अप Start up, यांचा विकास हा आर्थिक विकासाचा एक भाग आहे. आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्नात वाढ या बरोबर सामाजिक कल्याणात वाढ हा ही आर्थिक विकासाचा भाग आहे. म्हणून आर्थिक विकास ही संकल्पना समजणे महत्त्वपूर्ण आहे. वरील 'सामाजिक कल्याण' ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून समाजातील तळागाळातील लोकांचा आर्थिक व सामाजिक स्तर सुधारावा या हेतूस्तव विश्वास को-ऑप. बॅंक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, सारस्वत बॅंक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील ५५ वसाहतींमध्ये 'विश्वास आर्थिक साक्षरता अभियान' मार्च २०१८ पासून राबविले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेतून सोमवार, ८ ऑक्टोबर २०१८ ते बुधवार, ३१ ऑक्टोबर २०१८ दरम्यान आधारकार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये नवीन आधारकार्ड काढणे, आधारकार्डमध्ये दुरुस्ती, आधारकार्ड संदर्भात सर्व शंकांचे निरसन करण्यात आले. विश्वास को-ऑप. बॅंकेच्या ११ शाखांमध्ये हे शिबिर राबविण्यात आले. त्याला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### चित्रपट चावडी : 'द सिटीझन केन'

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक ऑरसन वेल्स यांचा 'द सिटीझन केन' हा चित्रपट दाखविण्यात आला. चार्ल्स फॉस्टर केन या एका अतिश्रीमंत आणि प्रभावशाली वृत्तपत्राच्या मालकाची ही कथा आहे. मृत्यूसमयी केन 'रोझ बड' हा शेवटचा शब्द उच्चारतो आणि मृत्यूनंतर पत्रकार त्याचे अर्थ लावतात. 'सिटीझन केन' ही या शब्दाचा अर्थ लावण्यासाठी केलेली धडपड आहे. एका माणसाचा उत्कर्ष आणि पतन यांची ही रोमहर्षक करुण कहाणी आहे. सन २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या या अमेरिकन चित्रपटाचा कालावधी १२० मिनिटांचा होता.

### चित्रपट चावडी : 'द ट्राय'

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक ऑरसन वेल्स यांचा 'द ट्रायल' हा चित्रपट दाखविण्यात आला. 'द ट्रायल' हा चित्रपट सुप्रसिद्ध लेखक फ्रान्स काफ्का यांच्या कादंबरीवर आधारित होता. न्यायव्यवस्था व नोकरशाहीविरुद्ध लढणाऱ्या एका व्यक्तीची ही कहाणी होती. सर्वसामान्यांचे व्यक्तिगत अधिकार, अस्तित्व यांची चर्चा या चित्रपटात आहे. यातील नायकाला कुठलेही कारण न देता अटक होते. त्यानंतर चौकशीतून वेगळेच चित्र समोर येते. सन १९६२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या अमेरिकन चित्रपटाचा कालावधी ११८ मिनिटांचा होता.

### आहार, विहार, विचार, आचार मिळून स्वास्थ्याचा विचार : सेंद्रीय शेतीतज्ज्ञ जितुभाई कुटमुठीया

आहार, विहार, विचार, आचार मिळून स्वास्थ्याचा विचार पूर्ण होतो, त्यासाठी नकारात्मक विचार न करणे हा सर्वात मोठा सकारात्मक विचार आहे, त्याकरिता शरीरासाठी आवश्यक आणि मूलभूत गोष्टींचा विचार करणे म्हणजे निरोगी आयुष्य होय, असे प्रतिपादन सेंद्रीय शेतीतज्ज्ञ जितुभाई कुटमुठीया यांनी केले. आर्किटेक्ट मंजु बेळे-राठी यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

श्री. कुटमुठीया म्हणाले की, जगातील अशी एकही व्यक्ती नाही, ज्यांना एखादा विकार किंवा आजार नाही. वडापाव आपण अगदी चवीने खातो, पण आपलं पोट त्याला 'नाही' म्हणतं. तरीदेखील आपण चवीचवीने खातो आणि त्रास करून घेतो. आपल्यामध्ये कायम सकारात्मता असावी. आपल्यातील नकारात्मकतेमुळे आपण मानसिक ताण वाढवून घेतो त्याचा शेवटी आपल्या शरीरावर विपरीत परिणाम होतो. मधुमेह

असलेल्यांनादेखील तीन महिने औषध सेवन न करता बंद ठेवून त्यांची प्रकृती उत्तम राहिल्याचे त्यांनी उदाहरण दिले. औषधांच्या जास्त सेवनानेदेखील विविध आजार बळावतात. औषधांच्या सवयीमुळे त्यातील अनावश्यक घटक लिव्हरपर्यंत पोहोचतात. या सवयीमुळे विविध आजार वाढून माणसावर मृत्यूदेखील ओढवला जाऊ शकतो.

आपण हायजेनिक- हायजेनिक म्हणतो पण आपल्या शरीरात देखील बॅक्टेरीया असतो. लहान मुलांना आपण अन्न पाणी सर्व काही स्वच्छ देतो, उकडून देतो पण बाहेरचं काही खाल्लं तर ते लगेच आजारी पडतात. कारण, त्यांची रोग प्रतिकारशक्ती कमी असते.

माजी कृषी मंत्री खा. शरद पवार यांनी जितुभाई यांच्या सेंद्रीय शेती प्रक्रियेची दखल घेतल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जेव्हा आमच्या पिकांवर बी-१२ रोग नव्हता, तेव्हा तेथील एका संस्थेच्या एचओडीकडून त्यांनी खात्री केली की बी-१२ चा प्रादुर्भाव राज्यात सर्वत्र असताना आमच्या शेतातील पिकांवर हा रोग नव्हता, ही खात्री होताच शरद पवार यांनी जितुभाई यांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांची प्रशंसा केली. हा रोग आमच्या कोणत्याही पिकांवर नव्हता कारण कोणत्याही प्रकारचं रासायनिक खत आमच्या पिकांवर टाकत नसल्याचे ते म्हणाले. क्लोरीनचं पाणी आपल्या शरिराला खूप घातक असतं. जैन समाज बांधव पाण्यात राख टाकून पाणी पितात. त्याने पाण्यातील क्लोरीन कमी होऊन पाण्यातील मिनरल्स वाढतात. आपण देखील रोज सकाळी संध्याकाळी पाण्यात राख टाकून पाणी प्याले पाहिजे. देशी शुद्ध तूप, कच्च्या घाण्याचे खोबऱ्याचे तेल शरीरासाठी चांगले असते. रिफाईन तेल शरीरासाठी घातक असते. गहू, साखर, रिफाईन्ड ऑईल दूर केल्यास तुम्हाला कोणताही आजार होणार नाही. त्याऐवजी नागली, भात खावा, असेही ते म्हणाले.

आपण फळांवर कीटकनाशकांचा मारा करतो. कीटक नाशकांसह खातो आणि आजारपण ओढवून घेतो. एखाद्या पिकावर जिवाणू असतात, पीक काढल्यावर ते मरतात मग जमिनीवर पसरतात आणि पाऊस पडल्यावर बी १२ सारखे रोग पिकांवर पसरतात. घरात आपण झाडलेली धूळ, मातीसुद्धा आपल्या कुंडीतील रोपं चांगल्या पद्धतीने वाढवते.

'मेक वर्ल्ड बेटर' या संकल्पनेच्या माध्यमातून अशी अनेक व्याख्याने आणि पर्यावरण उपक्रम विनामूल्य स्वरूपात कोणताही आर्थिक उद्देश समोर न ठेवता पर्यावरणाच्या आणि मानवी आरोग्याच्या संरक्षणासाठी आपण यापुढे राबवणार असल्याचे मंजु बेळे-राठी म्हणाल्या. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना जितूभाईंनी उत्तरे दिली. कार्यक्रमास डॉ. सुधीर संकलेचा, किरण चव्हाण, विनायक रानडे, धनंजय ठाकूर, मनिष मारू, शैलेश येवले, नीता वैद्य, अश्विनी देशपांडे, जय नरसे, श्रीकांत चिंचोलीकर, प्रकाश कठपाळ, विनोद चावला, सुनंदा सोनी, संदीप मदाने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मंजु बेळे-राठी यांनी केले.

## चित्रपट चावडी : 'टच ऑफ एव्हील'

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक ऑर्सन वेल्स यांचा 'टच ऑफ एव्हील' हा चित्रपट दाखविण्यात १७ नोव्हेंबर, २०१८ रोजी आला. मेक्सीकन अंमली पदार्थ विरोधी अधिकारी माईक व्हर्गास त्याची देखणी अमेरिकन बायको सुसान, अमेरिकन भ्रष्ट पोलीस अधिकारी हँक क्वीनलन आणि अंमली पदार्थांच्या तस्करीत गुंतलेले ग्रँडी कुटुंबीय अशी अनेक पात्रे या थरारपटात एकत्र येतात. एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात नक्की काय होते हे पाहणे उत्कंठावर्धक आहे. कृष्णधवल रंगातील हा गुन्हेगारीपट वेल्सच्या कारकीर्दीतील एक महत्त्वाचा चित्रपट आहे. सन १९५८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या अमेरिकन चित्रपटाचा कालावधी ९६ मिनिटांचा होता.

## विंदांच्या समृद्ध व नाट्यमय सहित्य सादरीकरणाने रसिकांना अनोखी अनुभूती

महाराष्ट्राचे थोर शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३४ व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला, २४ नोव्हेंबर २०१८ रोजी कवी विंदा करंदीकर यांच्या समग्र साहित्य निर्मितीचे दर्शन घडविणाऱ्या 'स्वच्छंद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विंदांच्या लेखनातील नाट्यमयता, चित्रमयता यांचे अनोखे दर्शन कार्यक्रमातून घडत होते. कवीला, लेखकाला दूरदृष्टी असावी आणि त्यातून काळाचे प्रश्न नेमकेपणामे मांडता येतात याचाच हा अनुभव होता. सर्वसामान्य माणूस हा केंद्रबिंदू

असलेल्या विंदांचे लेखन म्हणूनच आपलेपणाची जाणीव करून देते, हाच प्रत्यय येत होता. विंदांच्या मनाची विशालता व जीवनप्रवास यातून समोर आला.

वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान, कणकवली निर्मित 'स्वच्छंद' कार्यक्रमात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी विंदा करंदीकर यांच्या समग्र साहित्याचे दर्शन घडविण्यात आले. यात विंदांचे ललित लेखन, नाटक, बालकविता अनुवाद, वैचारिक साहित्याचे प्रभावीपणे सादरीकरण करण्यात आले.

### चित्रपट चावडी : 'चाईम्स ॲट मिडनाईट'

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक ऑर्सन वेल्स यांचा 'चाईम्स ॲट मिडनाईट' हा चित्रपट १ डिसेंबर, २०१८ रोजी दाखविण्यात आला. ऑर्सन वेल्सचा मालिकेतील हा चौथा व शेवटचा चित्रपट. शेक्सपीअरच्या चौथ्या हेन्री नाटकातील सर जॉम फालस्टाफ हे रंगतदार, चलाख व उमदे पात्र घेऊन चित्रपटाची कथा रचली आहे. उंच्यापुऱ्या, धिप्पाड व्यक्तिमत्वाचा सरदार, राजपुत्र हालचा शाळेतील सोबती आहे. त्याच्या अनेक करामतींनी नटलेला, मध्ययुगीन इंग्लडची अस्सल पार्श्वभूमी असलेला हा चित्रपट. सन १९६५ मध्ये प्रदर्शित झालेल्या या अमेरिकन चित्रपटाचा कालावधी ११५ मिनिटांचा होता.

### चित्रपट चावडी : 'विरीडीयाना'

सुप्रसिद्ध स्पॅनिश दिग्दर्शक लुई ब्युनेल यांचा 'विरीडीयाना' हा चित्रपट १५ डिसेंबर, २०१८ रोजी दाखविण्यात आला. सर्वश्रेष्ठ चित्रपट दिग्दर्शकांच्या यादीतील एक नाव म्हणजे स्पॅनिश लुई ब्युनेल. लेखक, दिग्दर्शक, नट, निर्माते अशा विविध भूमिकांत त्यांनी स्पेन व मेक्सिको मधून प्रदीर्घकाळ चित्रनिर्मिती केली. कलांमधील अतिवास्तववाद चित्रपटात आणणारे ते पहिले दिग्दर्शक होते. राजकारण, धर्म, नैतिकता, सामाजिक प्रश्न यांची परखड चिकित्सा त्यांच्या चित्रपटातून दिसते. विरीडीयाना ही एका तरुण ननची कथा आहे. मदरच्या विनंतीवरून ती तिच्या काकांना भेटण्यासाठी जाते. परंतु काकांच्या विपरीत वागणुकीमुळे तिच्यावर भलतेच धर्मसंकट ओढवते. त्यातून निर्माण झालेल्या अपराधी भावनेतून विरीडियाना काय करते हे जाणून घेण्याचा प्रयत्न चित्रपटातून झाला आहे. सन १९६१ मध्ये प्रदर्शित झालेल्या या स्पॅनिश चित्रपटाचा कालावधी ९० मिनिटांचा आहे.

### 'विसर्जन' नाट्यप्रयोगाचे आयोजन

५८ व्या हौशी राज्य नाट्यस्पर्धेत नाशिक केंद्रातून सर्वोत्कृष्ट ठरलेल्या व तब्बल ७ पारितोषिके विजेत्या 'विसर्जन– डोहातील आकाश शोधाची गोष्ट' या नाटकाच्या खास प्रयोगाचे आयोजन २२ डिसेंबर, २०१८ रोजी करण्यात आले होते. विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲंड रिसर्च इन्स्टिट्यूट, सपान व अश्वमेध थिएटर्स तर्फे विश्वास ठाकूर यांची निर्मिती असलेल्या या नाटकाचे लेखन दत्ता पाटील यांनी केले होते. दिग्दर्शक सचिन शिंदे आहेत, तर सूत्रधार विनायक रानडे आहेत. समकालीन जगणं, त्यातील अतोनात संघर्ष, नव्या पिढीपुढील अंधारयुग या सर्वातून सुरू होणारा प्रवास आणि त्या प्रवासासाठी हवं असणारं 'शोधाचं' निमित्त, आस या सर्व गोष्टी अतिशय साध्या, मनाला भावणाऱ्या अप्रतिम गोष्टीतून 'विसर्जन' हे नाटक दिमाखदारपणे साकारलं आहे. पहिल्याच प्रयोगात गर्दीचे उच्चांक या नाटकाने मोडले आहेत.

समकालीन नाट्य प्रवाहात आशय, विषय, सादरीकरण या बाबींमध्ये या नाटकाने वेगळेपण सिद्ध केले आहे. नाशिकमधील गुणवान कलाकारांना त्यांच्या प्रतिभेला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनी, सपान, अश्वमेध थिएटर्स यांनी संयुक्तपणे हे पाऊल उचलले आहे. इथल्या नाट्यपरंपरेला नवी ऊर्जा आणि बळ देण्यासाठी प्रयत्नांचा हा भाग आहे.

सदर नाटकासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को–ऑप बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲंड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांचे सहकार्य लाभले आहे. नाट्यप्रयोगानंतर आ. श्री. हेमंत टकले यांचे हस्ते 'विसर्जन' नाटकातील कलावंतांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते म्हणाले की, नाशिककर कलावंतांना, त्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ देण्यासाठी अशी नाटकं मोलाची भूमिका बजावत असतात. त्यातून त्यांच्या मूलभूत उर्जेला दिशा मिळत असते. कार्यक्रमाला लोकमतचे संपादक किरण अग्रवाल, रविंद्र पगार, डॉ. मनोज शिंपी आदी मान्यवर उपस्थित होते.

**सुप्रसिद्ध लेखक वसंत वसंत लिमये यांची जाहीर मुलाखत :**

काहीतरी नवीन घडवण्याची जिद्द आणि त्यासाठी करावी लागणारी धडपड या दोन गोष्टी माझ्या जीवनाला दिशा देणाऱ्या ठरल्या. आयुष्याच्या वळणावर आल्यावर नवा रस्ता दिसत गेला. वाट सापडत गेली. धडपड प्रामाणिकपणे केल्यास चांगली माणसे आपोआप भेटतात असे प्रतिपादन. सुप्रसिद्ध लेखक वसंत वसंत लिमये यांनी केले. लिमये यांची मुलाखत आ. हेमंत टकले यांनी घेतली. २३ डिसेंबर, २०१८ रोजी ही मुलाखत झाली.

जीवनातील विविध अनुभवांचा प्रवास लिमये यांनी उलगडून दाखवला. ते म्हणाले की, वडिलांकडून मनस्वीपणा हा गुण घेतला. गिर्यारोहण, फोटोग्राफी, नाटकात अभिनय, साहस शिबिरे यात स्वतःला शोधत होतो. तो जगण्याचा आनंदाचा भाग होता, आय.आय.टी. मधील शिक्षण, स्कॉटलँड, सौदी अरेबिया, यु.के. अशा विविध देशात फिरून विविध अनुभव घेतले. डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या सांगण्यावरून निखिल वागळेंच्या 'महानगर'मधील 'धुंद-स्वच्छंद' या कॉलमचे लेखन आणि त्यानंतर दिनकर गांगल यांचा सहवास लेखनाकडे नेण्याची प्रक्रिया होती. आणि त्यानंतर 'लॉक ग्रिफिन' 'विश्वस्त' सारख्या कादंबऱ्यांचे लेखन आणि त्याला मिळालेली वाचकप्रियता माझ्या लेखनाला बळ देणारी होती. 'सत्य आणि कल्पित' या सीमारेषेवर घडणारे नाट्यमय खेळ हे माझ्या कादंबऱ्यांचे सूत्र आहे. लिमये यांच्या जीवनाचा वैविध्यपूर्ण सृजनशील प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल, असाच आहे.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विनायक रानडे यांनी केले. तर लिमये यांचा सन्मान डॉ. मनोज शिंपी यांनी केला. टकले यांचा सन्मान मिलींद जहागीरदार यांनी केला. सदर कार्यक्रमास बी.जी.वाघ, गणेश ओतुरकर, नरेश महाजन, डी. जे. हंसवाणी, डॉ. राहूल पाटील, डॉ. शरद बिन्नोर, पंकज क्षेमकल्याणी, अश्विनी कुलकर्णी, रघुनाथ सावे, मिलिंद जहागीरदार आदी मान्यवर उपस्थित होते.

**'साहिर-हर पल का शायर'**

रोजच्या जगण्यातल्या क्षणांचं हळुवार गाणं होतं. त्यातून जीवनाला व्यापून उरणारा आशय निर्माण होतो. शब्द व गीत यांतील अंतर सहज मिटूनही जातं आणि रसिकांना अनोखी अनुभूती येते. गुलाबी थंडीत स्वरांची भेट मिळते. गीतकार साहिर लुधियानवी यांच्या गीतांची 'साहिर-हर पल का शायर' मैफिलीने अनेक अर्थांनी समृद्ध केले. नातेसंबंधातील वीण उसवतानाच सामाजिक राजकीय भावनांचा उद्गार साहिर यांच्या गीतात होता. श्रमजीवी ते प्रेमाचे अनेक रंग त्यांनी आपल्या लेखनातून मांडले आणि वास्तववार भाष्य केले.

निमित्त होते नववर्षाच्या पूर्वसंध्येला, ३१ डिसेंबर २०१८ रोजी नव्या संकल्पांची नवी मैत्री, नवी ओळख आनंदाची जाणीव असलेल्या नवीन वर्षाची सुरुवात ही थोड्याशा आगळ्यावेगळ्या पद्धतीने व्हावी, याकरिताच नववर्षाच्या पूर्वसंध्येला काही चांगले संकल्प घेऊन नवीन वर्ष आपण सर्वांनीच एका वेगळ्या प्रकारे साजरे करावे या संकल्पनेतून विश्वास ग्रुप, विश्वास हॅपीनेस सेंटर तर्फे व विश्वास संकल्प आनंदाचा उपक्रमांतर्गत गीतकार साहिर लुधियानवी यांच्या समधुर गीतांची मैफल 'साहिर-हर पल का शायर' या मैफिलीचे आयोजन करण्यात आलेले होते. मैफिलीची संकल्पना विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर यांची होती.

विश्वास को-ऑप बँक लि. नाशिक, सारस्वत बँक, फ्रॅवशी इंटरनॅशनल अॅकेडमी, जुम्मा मस्जिद चॅरिटेबल ट्रस्ट, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक व विश्वास गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास दत्ता गायकवाड, निवृत्ती अरिंगळे, नानासाहेब सोनवणे, डॉ. प्रदिप पवार, हेमलता पाटील, अॅड. नितीन ठाकरे, रतन लथ, शर्वरी लथ, शेफाली भुजबळ, योगेश हिरे, विलास हावरे, डॉ. मनोज शिंपी, विनायक रानडे, डॉ. सुधीर संकलेचा अजित मोडक, गिरीष देवस्थळी, आनंद सोनवणे, नितीन महाजन, अमित शहा, कविता कर्डक, शामला दीक्षित, संजय चौधरी, मंगला कमोद, अमर भागवत, अनिल लाड, डॉ. सुभाष पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

**चित्रपट चावडी : 'द यंग अँड द डॅम्ड'**

'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक लुई ब्युनेल यांचा 'द यंग अँड द डॅम्ड' हा चित्रपट ५ जानेवारी,

२०१९ रोजी दाखविण्यात आला.

त्यांचा हा दुसरा चित्रपट होता. ब्युनेल यांनी १९५० मध्ये मेक्सिको सीटी ह्या मेक्सिकोच्या राजधानीत बनविला. रस्त्यावर गुंडगिरी मवालीगिरी करत फिरणाऱ्या काहीशा उपेक्षित तरुण मुलांचे विश्व – चित्रपटात मांडले आहे. त्यांचा नेता आहे जयबो. पेड्रो हा लहान वयाचा मुलगा त्याच्या प्रभावाखाली येतो. घरी मायेची ऊब नसल्याने पेड्रोला रस्त्यावरील अमानुष वास्तवाला सामोरे जावे लागते. जयबोचा अहंकार आणि पाशवी वृत्ती त्या टोळक्याला हिंसेच्या गर्तेत घेऊन जाते. अतिवास्तववादाच्या अंगाने जाणारा हा मेलोड्रामा प्रेक्षकांना सुन्न करून टाकतो. सन १९५० मध्ये प्रदर्शित झालेल्या या स्पॅनिश चित्रपटाचा कालावधी ८० मिनिटांचा आहे.

### चित्रपट चावडी : 'नाझरीन'

सुप्रसिद्ध स्पॅनीश दिग्दर्शक लुई ब्युनेल यांचा 'नाझरीन' हा चित्रपट १९ जानेवारी, २०१९ रोजी दाखविण्यात आला.

अतिशय साध्या सरळ कथानकाचा 'नाझरीन' हा ब्युनेल यांचा मास्टरपीस समजला जातो. नाझरीन हा एक मेक्सिकोतील छोट्या शहरातील धर्मोपदेशक आहे. तो वेश्या, गुन्हेगार, भिकाऱ्यांच्या वस्तीत राहतो. त्याच्या आयुष्यात अनेक पात्रे व प्रसंग येतात व त्याची कसोटी पाहतात.... अत्यंत धार्मिक वृत्तीचा व दृढ श्रद्धा असलेला 'नाझरीन' आजूबाजूच्या विपरीत परिस्थितीने गांजून जातो. दिग्दर्शक ब्युनेल ह्या चित्रपटात श्रद्धा, सेवा, धर्म व परिस्थितीने निर्माण केलेली अगतिकता ह्यांचे द्वंद्व ताकदीने उभे करतो. सन १९५९ मध्ये प्रदर्शित झालेल्या या स्पॅनिश चित्रपटाचा कालावधी ९४ मिनिटांचा आहे.

### विश्वास आर्थिक साक्षरता अभियान

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को–ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, विश्वास ग्रुप, यशस्विनी सामाजिक अभियान यांनी समाजातील तळागाळातील महिलांसाठी 'विश्वास आर्थिक साक्षरता अभियाना'च्या माध्यमातून अभिनव उपक्रमाची सुरुवात केली आहे. 'विश्वास आर्थिक साक्षरता अभियान' हे अभियान आर्थिक विकास हा फक्त वस्तू व सेवांच्या उत्पादनाशी निगडित नसून समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये विकासात्मक बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत आहे. यात समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत तळागाळातील घटकांपर्यंत विकासाचे फायदे पोहोचवणे, आर्थिक व्यवस्थापन, दारिद्र्य निर्मूलन, समाजातील सर्व घटकांचे जीवनमान उंचावणे, शासनाच्या योजनांची माहिती पुरविणे म्हणजे विश्वास 'आर्थिक साक्षरता अभियान' होय.

बँकिंग क्षेत्र हे दिवसेंदिवस प्रगत होत आहे. ग्राहकांना विविध सेवा पुरविण्यासोबतच डिजिटल क्रांतीचा स्वीकार बँकांनी केला आहे. समाजातील अनेक लोक असे आहेत की ज्यांना बँकिंग क्षेत्राबाबत अतिशय जुजबी माहिती असते. अशा लोकांना खाते उघडण्यापासून ते शासनाच्या बँकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती सविस्तरपणे मिळावी, यासाठी विश्वास आर्थिक साक्षरता अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत किशोरवयीन मुलामुलींपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना बँकेच्या व्यवहाराबाबत साक्षर केले जाते. विश्वास आर्थिक, साक्षरता अभियान अंतर्गत नाशिक मधील रेडिओ विश्वास च्या संपर्क क्षेत्रात येणाऱ्या ५५ वस्त्यांमध्ये विश्वास आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत ५५ वसाहतींमध्ये महिला, युवक, युवती, यांना पॅन कार्ड काढण्याकरिता त्यांच्या वसाहती मध्ये पॅन कार्ड कँप राबविणे, आधार कार्ड अपडेट करणे, बँकेत खाते उघडणे, बचत गटांचे खाते उघडणे, बचत गटांना लघु उद्योगांचे प्रशिक्षण देणे, तसेच नाशिक मधील महानगर पालिकेच्या शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये आणि वसाहतींमध्ये विश्वास समिती स्थापन करणे व तंबाखू मुक्त अभियान राबविणे, राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती गरजू लोकांपर्यंत पोहचवणे, किशोरवयीन मुलींकरिता आरोग्य विषयक कार्यक्रम राबविणे इ. कार्यक्रमांचे आयोजन १ ऑक्टोबर, २०१८ ते १० फेब्रुवारी, २०१९ दरम्यान या वर्षात करण्यात येत आहे.

उत्कर्ष नगर, मिलिंद नगर, राहुल नगर, भारत नगर, शिवाजीवाडी, सिद्धार्थ नगर, नानावली, कस्तुरबा नगर, कोळीवाडा, वडाळा गांव, जुनी सावित्रीबाई फुले वसाहत, खडकाळी, मंगलवाडी, नागसेन नगर, सरोजबाबा नगर, सुयोग नगर, अण्णाभाऊ साठे नगर, नंदिनी नगर, काझीगढी, म्हसोबा वाडी, मल्हार खान, बजरंग वाडी, पंचशील नगर, तिरुपती

बालाजी मंदीर, भगतसिंग नगर, सहजीवन नगर, इंदिरा नगर, संत कबीर नगर, रामोशीवाडा, क्रांती नगर, पिंगुळबाग, किस्मत नगर, रामवाडी, क्रांती नगर, गोदावरी नगर, किस्मत बाग, फकीर वाडी, मखमलाबाद, भगवती नगर, आदिवाशी पाडा, कोळीवाडा, मोठा राजवाडा इ. ठिकाणी सदर अभियान राबविण्यात आले.

### चित्रपट चावडी : 'द डिस्क्रीट चार्म ऑफ द बुझ्र्वा'

सुप्रसिद्ध स्पॅनीश दिग्दर्शक लुई ब्युनेल यांचा 'द डिस्क्रीट चार्म ऑफ द बुझ्र्वा' हा चित्रपट २ फेब्रुवारी, २०१९ रोजी दाखविण्यात आला.

हा चित्रपट ब्युनेलच्या अतिवास्तवतावादाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. पॅरीसमधील उच्चभ्रू श्रीमंत वर्गातील नगरजनांभोवती कथानक फिरते. जणू काही त्यांचे जीवन म्हणजे एक सातत्याने चाललेली पार्टीच आहे. पण ही पार्टी ही यजमानाविनाच आहे. अनेक चित्रविचित्र प्रसंगांनी भरलेला हा चित्रपट हा शोधाचा अनोखा प्रवास आहे. सन १९७२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या फ्रेंच-स्पॅनिश चित्रपटाचा कालावधी १०२ मिनिटांचा आहे.

### कोवळ्या स्वर तालांनी रंगली 'सूर विश्वास'ची मैफल :

गुरुवार, ७ फेब्रुवारी २०१९ रोजी तरुण पिढीतील अस्सल भारदार स्वरांनी 'विश्वास गार्डन' परिसरात रसिकांना अनोखी स्वर अनुभूती मिळाली. शब्दांच्या पलीकडे असणारा आशयाचा नाद, स्वरतालातून हलकेच निथळत होता. आणि त्याला उपस्थित असलेले चिंब न्हाऊन निघत होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, ग्रंथ तुमच्या दारी, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, विश्वास गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीचे आयोजन विश्वास गार्डन येथे करण्यात आले.

विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक होते. संकल्पना विनायक रानडे यांची होती. उदयोन्मुख गायक प्रीतम नाकील यांनी आपल्या दमदार सादरीकरणाने मैफलीत रंग भरला. नाकील यांनी मैफलीची सुरुवात 'मियाँ की तोडी मध्ये विलंबित ख्यालाने केली.' त्यानंतर तिलक कामोद राग गायला. संत तुकारामांच्या अभंगातून त्यांनी भाव-भक्ती रसानै स्वराभिषेक केला. 'हेचि माझे तप' व 'लक्ष्मी वल्लभा'. ह्या दोन अभंगातून भक्ती रंगात सारे न्हाऊन निघाले. कुमार गंधर्वांच्या गायकीची आठवण प्रीतमने ताजी केली. दोन प्रसिद्ध निर्गुणी भजनांचे गायन केले. शून्य गढ शहर व 'गुरूजी मै तो' या भजनांनी मनाच्या निर्गुणतेचा वेध घेतला. 'अवधूता गगन घटा' या भैरवीने मैफलीची सांगता केली. साथसंगत ईश्वरी दसकर (हार्मोनियम), दिगंबर सोनवणे (तबला), मृत्युंजय वाघ (तानपुरा), हिमांशू कुलकर्णी (तानपुरा) यांनी केली. या वेळी 'ग्रंथ तुमच्या दारी'चे शिल्पकार विनायक रानडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. कवी सी. एल. कुलकर्णी यांच्या हस्ते रानडे यांचा सत्कार करण्यात आला. सी. एल. कुलकर्णी यांनी विनायक रानडे यांच्या ग्रंथ चळवळीच्या वाटचालीचा प्रवास व त्यांची योजकता कथन केली. निरपेक्ष वृत्तीने कार्याचा गौरव केला.

विश्वास ठाकूर म्हणाले, नाशिक ही कलावंतांची भूमी असून त्यांचा शोध घेऊन त्यांच्या कलाविष्काराला दाद देण्याचा 'सूर विश्वास'च्या माध्यमातून हा प्रयत्नांचा भाग आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. मनोज शिंपी यांनी केले. या प्रसंगी आ. हेमंत टकले, अॅड. विलास लोणारी, आर्कि. संजय पाटील. आर्की. धनंजय शिंदे, डॉ. सुधीर संकलेचा, डॉ. अनिरूद्ध धर्माधिकारी, शाम पाडेकर, रतन लथ, शर्वरी लथ, अनिल लाड, गिरीष देवस्थळी, गिरीष टकले, डॉ. हेमंत कोतवाल, डॉ. मनोज चोपडा, नगरसेवक योगेश (मुन्ना) हिरे, डॉ. प्रदीप पवार, अॅड. नंदकिशोर भुतडा, कवी किशोर पाठक, छायाचित्रकार प्रसाद पवार, किरण चव्हाण, संगीता धायगुडे, दत्ता पाटील, शेखर चिरमाडे, विवेक गरूड, मिलींद धटिंगण, डी. जे. हंसवाणी, अमित शहा, अमर भागवत, किरण निकम आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी राहुल भावे (पद्मावती केटरर्स), धनश्री भुसे (ज्युस लाईफ), स्टॅनले फर्नांडीस (टोकॅटो), संतोष देशपांडे (देशपांडे सोलकढी), अमोल कासार (आराधना परफ्यूम) यांचे सहकार्य लाभले.

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

### फ्रेंच चित्रपट 'ब्रेथलेस'चे प्रदर्शन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या महाविद्यालय आयोजित 'चित्रपट चावडी' या उपक्रमांतर्गत १९६० मधील जीन–लुक–गोडार्ड दिग्दर्शित व लिखित 'ब्रेथलेस' हा फ्रेन्च चित्रपट मंगळवार, दि. २० नोव्हेंबर २०१८ रोजी सायं. ६ वा., आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे दाखविण्यात आला.

गोदार्डच्या ब्रेथलेसच या चित्रपटानिमित्त रसिकांना शुद्ध, कच्च्या, अराजक नवजातपणावर आश्चर्यचकित होण्याची एक संधी आहे. जीन–पॉल बेल्मोन्डो हा एक धडकी भरवणारा माणूस असून बोगार्ट याने पोलिसांना ठार मारले आहे; जीन सेबर्ग ही अमेरिकन गायक असून पत्रकार आणि उपन्यासकारही आहे. जी जीन–पॉल बेल्मोन्डो यासोबत प्रेमात आहे. पण ती खरोखरच प्रेमात आहे का हे पाहण्यासाठी तिच्या अपार्टमेंटमध्ये बेल्मोन्डो आणि सेबर्गची निरुपयोगी, सुस्त, कामुक संभाषण एक तेजस्वी रीफ आहे; प्रत्यक्षात संपूर्ण चित्रपट प्रेरणादायक आहे. तरुण आणि प्रेम हे कसे असते हे अगदी स्पष्टपणे दर्शविणारा हा चित्रपट आहे.

चित्रपटास रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्राचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य तसेच डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडूलकर, एमजीएम फिल्म आर्ट विभाग प्रमुख शिव कदम, सुबोध जाधव आदी उपस्थित होते.

### आदरणीय यशवंतराव चव्हाणसाहेब यांना आदरांजली

राज्याचे पहिले मुख्यमंत्री, आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने रविवार, दि. २५ नोव्हेंबर २०१८ रोजी मराठवाडा साहित्य परिषद येथील साहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मा. सुहास तेंडुलकर, मा. दामोदर जाधव, सुबोध जाधव, दीपक जाधव, विजय मगरे, राजेंद्र वाळके, प्रतिक राऊत आदींची उपस्थिती होती. उपस्थितांना मा. सुहास तेंडुलकर यांनी मार्गदर्शन केले.

मागील वर्षी आदरणीय चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून औरंगाबाद विभागीय केंद्र व मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सुरू केलेल्या रेखाचित्र प्रदर्शनास सर्वांनी भेट दिली व त्यांच्या कार्याला उजाळा दिला.

### सहावा औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

*देशविदेशातील चाळीसहून अधिक चित्रपटांचे प्रदर्शन,*

*गिरीश कासारवल्ली यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान*

*'न्यूड'ला गोल्डन कैलासा, तर 'सावित्री' सर्वोत्कृष्ट लघुपट*

जगभरातील व देशातील सर्वोत्कृष्ट चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवणास सहावा औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव बुधवार, दि. ९ ते रविवार, दि. १३ जानेवारी २०१९ या दरम्यान आयनॉक्स थिएटर, प्रोझोन मॉल, औरंगाबाद येथे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंतांच्या मांदियाळीत सिनेरसिकांच्या तुडूंब गर्दीत संपन्न झाला.

नाथ ग्रुप व महात्मा गांधी मिशन प्रस्तुत व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय औरंगाबाद केंद्र आयोजित औरंगाबाद इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न झाला असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला लाभले होते. तसेच राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, पुणे व स्वीडिश राजदूतावास यांनी महोत्सवात विशेष सहभाग नोंदविला.

पोस्टर प्रदर्शन (७ जानेवारी २०१९)

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, भारत सरकार, पुणे यांच्या सहकार्याने देश विदेशातील ख्यातनाम व्यक्तींच्या चित्रपटांवर आधारित पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन महोत्सवादरम्यान करण्यात आले होते. यामध्ये महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त तसेच ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, सुधीर फडके, जागतिक ख्यातीचे स्वीडिश दिग्दर्शक इगमान बर्गमन, हिंदी चित्रपट संगीत क्षेत्रातील महान कलावंत संगीतकार नौशाद, संगीतकार स्नेहल भाटकर, गीतकार कैफी आझमी, मझरूह सुल्तानपुरी, पार्श्वगायिका शमशाद बेगम या दिग्गज कलाकारांच्या जन्मशताब्दी निमित्त हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या व्यक्तींच्या मोजक्या चित्रपटांची पोस्टर या प्रदर्शनात मांडले होते.

उद्‍घाटन सोहळा व जीवनगौरव पुरस्कार प्रदान (९ जानेवारी २०१९)

सहाव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‍घाटन बुधवार, ९ जानेवारी २०१९ रोजी आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली, दिग्दर्शक एन. चंद्रा, निर्माते किरण शांताराम, दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, अभिनेत्री राजश्री देशपांडे, युरोपीय अभिनेत्री मारियान बोर्गो, लेखक दासू वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी भांडारकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महोत्सवाची टाळ्यांच्या गजरात सुरवात झाली. यावेळी भांडारकर म्हणाले की, देश-विदेशातील चाळीसहून अधिक चित्रपट या महोत्सवात दाखविण्यात येणार आहेत. ही चित्रपट रसिकांसाठी पर्वणीच होय. यातील काही भाषा रसिकांना समजणार नाहीत, पण चित्रावरून व त्यातील कलाकारांचे हावभाव यावरून त्या चित्रपटाचे कथानक लक्षात येते व त्यातील संदेश रसिकांच्या मनाला भिडतोच. मात्र आता बदलत्या तंत्रज्ञानानुसार चित्रपट क्षेत्राने बदलणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. महोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक करीत अशा आयोजनांच्या पाठीशी समाजाने उभे राहणे आवश्यक असल्याचे एन. चंद्रा यांनी नमूद केले. दिग्दर्शक आणि प्रेक्षक यांच्यातील अंतर कमी व्हावे, असे मत किरण शांताराम यांनी मांडले. मराठी चित्रपटांचा स्वतंत्र सशुल्क महोत्सव भरवावा, अशी सूचना चंद्रकांत कुलकर्णी यांनी केली. उद्‍घाटनानंतर कोल्ड वॉर (पोलंड) या चित्रपटाने महोत्सवाला सुरुवात झाली. शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर फुलणारी प्रेमकथा चित्रपटात प्रभावीपणे दाखविण्यात आली.

गिरीश कासारवल्ली यांना 'पद्मपाणी' जीवनगौरव पुरस्कार

चित्रपट महोत्सव उद्‍घाटन समारंभात प्रसिद्ध दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली यांना पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यास उत्तर देताना कासारवल्ली म्हणाले की, माझ्या चित्रपट कारकीर्दीच्या चाळीसाव्या वर्षात मिळालेल्या या पुरस्काराने इतर सर्व पुरस्कारांच्या तुलनेत अधिक आनंद झाला आहे. मानवी मनाच्या विकासात चित्रपट हे प्रभावी माध्यम आहे. मराठी चित्रपटाचे भवितव्य उज्ज्वल असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

चित्रपट सृष्टीतील दिग्गज आणि शहरातील जाणकार रसिकांच्या उपस्थितीत बुधवारी थाटात सुरू झालेल्या सहाव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा दुसरा दिवस दर्जेदार देशी चित्रपटांनी गाजला. त्याचबरोबर स्वीडिश आणि जपानी चित्रपटालाही प्रेक्षकांनी गर्दी केली.

गुरुवारी (दि. १० जानेवारी २०१९) महोत्सवात सकाळी सव्वादहापासून 'मंटो', हा नंदिता दास दिग्दर्शित हिंदी, 'घटश्राद्ध' हा गिरीश कासारवल्ली दिग्दर्शित कन्नड, 'आमृत्यू' हा अरूप मन्ना दिग्दर्शित आसामी, 'आम्ही दोघी' हा प्रतिमा जोशी दिग्दर्शित मराठी, 'अब्बू' हा अर्षद खान दिग्दर्शित कॅनडियन, तर 'वाईल्ड स्ट्रॉबेरी' हा इंगमार बर्गमन यांचा स्वीडिश सिनेमा दाखविण्यात आला. रात्री 'कोल्ड वार' या पोलिश सिनेमाचा रिपीट शो झाला. तसेच 'सिन्सीअरली युवर्स ढाका' ही अकरा दिग्दर्शकांच्या अकरा कथा असलेली बांगलादेशी फिल्म प्रदर्शित करण्यात आली.

लघुपटांना रसिकांची गर्दी

शॉर्ट फिल्म स्पर्धेतील विशेष ठरलेले नितीन गोजे दिग्दर्शित 'कविता', मदन काळे यांचा 'सावित्री', डॉ. गणेश शिंदे यांचा 'ओझ', क्षितीज जोशी यांचा 'मैं और मेरी कहानी', अविनाश भोसले यांचा 'झलक', रोहित काळे यांचा 'आविष्कारी', रामेश्वर झिंजुर्डे यांचा 'शेण', सुमित पाटील यांचा 'तरंग' आणि श्रीकांत जामुंडे यांचा 'जंटलमन' हे लघुपट सायंकाळी

दाखविण्यात आले.

महात्मा गांधींना अनोखी आदरांजली

महात्मा गांधींच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त त्यांना फिल्म फेस्टिव्हलमध्ये अनोखी आदरांजली अर्पण करण्यात आली. 'गांधी आणि सिनेमा' या विषयावर अमृत गांगर यांनी विशेष दृकश्राव्य व्याख्यानात उदयोन्मुख भारतीय चित्रपटसृष्टीवरील गांधींच्या स्वदेशी, साधेपणा आणि राष्ट्रीय विचारांचा प्रभाव सोदाहरण स्पष्ट केला. यासाठी 'राजा हरिश्चंद्र' या चित्रपटाचे उदाहरण दिले. 'गांधी', 'खिडकी' 'सत्याग्रह' मधील दृश्येही दाखवली.

तिसऱ्या दिवशी 'भोर', 'आरोन, 'न्यूड' आणि बरेच काही...(११ जानेवारी २०१९)

चीन, श्रीलंका, स्वीडन, अर्जेंटिना, जपान या देशांतील सरस चित्रपटांची मजा शहरातील चित्रपट रसिकांनी महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी शुक्रवारी दि. ११ जानेवारी २०१९ ला अनुभवली. दिवसभरातील दहाही शोज् प्रेक्षकांनी हाऊसफुल्ल केले. या महोत्सवात शुक्रवारी रवी जाधव दिग्दर्शित 'न्यूड' हा मराठी सिनेमा, 'ॲश इज प्युअरेस्ट व्हाईट' हा चायनीज सिनेमा, कामाख्या सिंग दिग्दर्शित 'भोर', 'आरोन' हा ओंकार शेट्टी दिग्दर्शित मराठी सिनेमा, 'अण्डरपॅट्स थीफ' हा श्रीलंकन सिनेमा, 'परसोना' हा इंगमार बर्गमन दिग्दर्शित 'द सेव्हन्थ सील' हा स्वीडिश सिनेमा, 'थिंकिंग ऑफ हिम' हा अर्जेटिना इंडिया सिनेमा, 'परसोना' हा इंगमार बर्गमन दिग्दर्शित स्वीडिश सिनेमा, द स्वीट रिक्वियन ही रितू सरीन व टेंगझीन सोनम दिग्दर्शित इंडो-यू.एस.ए. फिल्म, तर द बॅड पोएट्री टोकियो हा अंशुल चौहान दिग्दर्शित जपानी सिनेमा दाखविण्यात आला.

एमजीएम शॉर्ट फिल्म कॉम्पिटिशन शोमध्ये सदरा, राखोळी, वजू आणि द लास्ट मिस्टेक हे लघुपट दाखविले गेले. त्याचबरोबर आदित्य केळगावकरांच्या 'साऊंडप्रूफ' या लघुपटबरोबरच अनिलकुमार साळवे यांचा १५ ऑगस्ट हा लघुपट दाखवला गेला.

बहुभाषिक सिनेमाचा दिवस

चंदेरी दुनियेतील एकाहून एक सरस कलाकृतींचा आस्वाद आणि सिनेमातंत्राचा अभ्यास शहरातील चित्ररसिकांना करण्याची संधी शनिवार, दि. १२ जानेवारी २०१९ रोजी मिळाली. शनिवारी महोत्सवात अव्यक्तो हा अर्जुन दत्ता दिग्दर्शित बंगाली, लव्हलेस हा ॲण्ड्यू झ्वांगस्तेव दिग्दर्शित बहुभाषिक, पेटिंग लाईफ हा बिजुकुमार दामोदरन् दिग्दर्शित इंडो-यूएसए, बंदिशाळा हा मिलींद लेले दिग्दर्शित मराठी, सॅराबॅण्ड हा इंगमार बर्गमन दिग्दर्शित स्वीडिश, भुवन शोम हा मृणाल सेन दिग्दर्शित हिंदी, व्हॉट विल पीपल से हा इरमान हक दिग्दर्शित बहुभाषिक, तर गुड लक अल्जेरिया हा फ्रेंच-बेल्जीयम चित्रपट दाखविण्यात आला. ॲश इज प्युअरेस्ट व्हाईट या सिनेमाच्या रिपीट शोलाही प्रेक्षकांची चांगलीच गर्दी केली होती.

'विथ मोबाईल फोन : एव्हरीवन इज अ फिल्ममेकर' या विषयावर परिसवांद

'विथ मोबाईल फोन : एव्हरीवन इज अ फिल्ममेकर' या विषयावरील परिसंवादात अभिनेते संदीप कुलकर्णी, अमरजित आमले, दिग्दर्शक तेज देऊसकर, समीक्षक अमोल उदगीरकर व एमजीएम फिल्म आर्ट्सचे संचालक शिव कदम सहभागी झाले होते. महोत्सवाचे संचालक अशोक राणे यांनी सर्वांना बालेके केले.

मा. खा. सुप्रिया सुळे यांची महोत्सवाला सदिच्छा भेट.

मा. खा. सुप्रिया सुळे यांनी शनिवार, दि. १२ जानेवारी २०१९ रोजी दुपारी महोत्सवाला सदिच्छा भेट दिली. त्या म्हणाल्या, राजकारणात असलो, तरी सिनेमे बघणे आमच्यासाठी इतरांपेक्षा जास्त महत्त्वाचे असते. नेटफ्लिक्ससारख्या साधनांनी सिनेमा बघण्याचा अर्थच बदलून टाकला आहे. इथून पुढे सिनेमा आणि नेटफ्लिक्स यांच्यातील अंतर दूर करण्याचे आव्हान फिल्म फेस्टिव्हलच्या आयोजकांपुढे असणार आहे. माध्यमांमधले बदल सिनेमातही दिसतील. पुण्यापेक्षा मोठा प्रतिसाद या महोत्सवाला मिळालेला दिसत आहे, असे निरीक्षण त्यांनी नोंदविले.

समारोप व पुरस्कार वितरण सोहळा

शहरासह मराठवाड्यातील सिनेरसिकांच्या अपूर्व उत्साहात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या सहाव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा ता. १३ रोजी समारोप झाला. भारतीय चित्रपट प्रकारातील सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी एक लाख रुपयांचा गोल्डन कैलास पुरस्कार

'न्यूड'ला मिळाला. तर 'मंटो'ने तीन पुरस्कार पटकावले.

ज्यूरी कमिटीचे चेअरमन, प्रसिद्ध दिग्दर्शक एन. चंद्रा, मारियान बोर्गो, गीतकार दासू वैद्य, अभिनेते संदीप कुलकर्णी, दिग्दर्शक उमेश कुलकर्णी, तेजस देऊसकर, सिराज सय्यद, फैजल खान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, कोषाध्यक्ष सचिन मुळे, नाथ ग्रुपचे संतोष जोशी, विजय कान्हेकर, अहमद जलील, सिद्धार्थ मनोहर, आदींची मंचावर उपस्थिती होती. संयोजन समितीचे नीलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. औरंगाबादच्या रसिकांनी या महोत्सवाला दिलेला प्रतिसाद अद्भुत आहे. गेली चाळीस वर्ष मी सिनेचळवळीत काम करतो आहे; पण इथल्या लोकांची चांगल्या सिनेमाची तहान भागवता येणं माझ्यासाठी फार मोठी गोष्ट ठरली आहे. अगदी ऐंशीपार जोडप्यानेही दाखवलेली जिज्ञासा मला महत्त्वाची वाटली,' असे मनोगत अशोक राणे यांनी व्यक्त केले.

शॉर्ट फिल्म स्पर्धेचे प्री–ज्यूरी प्रो. एस.के. देशमुख, महेश देशमुख आणि पवन गंगावणे यांचा; तसेच प्रथमच लघुपट बनवणाऱ्या एमजीएम फिल्म आर्टच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. २५ हजार रुपयांचा 'सिल्व्हर कैलास' पुरस्कार 'सावित्री' या लघुपटासाठी मदन काळे यास देण्यात आला.

मास्टर क्लासद्वारे उमेश कुलकर्णी यांचे मार्गदर्शन

इंग्रजांनी लावून दिलेल्या शिक्षण पद्धतीमळे नवीन काही शेधण्याचा विश्वास आपण गमावून बसलो आहोत. लोक काय म्हणतील, हा प्रश्न कलाकाराने सोडून दिला पाहिजे. दडपणातून मुक्त व्हा. कलेचा एकच मार्ग नाही. सर्व कला आतून परस्परांशी जोडलेल्या आहेत. फक्त प्रकाश, रेषा, पोत या अंगाने आपली स्पेस शोधता आली पाहिजे, असा सल्ला उमेश कुलकर्णी यांनी मास्टर क्लासमध्ये दिला. कुठलाही कलाकार हा एक तत्त्वज्ञ असतो. सैद्धांतिक मांडणी करतानाच काही सिद्धांत तो शोधतही असतो. कथा मांडणे हा सिनेमाचा मूळ उद्देश नाही. ते आवरण आहे. त्याच्या आत दडलेले सूत्र ओळखणे आणि ते काय पद्धतीने मांडता येईल याचा विचार करणे, शक्यतांचा नवनवीन पद्धतीने शोध घेणे म्हणजे सिनेमा बनवणे, असे त्यांनी सांगितले. या मास्टर क्लासमध्ये त्यांची 'गिरणी' ही शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली.

### सर्वोत्कृष्ट पुरस्कार

| | | |
|---|---|---|
| संगीत | : | स्नेहा खानविलकर, झाकीर हुसेन (मंटो) |
| ध्वनी | : | अनमोल भावे (न्यूड) |
| संकलन | : | सुजय दत्ता रे (अव्यक्त) |
| छाया | : | अमलेन्दू चौधरी (न्यूड) |
| पटकथा | : | बिजुकुमार दामोदरन् (पेंटिंग लाइफ) |
| अभिनेता | : | नवाजुद्दीन सिद्दिकी (मंटो) |
| अभिनेत्री | : | कल्याणी मुळे (न्यूड) |
| दिग्दर्शक | : | नंदिता दास (मंटो) |
| उल्लेखनीय | : | आम्ही दोघी (प्रतिमा जोशी) |
| प्रेक्षक पसंती | : | द स्वीट रिक्वियम (रितू सरीन) |

# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

**यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी :**

विभागीय केंद्र, लातूरच्या वतीने संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने, दि. २५ नोव्हेंबर २०१८ रोजी 'यशवंतराव चव्हाण यांचे शेतीविषयक धोरण व आजचे शेतीचे प्रश्न' या विषयावर लातूर येथील मानस फंक्शन हॉल, बार्शी रोड, लातूर येथे जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे हे होते आणि प्रमुख वक्ते म्हणून वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरु मा. डॉ. अशोक ढवण हे होते.

याप्रसंगी डॉ. ढवण म्हणाले की, शेतीला चांगले दिवस यावेत म्हणून यशवंतरावांनी शेती क्षेत्रात आमूलाग्र बदल केले. नवनवीन कायदे आणले. सहकाराचे जाळे विणून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. सध्या बदलत्या काळानुसार, बदलत्या हवामानानुसार शेतीसमोर वेगवेगळे प्रश्न आपल्याला दिसत असले तरी त्याला यशवंतरावांच्या शेतीविषयक धोरणातून उत्तरे शोधता येतात. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वाघमारे म्हणाले की, महाराष्ट्राला योग्य दिशा देण्याचे काम यशवंतरावांनी केले. त्यांचा शेतीविषयक सखोल अभ्यास होता. त्यामुळेच त्यांनी भक्कम धोरण आखले. मंचावर यावेळी ॲड. मनोहरराव गोमारे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नागोराव कुंभार यांनी केले; तर सूत्रसंचालन प्रा. श्याम आगळे यांनी केले.

**महात्मा फुले पुण्यतिथी :**

महात्मा जोतिराव फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून विभागीय केंद्राच्या वतीने दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव डॉ. नागोराव कुंभार, खजिनदार सौताडेकर, सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे, तसेच पुरोगामी चळवळीतील प्रतिष्ठानशी संलग्न असलेले अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी डॉ. कुंभार यांनी महात्मा फुले यांच्या जीवनचरित्रावर आपल्या प्रास्ताविकातून प्रकाश टाकला. खजिनदार विवेक सौताडेकर यांनी आभार मानले.

**अवयवदान व देहदान जनजागृती पदयात्रा :**

अवयवदान व देहदान यासंबंधी जनजागृती व्हावी, या उद्देशाने आणि नागरिकांच्या मनातील गैरसमज दूर व्हावेत यासाठी मुंबई येथील 'द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन' या संस्थेचे पुरुषोत्तम पवार यांच्या पुढाकारातून लातूर येथील मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालय ते राजर्षी शाहू महाविद्यालय या दरम्यान दि. १९ डिसेंबर २०१८ रोजी 'अवयवदान व देहदान जनजागृती पदयात्रा' व राजर्षी शाहू महाविद्यालय येथे व्याख्यानाचे आयोजन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र लातूर, राष्ट्रीय अंधत्व निवारण संस्था (नॅब) आदींच्या वतीने करण्यात आले होते. रॅली व व्याख्यानास उत्तम प्रतिसाद मिळाला असून याप्रसंगी नॅबचे विजयकुमार राठी, विभागीय केंद्राचे खजिनदार विवेक सौताडेकर, डॉ. जयंत पाटील आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती :**

विभागीय केंद्राच्या वतीने दि. १२ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्ताने प्रतिष्ठानच्या कार्यालयात जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव डॉ. नागोराव कुंभार, खजिनदार विवेक सौताडेकर, प्रा. श्याम आगळे, ॲड. मनोहरराव गोमारे, अरविंद कांबळे, विक्रम कदम आदी उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, रत्नागिरी

## कार्यवृत्त

### शिक्षक दिन – दिनांक ५ सप्टेंबर २०१८

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व माध्यमिक महिला विद्यालय पाग–चिपळूण यांचे संयुक्त विद्यमाने 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. यावेळी एस.पी.एम. कॉलेज चिपळूणच्या प्राचार्या सौ. बक्षी मॅडम व त्यांचे सहकारी तसेच महिला विद्यालय पाग–चिपळूणच्या मुख्याध्यापिका सौ. प्रिया शशिकांत नलावडे, न्यू इंग्लिश स्कूल पाग–चिपळूणचे मुख्याध्यापक श्री. शैलेश सुर्वे व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### रक्तगट तपासणी शिबिर – ५ जानेवारी २०१९

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व सह्याद्रि शिक्षण संस्था सावर्डे यांचेतर्फे अडरे हायस्कूल चिपळूण येथे रक्तगट तपासणी शिबिर पार पडले. त्यावेळी डॉ. गावडे, प्रा. माया देसाई व प्राध्यापक वाघचौरे सर उपस्थित होते. एकूण १९४ विद्यार्थी व विद्यार्थिनींचे रक्तगट तपासणी करून रक्तगट नमूद केलेले कार्ड त्यांना देण्यात आले.

### आरोग्य शिबिर – दि. १० फेब्रुवारी २०१९

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे यांचेतर्फे कादवड, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे आरोग्य शिबिरात महिला व मुलींना आरोग्य व आहाराबाबत प्रा. माया देसाई व प्राध्यापक वाघचौरे सर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी चिपळूण पंचायत समितीच्या सभापती सौ. पुजा निकम मॅडम, कादवड गावचे सरपंच, पोलीसपाटील, ग्रामस्थ तसेच महिला वर्ग उपस्थित होता.



राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचे समवेत...

# विभागीय केंद्र, अहमदनगर

## कार्यवृत्त

**शेतीकट्टा :**

**विषय** : कांदा उत्पादन तंत्रज्ञान

**ठिकाण** : सावरगांव, ता. जामखेड, जि. अहमदनगर

**वार व दिनांक** : दि. ०९.१०.२०१८ वार – मंगळवार

**प्रमुख व्याख्याते** : १. प्रा. एम. एच. गावडे (सहाय्यक प्राध्यापक, उद्यान विद्या विभाग, म. फु. कृ. वि. राहुरी)

**सहभागी शेतकरी वर्ग** : ५३

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ''कांदा उत्पादन तंत्रज्ञान'' या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन सावरगांव ता. जामखेड येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तंज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. एम. एच. गावडे सहाय्यक प्राध्यापक, उद्यान विद्या विभाग म. फु. कृ. वि., राहुरी हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी कांदा लागवड संबंधी खरीप व रब्बी हंगामातील अधिक उत्पादन देणारे वाण, गादी वाफा तयार करतांना घ्यावयाची काळजी, जैविक खते व त्यांचे प्रमाण, सरी वरंबा पद्धतीने लागवड करण्याचे फायदे, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण, हिरवळीच्या खताचे महत्त्व, कीड व रोग व्यवस्थापन, पिकाची काढणी व साठवण करतांना काय काळजी घ्यावी इ. विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सावरगांव गावचे सरपंच श्री. काकासाहेब चव्हाण उपस्थित होते. तसेच श्री. व्ही. एस. साळवे, कृषि सहाय्यक, प्रा. योगेश जाधव कृषि महा. सोनई, व परिसरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य, डॉ. हरी मोरे प्राचार्य कृषि महाविद्यालय सोनई, श्री. काकासाहेब चव्हाण, श्री. शेषराव चव्हाण, श्री. व्ही. एस. साळवे कृषि सहाय्यक व सावरगाव ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. योगेश जाधव यांनी तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र लिपणे यांनी केले.

**शेतीकट्टा :**

**विषय** : ऊस उत्पादन तंत्रज्ञान

**ठिकाण** : भामाठाण, ता. श्रीरामपूर

**वार व दिनांक :** मंगळवार, दि. २७ नोव्हेंबर २०१८

**प्रमुख व्याख्याते** : श्री. नारायण निबे, विषय विशेषज्ञ, कृषि विद्या विभाग कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणे

**सहभागी शेतकरी वर्ग** : ४४

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ऊस उत्पादन तंत्रज्ञान या शेती कट्ट्याचे आयोजन भामाठाण ता. श्रीरामपूर येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. नारायण निबे, विष. विशेषज्ञ, कृषि विद्या विभाग कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणे हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी ऊस उत्पादनासाठी योग्य वाणाची निवड, हंगामाची निवड, खते व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, काढणीची वेळ तसेच कमी खर्चात अधिक उत्पादन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. सुनिल बनसोडे, श्री. दत्तात्रय गोरे, श्री. संभाजी बनसोडे, प्रा. योगेश जाधव, प्रा. राजेंद्र लिपणे व भामाठाण, ता. श्रीरामपूर परिसरातील प्रगतशील ऊस बागायतदार शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगर येथील सर्व सन्माननीय सदस्य श्री. तुकाराम भवार, श्री. सुनिल बनसोडे व भामाठाण ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

**शेतीकट्टा**

**विषय** : एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन.

**ठिकाण** : मु. पो. बाभूळगाव, ता. राहुरी

**वार व दिनांक :** सोमवार, दि. १७ डिसेंबर २०१८

**प्रमुख व्याख्याते** : डॉ. सारीका वांद्रे, साहाय्यक प्रा.कृ.मा. वि.सोनई

प्रा. योगेश जाधव, साहाय्यक प्रा.कृ.मा.वि.सोनई

**सहभागी शेतकरी वर्ग** : ४१

एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयाचा शेतीकट्टा डॉ. सारीका वांद्रे व प्रा. योगेश जाधव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मु. पो. बाभूळगाव, ता. राहूरी येथे संपन्न झाला. या शेतीकटट्यामध्ये एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या साहाय्याने पीक उत्पादनात कशा प्रकारे भरघोस वाढ होऊ शकते, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन म्हणजे काय, त्याचे जमिनीवर होणारे फायदेशीर परिणाम, त्यासाठी लागणाऱ्या विविध निवष्टा, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करताना घ्यावयाची काळजी इत्यादींसह अनेक बाबींवर तज्ञांनी सखोल चर्चा करून मार्गदर्शन केले, व उपस्थितांना आपल्या जमिनीमध्ये एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी शारदा थोरात (सरपंच बाभूळगाव), श्री. मंजाबापू वाघमारे, श्री. जीजाराम पाटोळे, श्री. विठ्ठल ढवण, आदींसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य, शारदा थोरात (सरपंच बाभूळगाव) व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

### शेतीकट्टा

**विषय** : डाळींब उत्पादन तंत्रज्ञान

**ठिकाण :** मु. पो. औरंगपूर, ता. पाथर्डी

**वार व दिनांक :** मंगळवार, दि. १५ जानेवारी २०१९

**प्रमुख व्याख्याते** : डॉ. अनिल दुरगूडे, मृदा व रसायनशास्त्र विभाग म.फु.कृ.वि. राहुरी

**सहभागी शेतकरी वर्ग** : ४२

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत डाळींब उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन मु.पो. औरंगपूर, ता. पाथर्डी येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तंज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. अनिल दुरगूडे, मृदा व रसायनशास्त्र विभाग म.फु.कृ.वि. राहुरी हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी डाळींब फळाचे महत्त्व, रोपांची निवड, पाणी व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण, फळांची प्रतवारी, विक्री व बहार व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. शिवाजी पाटील काकडे, श्री. संपतराव शेळके, श्री. भाऊसाहेब जावळे, डॉ. हरी मोरे, प्राचार्य कृषी महाविद्यालय सोनई, प्रा. योगेश जाधव, प्रा. राजेंद्र लिपणे व औरंगपूर, ता. पाथर्डी परिसरातील प्रगतशील डाळींब उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य श्री. शिवाजी पाटील काकडे, श्री. संपतराव शेळके व औरंगपूर ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

### शेतीकट्टा

**विषय : कृषी शिक्षण – व्यवसाय व संधी**

**ठिकाण** : कृषी महाविद्यालय सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**वार व दिनांक :** शुक्रवार, दि. ०८ फेब्रुवारी २०१९

**प्रमुख व्याख्याते** : मा. अनुराधाताई नागवडे, सभापती महिला व बालकल्याण समिती जि.प. अहमदनगर

मा. मनोहर भोळे, संचालक युनिक ॲकॅडमी पुणे

**सहभागी शेतकरी वर्ग** : ५३

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ''कृषी शिक्षण – व्यवसाय व संधी'' या विषयावर शेती कट्ट्याचे आयोजन कृषी महाविद्यालय सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मा. अनुराधाताई नागवडे, सभापती महिला व बालकल्याण समिती जि. प. अहमदनगर, मा. मनोहर भोळे, संचालक युनिक ॲकॅडमी पुणे हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उपस्थित विद्यार्थी व प्रगतशील शेतकऱ्यांना कृषी शिक्षणाचे महत्त्व, कृषी शिक्षणाची व्याप्ती, महाराष्ट्रासह देशातील कृषी शिक्षणाचा लोखाजोखा तसेच कृषी शिक्षण घेतल्यानंतर व्यावसायिक दृष्ट्या उपलब्ध होणाऱ्या संधीविषयी सखोल मार्गदर्शन केले. मा. सुनिताताई गडाख माजी पंचायत समिती सदस्य नेवासा तालुका कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर उपस्थित

होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात पंचायत समिती अंतर्गत शेतकऱ्यांसाठी शासन राबवत असलेल्या विविध शासकीय योजना व त्यांची अंमलबजावणी, योजनेविषयी माहिती मिळवण्याची विविध माध्यमे तसेच कृषी क्षेत्रात महिलांचा उल्लेखनीय सहभाग इत्यादीबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरी मोरे, प्राचार्य कृषी महाविद्यालय सोनई, व सूत्रसंचालन प्रा. योगेश जाधव यांनी केले.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य, डॉ. हरी मोरे, प्राचार्य कृषि महाविद्यालय, सोनई, तसेच मुळा एज्युकेशन सोसायटीचे सचिव, सहसचिव, सदस्य आणि कृषी महाविद्यालय सोनई येथील प्राध्यापक व कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.



मराठी नाट्यपरिषद, ४७ वे अधिवेशन, नांदेड ३१-१-६५, सोबत पु.ल.देशपांडे

# विभागीय केंद्र, सोलापूर

## कार्यवृत्त

**यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार डॉ. शिवाजीराव देशमुख यांना प्रदान**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र सोलापूर च्या वतीने दिला जाणारा पहिला यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांच्या शुभहस्ते प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांना २४ नोव्हेंबर २०१८ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या डॉ. वा. का. किर्लोस्कर सभागृहात प्रदान करण्यात आला. रोख रु. १५,०००/-, मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. गो. मा. पवार होते.

देशमुख यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या साहित्यावर संशोधन केल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना पीएचडी ही पदवी बहाल केली आहे. चव्हाण साहेबांच्या साहित्यावर पीएचडी करणारे देशमुख हे पहिले पीएचडीधारक आहेत. तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यावर त्यांचे ३ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांनी महाराष्ट्रात ३०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या एकूण साहित्य सेवेबद्दल त्यांना यंदाचा यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार देण्यात येत असल्याचे मा. दत्ता गायकवाड यांनी सांगितले.

महाराष्ट्र निर्मितीचा पाया आणि यशवंतराव चव्हाण या विषयावर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी सदर कार्यक्रमात सखोल माहिती आपल्या व्याख्यानातून देताना यशवंतराव चव्हाण यांचे द्विभाषिक राज्य असताना स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उचललेले अनेक विषय या प्रसंगी सांगितले. त्याचबरोबर महाराष्ट्राची निर्मिती करताना विदर्भाला नव्या राज्यात सामील करून घेण्याचा विशाल दृष्टिकोन देखील यावेळी विषद केला. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मन वळवण्याचे कौशल्य देखील फक्त यशवंतराव चव्हाण यांच्यामध्येच होते म्हणून महाराष्ट्राची निर्मिती झाली. हे फक्त यशवंतराव चव्हाण यांच्यामुळेच शक्य झाल्यामुळे तेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत.

मुख्यमंत्री म्हणून काम करताना प्रादेशिक समतोल ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न यशवंतराव चव्हाण यांनी केला. साहित्य संस्कृती याचा देखील पाया यशवंतराव चव्हाण यांनीच रचला असून त्यांच्या साहित्यावर संशोधन करण्याऱ्या डॉ. शिवाजीराव देशमुख यांना त्यांच्याच नावे असलेला पुरस्कार दिला जाणे हा देखील यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्याचा गौरव आहे. त्यामुळे डॉ. शिवाजीराव देशमुख यांचे ही अभिनंदन; असे गौरवोद्गार अशोक चौसाळकर यांनी या प्रसंगी काढले. विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष राजशेखर शिवदारे, सदस्य युन्नुसभाई शेख, दत्ता गायकवाड, राहुल शहा, दीपक साळुंखे आणि प्रकाश येलगुलवार यांच्यासह साहित्य कला सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मंडळी या समारंभात उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, अंबाजोगाई

## कार्यवृत्त

### यशवंतराव चव्हाण विभागीय वक्तृत्व स्पर्धा

''बोलता आलं म्हणजे भावना आणि विचार व्यक्त करता येतात. मत मांडता येतं. आपली भूमिका ठणकावून मांडता येते. 'बोलणाऱ्यांच्या आंबाड्या विकतात पोरंहो!' '' असे प्रतिपादन अंबानगरीचे ज्येष्ठ नेते मा. दत्तात्रय (आबा) पाटील यांनी केले. ते स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून दत्तात्रय पाटील होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे होत्या. विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून केज विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, सहसंयोजक डॉ. नरेंद्र काळे, परीक्षक प्रा. डॉ. अशोक नारनवरे, (औराद शहाजनी), प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड (परळी) श्री. हनुमंत घाडगे (केज) आणि संयोजन समिती अध्यक्ष प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे होते.

स्पर्धेची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंदांच्या आणि यशवंतरावजींच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून झाली.

स्पर्धेचे प्रास्ताविक डॉ. नरेंद्र काळे यांनी केले. वक्तृत्वाचं कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करायला हवं आणि अशा स्पर्धांमधे सहभागी होऊन ते सहज साध्य करता येतं.

प्रमुख पाहुणे म्हणून मा. पृथ्वीराज साठे यांनी नेतृत्वाला वक्तृत्वाची झालर असायला हवी, असे सांगून उत्तम संवादाच्याच बळावर उत्तम जनसंपर्क ठेवता येऊ शकतो असे सांगून विद्यार्थ्यांनी हे वक्तृत्व कौशल्य आत्मसात करायला हवं अशी भूमिका घेतली.

उद्‌घाटन समारंभाचा समारोप करताना प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे यांनी नियमित अभ्यास, अभ्यासपूरक आणि अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी हिरिरीने सहभाग घेऊन स्वतःच्या विकासाकडं जायला हवं असं सांगून यशवंतरावजींनी कसं आपलं आयुष्य घडवलं याची झलक विद्यार्थ्यांना सांगितली.

कार्यक्रमाच्या सूत्रसंवादाचा भार प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी उचलला तर आभाराचा भार प्रा. डॉ. दिलीप भिसे यांनी उचलला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा संयोजन समिती गठीत करण्यात आली होती, ज्यात प्रा. डॉ. दिलीप भिसे, प्रा. डॉ. रमेश शिंदे, प्रा. डॉ. अहिल्या बरुरे, प्रा. डॉ. विठ्ठल केदारी, प्रा. चांदणे आणि प्रा. केशव हमडीबाग हे होते. याशिवाय स्पर्धा सुरळीत पार पाडाव्यात यासाठी इतर चौदा समित्यांचे प्रमुख व सहकारी यांनी कल्पक रित्या आपली भूमिका बजावली ज्यात उपप्राचार्य प्रा. के. डी. गाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ. डी. डी. तांदळे, उपप्राचार्य प्रा. भगवानराव शिंदे, डॉ. तांदुळजेकर, डॉ. रमेश शिंदे, डॉ. अहिल्या बरुरे, प्रा. केशव हंडीबाग, डॉ. अरविंद घोडके, प्रा. सुजाता पाटील. प्रा. स्वप्निल राजपंखे, अधीक्षक श्री. लक्ष्मण वाघमारे, श्री. कापसे, श्री. शेख अली आणि सर्व सदस्यांनी चोख भूमिका बजावली.

### स्पर्धेचा एकूण निकाल

| स्पर्धक क्रमांक | परीक्षक-१ | परीक्षक-२ | परीक्षक-३ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ६ | १३ | ३१ | २८ | ७२ |
| ८ | १६ | ३३ | २९ | ७८ |
| १६ | -- | २५ | ०४ | २९ |
| ०४ | १६ | २८ | १६ | ६० |
| १२ | २४ | ३० | ३० | ८४ |
| ०१ | १८ | २८ | २० | ७८ |
| १७ | २८ | ३८ | ३४ | १०० |
| १० | १७ | २० | २० | ६७ |
| १४ | -- | २२ | ०२ | २४ |
| ०५ | -- | २९ | २२ | ५१ |
| १३ | २३ | ३३ | ३३ | ८९ |
| १८ | २० | ३४ | ३२ | ८६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | २३ | ३७ | ३० | ९० |
| ११ | २४ | ४० | १७ | ८१ |
| ०२ | -- | २८ | १७ | ४५ |
| ०९ | २४ | ३० | २५ | ७९ |
| १९ | २१ | ३१ | १८ | ७० |
| १५ | १३ | २६ | १४ | ५३ |
| ०७ | -- | २८ | ११ | ३९ |

## स्पर्धेचा अंतिम निकाल

| अ. क्र. | स्पर्धकांचे नाव | महाविद्यालयाचे नाव | क्रमांक व पारितोषिकाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | श्री. जाधव रामहारी कल्याण | लोकमान्य टिळक महा. वडवणी, जि. बीड ९८९०३९८९९८ | उत्तेजनार्थ पारितोषिक क्रं.१ (प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम १,१००) |
| २. | तोडकर वैशाली वामनराव | योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई ८९७५४५८९४२ | उत्तेजनार्थ पारितोषिक क्र.-२ (प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम १,१००) |
| ३. | कदम किरण संभाजी | योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई ८९७५४५८९४२ | तृतीय पारितोषिक (प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम ५,०००) |
| ४. | पवार स्वराज भारत | श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी ८६६८९६५७९५ | द्वितीय पारितोषिक (प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम ७,०००) |
| ५. | रिडलॉन भरत अर्जुनसिंग | जयप्रकाश नारायण कॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद ७९७२४१९६५६ | प्रथम पारितोषिक (प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम ११,०००) |

## स्पर्धक नोंदणी

| अ. क्र. | स्पर्धकाचे नाव, महाविद्यालयाचे नाव व संपर्क मोबाईल नंबर | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १. | चव्हाण प्रशांत सुभाष<br>शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ एज्युकेशन मुर्शदपूर ता. आष्टी जि. बीड.<br>मो.नं. ९०११८३५११७ | |
| २. | पंडगे दत्तात्रय माधव<br>श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय, ला-तूर, जि. लातूर मो.नं. ९७६३२५५८५६ | |
| ३. | पवार स्वराज भारत<br>श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी<br>मो.नं. ८६६८९६५७९५ | |
| ४. | वायदंडे धनराज संजय<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई<br>मो.नं. ७६२०९४४०४२ | |
| ५. | नवले कुलदिप बंडू<br>जनविकास महाविद्यालय, बनसारोळा, ता. केज. जि. बीड मो.नं. ९९७०३७३७५२ | |
| ६. | जोगदंड अमरदिप सिद्धार्थ<br>जनविकास महाविद्यालय, बनसारोळा, ता. केज, जि. बीड मो.नं. ८२०८४९४१८८ | |
| ७. | दोडके सुशीलकुमार रामराव<br>श्री पंडीतगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा, ता. परळी वै. जि. बीड मो.नं. ८७८८४९२९९८ | |
| ८. | तेलंग प्रथमेश परमेश्वर<br>यशवंत महाविद्यालय, नांदेड ता. जि. नांदेड.<br>मो.नं. ७०३०३८३०२८ | |
| ९. | गायकवाड प्रियंका गणेश<br>यशवंत महाविद्यालय, नांदेड, ता. जि. नांदेड,<br>मो.नं. ९०११५९३१०८ | |
| १०. | जाधव मयुरी भानुदास<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई<br>मो.नं. ८६०५८७९२०९ | |
| ११. | प्रियंका ज्ञानोबा बोबडे<br>ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महा., परभणी मो.नं. ९९७०७४६५१६ | |
| १२. | तोडकर वैशाली वामनराव<br>योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई<br>मो.नं. ८९७५४५८९४२ | |

| | | |
|---|---|---|
| १३. | कदम किरण संभाजी<br>योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई<br>मो.नं. ८९७५४५८९४२ | |
| १४. | घुगे दत्ता बाबाहरी<br>खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई<br>मो. ७०८७४४०६५० | |
| १५. | केळे कार्तिककुमार पांडुरंग<br>ब्रिलीयंट महाविद्यालय, (सायंकाळचे), लातूर<br>मो.नं. ७७९६१०२८०७ | |
| १६. | सय्यद असलम अब्दुल<br>ब्रिलीयंट महाविद्यालय (सायंकाळचे), लातूर<br>मो.नं. ९३७०६२४३२० | |
| १७. | रिडलॉन भरत अर्जुनसिंग<br>जयप्रकाश नारायण कॉलेज ऑफ एज्युकेशन,<br>औरंगाबाद मो.नं. ७९७२४१९६५६ | |
| १८. | जाधव रामहरी कल्याण<br>लोकमान्य टिळक महाविद्यालय, वडवणी, ता.<br>वडवणी जि. बीड. मो.नं. ९८९०३९८९९८ | |
| १९. | देशमुख केतन केदारनाथ<br>श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित<br>आयटिम कॉलेज, नांदेड मो.नं. ७७२०९९००५२ | |

**शेतीक्षेत्रातील सुधारणा आणि अर्थव्यवस्थेच्या वा अन्य क्षेत्रातील सुधारणा वेगवेगळ्या नसतात. त्यांचा परस्परांशी संबंध असतोच. शेतीमधली प्रगती जशी अर्थव्यवस्थेतील प्रगतीची निदर्शक असते तशीच आपल्या राजकीय भविष्याचे सूचन करणारीही असते. त्यामुळे शेतीक्षेत्रातील प्रगतीकडे आपण काळजीपूर्वक लक्ष द्यायला हवं. हरितक्रांतीच्या सातत्यपूर्ण हमीसाठी आपल्याला तंत्रशास्त्र, सार्वजनिक धोरण आणि टिकाऊ शेती यांची सांगड घालावी लागेल. या तीनही घटकांचा संतुलित संयोग घडवून आणला तरच एकविसाव्या शतकातील 'कृषी अधिसत्ता' म्हणून भारत पुढे येऊ शकेल.**

**- मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, ठाणे

## कार्यवृत्त

दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त ठाणे केंद्रातर्फे ठाण्याच्या बा.ना. बांदोडकर महाविद्यालयात यशवंत व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ वाजता प्रमुख वक्ते ज्येष्ठ पत्रकार श्री. राजू परुळेकर, ठाणे जिल्हा केंद्र अध्यक्ष श्री. मुरलीधर नाले तसेच इतर सदस्यांनी चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. श्री. राजू परुळेकर यांनी आपल्या 'सत्याविरुद्धचे प्रचारयुग' या विषयावर बोलताना सांगितले की, सत्य हे शांत असते. परंतु असत्याचा प्रचार मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे सत्याचा विसर पडतो. दहा वेळा एखादी गोष्ट सांगितल्यावर ती खरीच असेल असा समज होतो. पूर्वी वर्तमानपत्र हे प्रमाण मानले जाई. त्यामुळे तेच खरे आहे असा समाजात समज होई. तसा माणूस हा असत्यप्रवण असून आपण सर्वचजण असत्याशी जास्त जवळचे असतो. आपल्यातील दुर्गुण म्हणजे असत्य. सध्या इलेक्ट्रॉनिक युग असल्यामुळे सततच्या बातम्या या खऱ्या वाटू लागतात. एखादी व्यक्ती चांगली आहे किंवा तिचे कार्य महान आहे, यापेक्षा अमुक एका व्यक्तीच्या बाहेर भानगडी आहेत हे कळल्यास त्याच्या कार्यापेक्षा त्याच्या भानगडींचा प्रचार अधिक होतो. अशा वेळी त्या गोष्टींची शहानिशा न करता लोक त्याच्याकडे दोषी म्हणून पाहू लागतात. सत्याचा प्रचार करतो म्हणणारेदेखील खरेतर असत्याचाच प्रचार करत असतात. त्यामुळे खरे सत्य हे अंधारातच दडून राहते. असे सांगून श्री. परुळेकर यांनी आपल्या व्याख्यानाची सांगता केली. सदर व्याख्यानाचा लाभ घेण्यासाठी ११० महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १ डिसेंबर २०१८ रोजी ठाणे जिल्हा केंद्र व मुख्य शाखा याच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट रसग्रहण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक श्री. समर नखाते यांना पाचारण करण्यात आले होते. कार्यक्रमाची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत होती. नखाते यांनी चित्रपट निर्मितीच्या विविध अंगांबद्दल तपशीलवार चर्चा केली. चित्रपट निर्मितीमधील कथा, संगीत, गाणी, बॅकग्राऊंड म्युझिक, कपड्यांची रंगसंगती, शूटिंगची ठिकाणं याविषयी साद्यंत माहिती देताना त्यातील बारकावे समजावून सांगितले. तसेच रंगसंगती, संगीत यांचा संबंध त्यांनी शॉर्ट फिल्मद्वारे दाखवून दिला. मनातील भावना व रंगसंगती तसेच त्यानुसार बदलत जाणारे संगीत हे कसे एकमेकांना पूरक असते, ही गोष्ट प्रत्यक्ष फिल्ममधील काही शॉट दाखवून त्यांनी उलगडून दाखविले. पटकथाकाराला अभिप्रेत असलेले भाव प्रत्यक्ष चित्रीकरणात उमटतात किंवा नाही व त्याचा योग्य परिणाम साधला जातो किंवा नाही हे प्रामुख्याने चित्रपटाच्या एडिटिंगवर कसे अवलंबून असते हे त्यांनी सोदाहरण दाखवले. यामध्ये शूटिंग हे कितीतरी पटीने जास्त झालेले असते पण नंतर योग्य तो परिणाम साधण्यासाठी त्याचे एडिटिंग केले जाते. अशा रितीने सिनेमातील खाचाखोचा विस्ताराने नमूद करून सिनेमा कसा बघावा याचे मर्म श्री नखाते यांनी उलगडून दाखवले. यावेळी त्यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. सदर शिबिराचा ९० लोकांनी लाभ घेतला.

दिनांक १५ जानेवारी २०१९ रोजी ठाणे जिल्हा केंद्र व रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ठीक ५ वाजता सहयोग मंदिर हॉल येथे 'विचारकुंकू' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून ठाणे महानगर पालिकेच्या महापौर मीनाक्षीताई शिंदे तर प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ सिनेतारका सौ. अलका कुबल उपस्थित होत्या. कार्यक्रमात हिंदी साहित्यिक श्रीमती सुलभा कोरे, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या सौ. वृषाली मगदूम, पत्रकार सौ. अनुपमा गुंडे, घरकाम करणाऱ्या श्रीमती शोभाताई बांदेकर आणि सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या सौ. शिल्पा शिनगारे यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ सिनेअभिनेत्री सौ. अलका कुबल यांची मुलाखत सिनेपत्रकार श्री. दिलीप ठाकूर यांनी घेतली. गेल्या ३५ वर्षात आलेले विविध अनुभव

अलका कुबल यांनी उपस्थितांसमोर विशद केले. आताची चित्रपटसृष्टी आणि पूर्वीची चित्रपटसृष्टी यातील तफावत सांगत असताना माहेरच्या साडीने दिलेले यश कसं मिळालं याबद्दलचे किस्सेही सांगितले. माहेरच्या आणि सासरच्या मंडळींनी साथ दिली, म्हणून येथपर्यंत पोहचल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. अभिनेत्री असूनही परिवाराकडे कधीच दुर्लक्ष झालं नाही व मुलींनाही कसं उच्च शिक्षित केलं हेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी महापौरांनीही आपले प्रशासकीय अनुभव सांगून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

दिनांक २९ जानेवारी २०१९ रोजी ठाणे जिल्हा केंद्र व संजीवनी आदिवासी ग्रुप डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने 'अनाथ मूल दत्तक योजना' अंतर्गत कातकरी पाडा, कोरप्याची वाडी, विकासवाडी, हाऱ्याची वाडी, खोड्याचा पाडा, बंधनवाडी तसेच सावरेवाडी येथील आदिवासी अनाथ मुलांसाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी तेथील अनाथ मुलांना सोलापूरी चादर, सतरंजी, खेळणी, कपडे तसेच किराणा माल (तांदूळ, डाळ, शेंगदाणे, गूळ, खोबरं, रवा, साबण, टूथपेस्ट, ब्रश, खोबरेल तेल, इत्यादी) यासारख्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या गरजेच्या वस्तूंचे (वेगवेगळ्या दात्यांकडून जमा करण्यात आलेल्या) वाटप करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा केंद्र कार्यकारिणी सदस्य डॉ. अरुण पाटील यांचा मोलाचा सहभाग होता. डॉ. पाटील यांनी वेगवेगळ्या दात्यांकडून सर्व वस्तूंची जमवाजमव केल्यामुळेच हा कार्यक्रम नियोजनबद्ध व यशस्वी झाला.

स्त्रीमध्ये सुद्धा कर्तृत्व असतं. पण, आपल्या समाजात महिलांच्या कर्तृत्वाला संधी दिली जात नाही. जगात जिथे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पन्नास टक्के स्त्रिया काम करतात, तिथली गरिबी गेली आहे. स्त्री जिथे घराच्या चौकटीत ठेवली गेली, तिला बाहेर पडू दिलं गेलं नाही, तिथे सगळ्या सामाजिक, आर्थिक समस्या उद्‌भवल्या आहेत. मग ते पाकिस्तान असो, श्रीलंका असो, नेपाळ असो की बांगलादेश असो. या सगळ्या ठिकाणी थोड्याफार फरकाने हेच चित्र बघायला मिळतं.

**- मा. शरद पवार**

# विभागीय केंद्र, परभणी

## कार्यवृत्त

### दिव्यांग व्यक्तींसाठी युनिक आयडी कार्ड (स्वावलंबन कार्ड) नोंदणी शिबिराचे आयोजन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, अपंग हक्क विकास मंच, समाज कल्याण विभाग, जि. प. परभणी व महात्मा गांधी सेवा संघ परभणी संचलित अपंग पुनर्वसन केंद्र परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्ह्यातील अपंग व्यक्तींसाठी स्वावलंबन कार्ड/युनिक आयडी कार्डची ऑनलाईन नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. ८ सप्टेंबर २०१८ रोजी जि. प. कन्या प्रशाला, स्टेशन रोड, परभणी येथे सकाळी ११ वाजल्यापासून ते सायंकाळी ४ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. कार्डसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे दिव्यांग ऑनलाईन प्रमाणपत्र, आधार कार्ड, सही/अंगठा, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, फोटो इत्यादी कागदपत्रे घेऊन उपस्थितीत रहावे असे आवाहन मा. जि. समाज कल्याण अधिकारी जि. प. परभणी. मा. श्री. आर. जी. गायकवाड (वै. सा. का. परभणी) आणि मा. श्री. विजय कान्हेकर (संचालक तथा सचिव म. गां. से. सं. परभणी) यांनी केले होते. **परभणीतील तरूणांना मा.सागर रेड्डी यांचे मार्गदर्शन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि विभागीय केंद्र परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने युवा-संवाद कार्यक्रमाचे आयोजन २२ डिसेंबर २०१८ रोजी ज्ञानोपासक महाविद्यालयात करण्यात आले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून परभणी केंद्राच्या अध्यक्षा सौ. संध्याताई दुधगावकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. विलासजी पानखेडे होते. मा.बाळासाहेब फुलारी, मा.किरणजी सोनटक्के, मा. सुमंत वाघ यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. आजच्या युवा-संवादाचे वक्ते तथा युवकांचे मार्गदर्शक मा. श्री. सागरजी रेड्डी यांनी खास युवकांशी संवाद साधला.

राज्य शासन १८ वर्षापर्यंत अनाथ मुलांचा सांभाळ करते. त्यामुळे मुले वाममार्गाला लागू नयेत म्हणून मा. सागर रेड्डी यांनी पाच राज्यात १८ वर्षांपुढील मुलांसाठी अनाथाश्रम सुरू केले आहेत. रेड्डी यांनी मुलांसाठी अनाथाश्रम चालू करून समाजापुढे नवा आदर्श निर्माण केला आहे.

### १४ जानेवारीला परभणी विभागातर्फे 'जागर माय-लेकींचा' कार्यक्रम

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या परभणी विभागीय केंद्रातर्फे 'जागर माय-लेकींचा' या कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानोपासक महाविद्यालयात १४ जानेवारी २०१८ रोजी ११ वाजता करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा. संध्याताई दुधगावकर (अध्यक्ष,यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र परभणी) या होत्या; तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. विलासजी पानखेडे (कोषाध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र परभणी) हे होते. मा. बाळासाहेब फुलारी, मा.किरण सोनटक्के, मा. सुमंत वाघ इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये समाजातील प्रतिष्ठीत माय-लेकींचा विभागीय केंद्र परभणी तर्फे शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला अधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. विष्णू व श्री. प्रमोद दलाल यांनी केले होते.

### माय-लेकींचा विभागीय केंद्र परभणी तर्फे शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरव

रणात उतरणाऱ्या सैनिकांना प्रेरणा देणारी दोन व्यक्तिमत्त्व मा. जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांचे जीवन राष्ट्राच्या उत्थानासाठी समर्पित आहे. जिजाऊची लेक म्हणून मला सतत प्रेरणा आहे; तर एका पर्वाचे स्वामी विवेकानंद माझे वाचनाचे विषय आहे. जगप्रवास करून स्वामी विवेकानंदांनी एकट्याने परदेशात भारतीय संस्कृती-धर्म जागृत ठेवला. जिजाऊ ही लेकरं घडविण्याची वृत्ती, असे प्रतिपादन कवी इंद्रजित भालेराव यांनी 'जागर मायलेकिचा' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव

चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र परभणीच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. संध्या दुधगावकर, यांच्यासह जिल्हापरिषदेच्या उपाध्यक्षा सौ. भावना नखाते, कृषिभूषण सोपानराव, अनिल जैन, विलास पानखेडे, सुमंत वाघ, विमल नखाते, अरूण चव्हाळ, विष्णू वैरागर इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविक विलास पानखेडे यांनी केले. प्रख्यात गायक प्रा. डॉ. अशोक जोंधळे यांनी जिजाऊ वंदनगीत सादर केले; तर सुप्रसिध्द गायिका आशाताई जोंधळे यांनी 'एकुलती एक लाडाची लेक, जिजाऊ शिकते भालाफेक' हे प्रेरणागीत सुंदर आवाजात गायले. जागर मायलेकींचा कार्यक्रमांतर्गत कठीण परिस्थितीशी झुंज देत जीवनात यशस्वी ठरलेल्या वर्तमान काळातील मायलेकींचा सन्मान प्रतिष्ठानच्या वतीने स्मृतिचिन्ह, पुस्तके भेट देऊन करण्यात आला.

ज्योती गवते, लक्ष्मी गवते (क्रीडा क्षेत्र), अनुराधा पंडित (नृत्यकला), सोनी राऊत, सुमन राऊत (मंत्रालय, मुंबई), आरती आरबाड, रंजना आरबाड (शिक्षण), तृप्ती ढेरे, शकुंतला ढेरे (लोककला व प्रशासन), डॉ. श्रुती कदम (वैद्यकीय सेवा), खान (न्याय व्यवस्था), जागृती नामदेव देशमुख, शालिनी देशमुख (न्याय संस्था), श्वेता यादव, सुशिला काळे (प्रशासन अधिकारी), डॉ. कल्पना डोबे, रंजना डोंबे (वैद्यकीय सेवा), पूजा कुटे, संजीवनी कुटे (पोस्ट खाते), या मायलेकींचा सन्मान टाळ्यांच्या गजरात करण्यात आला. प्रमुख पाहुण्या भावना नखाते यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. संध्या दुधगावकर यांनी महामानवाच्या वृत्तीने वर्तमान पारतंत्र्याला नाहीसे करा, येणाऱ्या आव्हानाला भिडून पुढे जावे. प्रत्येकाने संवेदनशीलता जिवंत ठेऊन आपले जीवन यशस्वी करावे. अस्मिता, धगधग बाजूला ठेऊन आव्हाने पेलावीत, असे मत मांडले. 'काळाचे संदर्भ तपासून महामानवाच्या विचाराने अनेक गोष्टीला सामोरे जावे. त्यांच्या संस्कारातून आचारवंत व्हावे असे डॉ. दुधगावकर म्हणाल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या फुलारी यांनी तर उपस्थितांचे आभार सौरभ फटाफुळे यांनी व्यक्त केले.

## महिला आरोग्य तपासणी शिबिर संपन्न...

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केन्द्र परभणी व आरोग्य विभाग जिल्हा परिषद परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ जानेवारी २०१९ रोजी परभणी जिल्ह्यातील पिंगळी येथील ग्रामीण रुग्णालयात ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनाला अध्यक्ष म्हणून मा. सौ. संध्याताई दुधगावकर (अध्यक्ष, विभागीय केन्द्र परभणी) तर उद्घाटक म्हणून मा. सौ. भावनाताई नखाते (उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती, जि.प.परभणी) उपस्थित होत्या. शिबिरात महिलांची आरोग्य तपासणी करताना तज्ज्ञ डॉक्टर म्हणून मा. डॉ. स. मोबिन (वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, पिंगळी) मा. डॉ. कच्छवे (स्त्री रोग तज्ज्ञ,परभणी) मा.डॉ.भालेराव (बाल रोग तज्ज्ञ, परभणी) यांनी शिबिरास आलेल्या महिलांचे हिमोग्लोबिन, गरोदर माता, बालकाची तपासणी करून सल्ला व मार्गदशन केले. ५०० महिला व १०० बालकांची तपासणी करण्यात आली. शिबिरास पिंगळी सर्कल मधील महिला व गरोदरमाता व बालक मोठ्या प्रमाणात तपासणी करण्यासाठी उपस्थितीत होत्या. या प्रसंगी शिबिरास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र परभणीचे मा. विलासजी पानखेडे, मा. सुमंत वाघ व मा. प्रशांतजी दलाल यांनी सदिच्छा भेट दिली. सदरचे शिबिर यशस्वी करण्यासाठी पिंगळी येथील आरोग्य केन्द्राच्या सर्व परिचारिका व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. शिबीराला मा. विजयरावजी कान्हेकर व सर्व सन्माननीय सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.

# देवराष्ट्रे

## कार्यवृत्त

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी त्याच्या जन्मगावी, देवराष्ट्रे येथे रविवार दि. २५ नोव्हेंबर रोजी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या निमिताने मा. आ.मोहनराव कदम, मा.आ. विश्वजित कदम, सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. संग्रामसिह देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष मा. अरुण अण्णा लाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी देवराष्ट्रे येथे यशवंतरावांच्या पूर्णाकृती पुतळ्यास व जन्मघर स्मारकामध्ये पुष्पहार घालून अभिवादन केले.

कार्यक्रमावेळी बोलताना आ. विश्वजित कदम यांनी यशवंतरावांच्या जन्मघर स्मारकाचा प्रश्न अधिवेशनातही मांडणार असल्याचे सांगितले. या वेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले की आजही महाराष्ट्र यशवंतरावाच्या विचारावर चालत आहे, यापुढेही तो चालत राहील.पंचायतराज व्यवस्था ही यशवंतरावांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी आहे. जिल्हा परिषदेचा कारभार हा यशवंतरावांचा विचार घेऊनच काम करीत आहे. या पारदर्शक कारभारामुळे जिल्हा परिषदेने राज्यात नावलौकिक मिळवला आहे. यशवंतरावांचे जन्मघर आपल्या तालुक्यात असल्याचा अभिमान वाटतो. चव्हाण साहेबांचे जन्मघर हे सार्वजनिक क्षेत्रांत काम करणाऱ्यांना उर्जा निर्माण करणारे आहे. येथील रखडलेल्या स्मारकाच्या कामाबाबत खंत व्यक्त करत जिल्हाधिकारी यांचे समवेत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावणार असल्याची माहिती देशमुख यांनी दिली.

शासनाच्या वतीने कडेगाव तालुक्याच्या तहसीलदार सौ. अर्चना शेटे यांनी देखील जन्मघर स्मारकामध्ये येऊन यशवंतरावांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

**चांगलं अर्थकारण आणि चांगलं राजकारण परस्परांच्या हातात हात घालून चालत नाहीत, असा एक समज राजकारण्यांमध्ये सर्वसाधारणपणे प्रचलित आहे. मात्र, या बाबतीतील माझी भूमिका वेगळी आहे. अनिष्ट, वाईट अर्थकारणावर बेतलेले राजकारणही तितकंच अनिष्ट आणि वाईट असतं, अशी माझी धारणा आहे.**

**- मा. शरद पवार**


MAKE YOUR FUTURE BRIGHT
MKCL
Creating a Knowledge Lit World
MS-CIT
Maharashtra State-Certificate In Information Technology
KLiC
Tally
Power of Simplicity
TALLY
KLiC
GRAPHICS
KLiC
WEB DESIGNING
KLiC
C/C++
Programming
C PROGRAMMING
KLiC
English
ENGLISH SPEAKING
YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN
( YCP )
MKCL
KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
5th Floor, Y.B. Chavan Centre, Gen. J.Bhosale Marg,
Opp.Mantralaya, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel. No: 22817975 / 22043617 / 19
Mobile No. 9769256343

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मान्यवर

| अ. नं. | वर्ष | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव |
|---|---|---|
| १ | १९९५ | प्राध्यापक मधु दंडवते |
| २ | १९९६ | श्री. बियांत सिंग- मरणोत्तर |
| ३ | १९९७ | डॉ. सी. सुब्रमण्यम् |
| ४ | १९९८ | श्रीमती इला भट |
| ५ | १९९९ | श्रीमती आवाबाई वाडिया |
| ६ | २००० | श्री. सुंदरलाल बहुगुणा |
| ७ | २००१ | डॉ. व्ही. कुरियन |
| ८ | २००२ | डॉ. जयंत नारळीकर |
| ९ | २००३ | श्री. आर. के. लक्ष्मण |
| १० | २००४ | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर |
| ११ | २००५ | श्री. सॅम पित्रोदा |
| १२ | २००६ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती |
| १३ | २००७ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी |
| १४ | २००८ | इस्त्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) |
| १५ | २००९ | प्रो. यश पाल |
| १६ | २०१० | श्रीमती महाश्वेता देवी |
| १७ | २०११ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग |
| १८ | २०१२ | डॉ. ई. श्रीधरन |
| १९ | २०१३ | श्री. झुबिन मेहता |
| २० | २०१४ | श्री. रतन टाटा |
| २१ | २०१५ | डॉ. विजय केळकर |
| २२ | २०१६ | श्री. नंदन निलेकणी |
| २३ | २०१७ | डॉ. एम. एम. शर्मा |
| २४ | २०१८ | डॉ. रघुराम राजन |

# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कारप्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास पारितोषिक |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषी औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक |
| २०१८ | विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ – संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान | (प्रत्येकी २५०.००) |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्रीचे वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन (शरदराव पवार भाषणसंग्रह) संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास–संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास–संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण (चरित्र) – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक–वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | संवादिनी – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | शाळांचे प्रगतिपुस्तक–डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |

२९. Yashwantrao Chavhan : an Autobiography ३९५.००

३०. यशवंतराव चव्हाण (आत्मचरित्र) - कृष्णाकाठ ३००.००

३१. यशवंतराव चव्हाण : व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व ५००.००

३२. शिक्षणवृत्ती - डॉ. कुमुद बन्सल २००.००

३३. शिक्षणकट्टा - बसंती रॉय २००.००

३४. वाटचाल ई-शिक्षणाची - बसंती रॉय २००.००

३५. हवामान बदलास आमचे उत्तर १००.००

३६. विचारसूत्रे - संपादन : पद्मभूषण देशपांडे २००.००

३७. पाणीबाणी - प्रभाकर साळेगावकर १६०.००

३८. पर्व : प्रगतीचे परिवर्तनाचे - पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दूतही उपलब्ध) खाजगी वितरणासाठी

३९. Whats App चर्चा- शिक्षण विकासाच्या - संपादक : माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत २००.००

४०. सेमी इंग्रजी - का आणि कसे ? २००.००

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स

१. मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
३. प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
४. पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट

वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची

५. कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक - श्री. राम गबाले
६. येस, आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
७. 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई
८. 'जागर हा जाणिवांचा....' लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी
९. 'कृष्णाकांठ' : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक - जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ - http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य - http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य - http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश - http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य - http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मिळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन - http://vkrajwade.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई,
पुणे फिल्म फाऊंडेशन
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# ९वा यशवंतराव आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१९

9th yiff 2019
Yashwant International Film Festival















यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई
राष्ट्रीय
वयोश्री
योजना
भारतात सर्वाधिक
१३,०००
ज्येष्ठ नागरिकांना जीवन
सहाय्यक उपकरणांचे
मोफत वितरण